
# शब्द रुची

४६

फेब्रुवारी २०२२

मूल्य १० रुपये । पृष्ठे ६०

## साधी माणसं... मनभर उरलेली माणसं...



पं. बिरजूमहाराज



रामदास कामत




रेखा कामत



रमेश देव



मालिनी हिंगलासपूरकर




कुमार नवाथे



सुनील मेहता



अरुण जाखडे



बाळ ठाकूर




प्रा. एन.डी. पाटील



डॉ. अनिल अवचट



कीर्ती शिलेदार




For queries, please contact: **adsales@abpnetwork.com** | Download the **ABP Live app**

ABP Network

**विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्द रुची**

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

शब्द रुची ४६

**फेब्रुवारी २०२२, वर्ष नववे**
**अंक दहावा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५०
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

कलेचं अभिजात वळण / ५
**दीपक घारे**

अनिल अवचट / ८
**किरण ठाकूर**

माझ्या मन:पटलावर कोरलेले पंडित बिरजूमहाराजजी / १२
**सुनीता पुरोहित**

विवेकी योद्धा / १४
**विजय चोरमारे**

मनस्वी मित्र... / १७
**कुमार केतकर**

स्नेहाची श्रीशिल्लक / २०
**श्रीकांत बोजेवार**

अलविदा सुनीलभाई / २३
**यशोधरा काटकर**

ताईमावशी / २६
**मनवा नाईक**

कीर्ती शिलेदार गेल्या म्हणे... कसं शक्य आहे? / २८
**डॉ. मुकुंद कुळे**

यशाचे धडे न गिरवणारा प्रकाशक / ३१
**राम जगताप**

सहवास / ३५
**जयंत सावरकर**

'देव' नाही देव्हाऱ्यात... / ३८
**पुरुषोत्तम बेर्डे**

नेहरूनगर कुटुंबाच्या वहिनी / ४०
**अनुराधा गांगल**

नामदेव व्हटकरांचे समाजप्रबोधनातील योगदान / ४४
**भगवान इंगळे**

आपले निसर्गऋण / ४६
**शरद पांडुरंग काळे**

कोरोना लसीमागचं शास्त्र व शास्त्रज्ञ / ४९
**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

**ग्रंथाली पुस्तकप्रकाशन वृत्तांत / ५२**
**'ग्रंथाली' ग्रंथपाने / चांगदेव काळे / ५५**

# संपादकीय...

**जीणे** गंगौघाचे पाणी... निर्मळ आयुष्य जगलेली निरनिराळ्या क्षेत्रातील काही माणसे या जगाचा निरोप घेऊन गेली. अभिनेते रमेश देव, गायक-नट रामदास कामत, अभिनेत्री रेखा कामत, कथकगुरू बिरजूमहाराज, समाजधुरीण एन.डी. पाटील, 'मुक्तांगण'चे डॉ. अनिल अवचट, गायिका कीर्ती शिलेदार, चित्रकार बाळ ठाकूर, प्रकाशक सुनील मेहता, लेखक-प्रकाशक अरुण जाखडे, लेखक कुमार नवाथे... कला, साहित्य, समाजकारण, राजकारण यामधील ही नावे आपल्या आयुष्याशी वेगवेगळ्या कारणाने जोडली गेली. नव्या वर्षाची सुरुवात एकामगोमाग एक त्यांच्या दुःखद निधनाच्या बातम्या घेऊन आली. निरलस भाव, कार्यनिष्ठा, संवेदनशीलता आणि साधेपणा हा त्यांच्या जगण्यातला समान धागा. ही खरी माणसे मन व्यापून राहिली आहेत. या साऱ्यांचे जीवन एका लेखात मावणारे नाही हे खरे. या अंकात त्यांच्या स्मृती जागवून आदरांजली वाहणारे लेख पुरुषोत्तम बेर्डे, जयंत सावरकर, मनवा नाईक, सुनीता पुरोहित, विजय चोरमारे, किरण ठाकूर, मुकुंद कुळे, दीपक घारे, यशोधरा काटकर, राम जगताप, श्रीकांत बोजेवार आणि कुमार केतकर यांनी लिहिले आहेत.

'नाट्यदर्पण रजनी' आणि 'नाट्यदर्पण पुरस्कार' यांना फिल्म फेअर पुरस्कारांइतकेच महत्त्व निर्माण करणारे आणि मराठी नाटक क्षेत्रात अपूर्व चैतन्य आणणारे सुधीर दामले यांचेही निधन या काळात झाले. त्याच्या कार्यावर 'शब्द रुची'च्या मे-जून महिन्याच्या नाटक विशेषांकात लेख प्रसिद्ध केला होता.

मालिनी हिंगलासपूरकर या सगळ्यांत वेगळ्या. एक गृहिणी. त्यांची वाचनप्रियता आणि 'ग्रंथाली'च्या आरंभकाळापासून त्यात आपल्या परीने सहभाग घेतलेल्या. जीवनातील कष्टांची तमा नाही, नैराश्य कधी जवळ येऊ दिले नाही, सकारात्मक विचार आणि माणसे जोडण्याची कला ही त्यांची वैशिष्ट्ये. तीच त्यांच्या मुलांत उतरली. अर्थार्जनाची गरज होती, त्यातही अन्य कोठे नोकरीचा विचार न करता, नुकतेच मूळ धरत असलेल्या 'ग्रंथाली'ची वाट त्यांनी सुदेशला दाखवावी आणि सुदेशनेही तेच बाळकडू घेऊन त्यात झोकून द्यावे, याचे अनेक साक्षीदार आहेत. या अंकात त्यांच्या व्यक्तित्वाचे पदर अनुराधा गांगल यांनी उलगडले आहेत.

मुखपृष्ठावरूनच ध्यानात यावे की हा अंक स्मरणअंक करावा लागावा अशी दुर्दैवी वेळ आली. जे इथली यात्रा संपवून गेले ते निराशावादी नव्हते. आयुष्याला भिडणारे होते. माणूसपण जपणारे होते, आपल्यातले उत्तम ते जगाला देणारे होते... त्यांचे हे हात घेण्याचा प्रयत्न आपण करू, ही त्यांना खरी आदरांजली ठरेल.

स्वातंत्र्यसैनिक, लेखक, सामाजिक कार्यकर्ता, अभिनेता, सिनेमा निर्माता, राजकारणी असे चतुरस्र व्यक्तिमत्त्व असलेल्या नामदेव व्हटकर यांचे हे जन्मशताब्दीवर्ष. या अंकात त्यांच्या खडतर आयुष्यातून मार्ग काढत केलेल्या कार्याचा पट भगवान इंगळे यांनी मांडला आहे.

गावागावातून 'कचराकुंडी' हा शब्द काढून त्याऐवजी 'निसर्गसंपत्ती पेटी' असे का लिहिले पाहिजे याबद्दल डॉ. शरद काळे 'आपले निसर्गऋण' या लेखातून सांगत आहेत. रोजच्या जीवनातील विज्ञान सोपे करून विज्ञानभान देणारा त्यांचा लेख या अंकापासून दर महिन्याला प्रसिद्ध होणार आहे.

कोरोनाने दोन वर्षे जगाला ग्रासले आहे. त्याचे नवेच रूप सध्या चिंता उत्पन्न करते आहे. या कोरोनावर अखेर लस आली. त्या लसीमागचे शास्त्र, शास्त्रज्ञ आणि निर्मितीची कहाणी डॉ. अनंत लाभसेटवार यांनी सांगितली आहे.

'ग्रंथाली'च्या नवीन पुस्तकांची माहिती देणारी चांगदेव काळे यांची ग्रंथपाने आहेतच. 'ग्लोबल ग्रंथपरिचय' हे सदर या अंकात प्रसिद्ध होऊ शकले नाही. राजीव श्रीखंडे यांची 'ग्लोबल साहित्यसफर' एकोणीस भागांची झाली आहे. संजीवनी खेर सदर करत असलेल्या 'ग्लोकल साहित्यसफर'चे चार भाग झाले आहेत. हे दोन्ही कार्यक्रम granthali watch या यूट्यूब चनेलवर उपलब्ध आहेत. अवश्य सबस्क्राइब करून त्याचा आस्वाद घ्यावा.


**– अरुण जोशी**



# कलेचं अभिजात वळण

**दीपक घारे**

**बाळ** ठाकूर गेल्यानंतर त्यांच्या सिद्धहस्त रेषेविषयी आणि आपल्या कामात मग्न असलेल्या त्यांच्या अबोल व्यक्तिमत्त्वाविषयी बरंच काही बोललं गेलं. कोणताही चांगला मुखपृष्ठ चित्रकार अथवा बुक डिझायनर साहित्याला एक संकल्पनात्मक दृश्य आकार देत असतो. त्यातून साहित्याबद्दलची एक वेगळी अभिरुची तो घडवत असतो. बाळ ठाकूरांनी दृश्यकलेची आयुधं वापरून ही अभिरुची समृद्ध तर केलीच; तसेच, काही वेळेस ग्राफिक आर्टिस्ट म्हणून आपल्या कामाला स्वतंत्र कलेचा दर्जाही प्राप्त करून दिला. विवरणात्मक कला (illustrative art) आणि अभिजात कला (fine art) यांच्या सीमारेषा पुसट असतात. बाळ ठाकूर यांच्यासारख्या चित्रकारांचं काम या सीमारेषेवर घुटमळणारं असतं. ठाकूरांच्या चित्रांना, विशेषत: त्यांच्या रेखाचित्रांना अभिजाततेचा स्पर्श होतो असं म्हटलं जातं ते त्यामुळे.



बाळ ठाकूर

बाळ ठाकूर यांचं मूळ नाव भालचंद्र शिवराम ठाकूर-देसाई. भांबेड हे त्यांचं कोकणातलं मूळ गाव. इंदूर, राजापूर या ठिकाणी त्यांचं शालेय शिक्षण झालं. चित्रकार व्हायची इच्छा असल्यामुळे मॅट्रिकनंतर ते मुंबईत आले आणि सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये कमर्शियल आर्टसाठी १९४७ मध्ये त्यांनी प्रवेश घेतला व कालांतरानं पदविका प्राप्त केली. विद्यार्थी असताना ते वा.रा. ढवळे यांच्याकडे राहायला होते.

जे.जे.मधून बाहेर पडल्यावर ठाकूर ह्यांनी हिंदुस्थान थॉम्पसन, सिस्टाज, उल्का अशा नावाजलेल्या जाहिरातसंस्थांमध्ये काम केलं. 'उल्का'मध्ये तर ते जवळपास पंधरा वर्षं होते. परंतु जाहिरातींच्या जगात ते रमले नाहीत. याच काळात मराठी पुस्तकांसाठी काम करत राहिले. विजय तेंडुलकरांचं 'रात्र आणि इतर एकांकिका' हे पुस्तक १९५७ मध्ये प्रकाशित झालं. त्याचं मुखपृष्ठ हे ठाकूरांनी केलेलं पहिलं काम. त्याआधी मासिकांसाठी ते कथाचित्रं करत होते.

शालेय वयापासून 'किर्लोस्कर'-सारखी मासिकं, मराठी पुस्तकं, वि.स. खांडेकरांपासून ते विभावरी शिरूरकरांपर्यंतचे लेखक त्यांच्या वाचनात होते. त्यामुळे साहित्य व चित्रकलेची एकात्म जाण त्यांच्यात निर्माण झाली. मुंबईत वा.रा. ढवळे यांच्यामुळे मराठी साहित्यविश्वाचा त्यांना जवळून परिचय झाला. श्री.पु. भागवतांचा परिचयही मुंबईत आल्यावरच झाला.

श्री.पु. भागवतांनी 'ललित'मधील एका मुलाखतीत (डिसें. ८८-जाने. ८९) बुक डिझायनर कसा असावा याबद्दल सांगितलं आहे. बाळ ठाकूर ह्यांना ते तंतोतंत लागू पडतं. श्री.पु. सांगतात, 'प्रथम म्हणजे त्याला वाङ्मयाची चांगली जाण पाहिजे. पुस्तकांतील आशय, त्याची प्रकृती, लिखाणाची शैली यांचं आकलन तर त्याला व्हायला पाहिजेच. शिवाय याच्याशी संवाद साधणारं दृश्यस्वरूप पुस्तकाला कसं द्यायचं याचं कसब त्याच्याजवळ हवं. अर्थात मुद्रणाची तशीच छपाईच्या तंत्राची अद्ययावत माहिती हवीच. थोडक्यात, आवडीनं व समजदारीनं, साहित्यप्रेमी वृत्तीनं अभिजात चित्रकार असलेला कमर्शियल आर्टिस्ट हवा.'

बाळ ठाकूरांमध्ये हे सारे गुण होते. शिवाय बुक डिझायनर ही संकल्पना मराठीत रुजायला नुकतीच सुरुवात झाली होती. अन्यथा चित्रकारानं मुखपृष्ठ केलं की त्याचं काम संपलं अशीच सर्वसाधारण धारणा होती. द.ग. गोडसे हे अशा समग्रपणानं विचार करणारे पहिले चित्रकार. ठाकूर यांच्या चित्रशैलीवर गोडसे यांचा प्रभाव होता असं म्हटलं जातं. परंतु ते तितकंसं खरं नाही. ठाकूर यांची शैली अभिजात चित्रकलेतील स्केचेस, ड्रॉइंग्ज आणि ग्राफिक आर्ट तसंच उपयोजित कलेतील लाइन इलस्ट्रेशनचं तंत्र यांच्या संयोगातून सहजपणे विकसित झाली. त्यात प्रयोगशीलतेला भरपूर वाव होता. मुखपृष्ठांसाठी सुलेखनाचा त्यांनी केलेला सर्जनशील वापर हा ग्राफिक आर्टचाच एक भाग होता.

ठाकूर ह्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली तो अक्षरमुद्रण म्हणजेच लेटरप्रेसचा काळ होता. या मुद्रणपद्धतीला लाइन इलस्ट्रेशन्स अधिक सोयीची होती. ठाकूरांच्या ते पथ्यावर पडलं. कारण रेषा हे त्यांच्या शैलीचं वैशिष्ट्य होतं. रेषेचा उत्स्फूर्त आणि लयबद्ध वापर त्यांच्या रेखाटनांमधून दिसतो. त्यांची रेषा कधी नाजूक तर कधी ठसठशीत होते. त्यांच्या चित्रांमध्ये रेषेचं जे जाळ निर्माण होतं ते कधी एखाद्या डूडलसारखं (doodle) निरर्थक चाळ्यातून अर्थपूर्ण आकार निर्माण करणारं असतं तर कधी छायाप्रकाशाच्या छटा आणि व्यक्तिमत्त्वाच्या गूढतेला स्पर्श करणारं असतं.

रविमुकुल यांना दिलेल्या मुलाखतीत ('पद्मगंधा' दिवाळी अंक २०२१) ठाकूरांनी रेषेवर हुकूमत मिळवण्यासाठी केलेली साधना सांगितली आहे. ठाकूर चित्रांमध्ये रेषा ब्रशनं काढत असत. रद्दी पेपरचा गठ्ठा घेऊन त्यावर फाइन ब्रश आणि इंकनं रेषेचा तासन्‌तास सराव करत ते बसायचे. केसासारखी बारीक अथवा जाड रेषा असो, त्याला एक अंतर्गत लय होती. त्यात कौशल्याचा भाग होता तसाच ती भावपूर्ण (एक्स्प्रेसिव्ह) करण्यात ठाकूरांच्या अनुभवाचा भाग होता. केवळ सराव म्हणून पेन, ब्रश, क्रेयॉन वापरून केलेली असंख्य चित्रं अथवा स्केचेस ठाकूरांकडे पाहिल्याचं रविमुकुल ह्यांनी सांगितलं आहे.

रेखाचित्रं (ड्रॉईंग्ज), मुद्राचित्रं आणि उपयोजित कलेतील कथाचित्रं (इलस्ट्रेशन्स)











या तीनही क्षेत्रांमध्ये रेषेचा वापर केला जातो. अभिजात कलेतील रेखाचित्रं सोडली तर मुद्राचित्रं आणि उपयोजित चित्रं यांमध्ये मुद्रणसुलभता हा एक महत्त्वाचा घटक असतो. उपयोजित कलेत वाचकांचं लक्ष वेधून घेणारा आकर्षकपणाही अपेक्षित असतो. ठाकूर यांच्या रेखाचित्रांमध्ये हे तीनही गुण कमी अधिक प्रमाणात आढळतात. ठाकूर आपल्या चित्रांमध्ये क्रॉस हॅच तंत्राचा, म्हणजे आडव्या उभ्या रेषांचा पोतनिर्मितीसाठी आणि खोलीचा आभास निर्माण करण्यासाठी मुक्तपणे वापर करत असत. त्यातून कधी कधी एक अमूर्त आकृतिबंधही तयार होई. त्यांनी 'ललित' किंवा 'सत्यकथे'साठी केलेली अनेक साहित्यिकांची, प्रसिद्ध व्यक्तींची व्यक्तिचित्रं रेषांमधून जिवंत होत. कारण त्यात व्यक्तिमत्त्वही साकार होई. प्रसिद्ध चित्रकार ओके यांच्या व्यक्तिचित्रांमधील रेषेचा वापर अधिक शिस्तबद्ध आणि एकमेकांना समांतर पद्धतीचा एन्ग्रेव्हिंग किंवा उत्कीर्णन पद्धतीच्या मुद्राचित्रांना अधिक जवळचा असे. तर ठाकूर यांच्या व्यक्तिचित्रांमध्ये रेषेचा वापर मुक्त आणि आवश्यक तिथे विरूपीकरणाला स्पर्श करणारा असे. त्यामुळे त्या रेषेत ठाकूरांची चित्रकार म्हणून असलेली ओळख लक्षात येई.

ठाकूरांच्या चित्रांमधील पोत हा देखील एक महत्त्वाचा घटक होता. मग तो रेषांच्या कमीअधिक जाडीतून, जोरकस किंवा हळुवार रेषांमधून साधलेला असो किंवा अपारदर्शक अथवा पारदर्शक रंगांच्या छटांमधून साधलेला असो. काही वेळा ते रंगीत कव्हर पेपरचा आणि स्क्रीन प्रिंटिंगचा मुखपृष्ठांसाठी वापर करत. 'बीअरची सहा कॅन्स' या नरेश कवडी यांच्या कथासंग्रहाला तर ठाकूरांनी पॅकेजिंगला वापरतात त्या कॉरोगेटेड शीटचा वापर केला होता. पोत साधण्याचे हे विविध प्रयोग केवळ नावीन्यासाठी नव्हते तर लेखकाच्या आशयाचा पोत दृश्यरूपात पकडण्याचा तो एक यशस्वी प्रयत्न होता.

बाळ ठाकूर यांचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी केलेला सुलेखनाचा वापर. ठाकूरांना समकालीन असलेले र.कृ. जोशी आणि नंतरच्या पिढीतले दत्तात्रय पाडेकर ह्यांनी सुलेखनशैली मुखपृष्ठांसाठी वापरली आणि प्रस्थापित केली. बाळ ठाकूर यांनी सुलेखनशैलीचे नियम पाळण्यापेक्षा अक्षरांची

वळणं भावदर्शक (एक्स्प्रेसिव्ह) करण्यावर भर दिला. त्यामुळे त्यांची अक्षरं ही इलस्ट्रेशन होऊन बसली. 'एरियल आणि पोरकं पाखरू' – अनिल डांगे, 'धर्म आणि लोकसाहित्य' – दुर्गा भागवत ही याची उत्तम उदाहरणं आहेत.

ठाकूर यांनी पुस्तक संकल्पनाची (बुक डिझाइन) जी कामं केली ती तीन प्रकारची होती. कथनात्मक, संकल्पनात्मक आणि अमूर्त. कथनात्मक किंवा कथाचित्रप्रधान मुखपृष्ठे आणि पुस्तकांमध्ये वर्णिलेला विषय थेटपणे आलेला आहे. गिरीश प्रभुणे यांचं 'पारधी' किंवा अगदी अलिकडचं आसाराम लोमटे यांचं 'धुळपेर'मधली चित्रं या प्रकारची आहेत. महेश एलकुंचवार यांचं 'आत्मकथा आणि प्रतिबिंब' किंवा त्र्यं.वि. सरदेशमुखांचं 'डांगोरा : एका नगरीचा' ही मुखपृष्ठं संकल्पनात्मक आहेत. कृ.द. दीक्षितांच्या 'सहवास'पासून राणी दुर्वे यांच्या 'शब्देविण संवादु' या पुस्तकापर्यंत अमूर्त आकार आणि शैलीचा वापर ठाकूरांनी केलेला आहे.


ठाकूरांच्या चित्रांचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्याकडे असलेली रचनाचित्राची (कॉम्पोझिशन) अभिजात समज. त्यांच्या चित्रांमधली आकार अवकाशाची रचना, पॉझिटिव्ह-निगेटिव्ह स्पेसची अर्थवाही गुंफण अभिजात कलेची आठवण करून देणारी होती.

मराठीमध्ये दलाल-मुळगावकर-सुभाष अवचट असा मुखपृष्ठांचा एक कलाप्रवाह सातत्यानं राहिलेला आहे. त्या प्रवाहाला समांतर अशा बाळ ठाकूर, पद्मा सहस्रबुद्धे, प्रभाकर गोरे अशा चित्रकारांनी आपलं स्वतंत्र स्थान निर्माण केलं आणि दृश्य अभिरुची अधिक लवचीक करण्यास मदत केली. वाचकांची संवेदनशीलता घडवण्यात आणि अभिरुची समृद्ध करण्यात लेखकाइतकाच चित्रकाराचा सहभाग असतो. ग्रेसच्या कवितेपासून तभटक्या विमुक्तांच्या जगण्यापर्यंत, संयत आविष्कारापासून थेट, रांगड्या भाषेपर्यंत मराठी संवेदनशीलतेचा विस्तार झाला त्याला, त्या संवेदनशीलतेला अभिजात वळण देण्याचं काम बाळ ठाकूर यांनी एकाग्रतेनं केलं. बऱ्याच उपयोजित क्षेत्रातील कलावंतांना अभिजात चित्रकलेविषयी, आपल्याला अभिजात चित्रकार होता आलं नाही याचा कॉम्प्लेक्स किंवा अपराधगंड असतो. ठाकूरांच्या बाबतीत हा प्रश्न कधी आला नाही. ते काम करत राहिले. चांगली कला अभिजात-उपयोजित अशा सीमारेषा ओलांडून पलीकडे जाते. बाळ ठाकूरांची कला या प्रकारची होती.

**– दीपक घारे**

gharedeepak@rediffmail.com

॥ग्रंथाली॥




# सृजन
## सौ. अल्पना जोशी

(कवितासंग्रह)

**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**




# गोरवेणा
## डॉ. विजय जाधव

डॉ. विजय जाधव यांच्या 'गौरवेणा' या दुसऱ्या कथासंग्रहात बंजारा आणि एकूणच सर्व वंचित-उपेक्षित समाजातील जीव-घेण्या यातनांचे वास्तवदर्शी वाचन आले आहे. यातून व्यक्ती, प्रसंग, वस्तू, घटना यांचे सशक्त आविष्करण झाले आहे. हे आविष्करण 'गोरवेणा' या कथासंग्रहात अत्यंत ठाशीवपणे अभिव्यक्त झालेले दिसून येतात. **– प्रमोद वाळके 'युगंधर'**


**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**



# अनिल अवचट

**किरण ठाकूर**

**हमीद दलवाई,** डॉ बाबा आढाव, व्यसनाधीनता या विषयांवर फक्त शोधपत्रकारिता करून न थांबता पुल देशपांडे आणि सुनीता देशपांडे यांच्या भरीव मदतीने पत्नी अनिता (सुनंदा) हिच्यासोबत 'मुक्तांगण' व्यसनमुक्ती केंद्र सुरू करणारा, कन्या मुक्ता पुणतांबेकर हिच्या मदतीने ते सातत्याने यशस्वीपणे चालू ठेवणारा, दुसरी कन्या यशोदा वाकणकर हिलादेखील समाजसेवेचे बाळकडू देणारा...



डॉ. अनिल अवचट

डॉ. अनिल त्र्यंबक अवचट...

चतुरस्र, हरहुन्नरी, कलंदर, अवलिया, अजातशत्रू, बहुआयामी, मेडिकल डॉक्टर, लेखक, पत्रकार, शोधपत्रकारिता करणारा पत्रकार, कलाकार, ओरिगामी करणारा, बासरीवादक, फोटोग्राफर, काष्ठशिल्पकार, एकेकाळी सामाजिक क्रांतीची स्वप्ने पाहणारा, तेव्हाचा युवक क्रांती दलाचा कार्यकर्ता...

पुण्यातच नव्हे तर महाराष्ट्रात लाडका असणारा 'बाबा' गुरुवार, २७ जानेवारी २०२२ रोजी दिवंगत झाला. दुसऱ्या दिवशीच्या अंकात मराठी पत्रकारांनी अनिलला श्रद्धांजली वाहताना अशी कित्येक विशेषणे वापरली.

पुण्यातील पत्रकारनगरमधील कृष्णा बिल्डिंगच्या दुसऱ्या मजल्यावर १९८० पासून राहणाऱ्या बाबाविषयी कॉलनीतली रहिवासी आणि त्याचा मित्र म्हणून मी बाबाला जवळून पाहिले.

सुमारे पन्नास वर्षांपूर्वी, १९६९ मध्ये, मी पत्रकारितेच्या अभ्यासक्रमासाठी पुणे विद्यापीठाच्या रानडे इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला. त्याच्या दोन-तीन वर्षे आधी डॉक्टर अनिल अवचट वर्तमानपत्रात बातम्यांच्या माध्यमातून भेटत असायचे. त्याचवेळी अरुण लिमये, रत्नाकर महाजन, कुमार सप्तर्षी आणि अनिल अवचट अशी तरुण मंडळी पुणे शहरात आणि महाराष्ट्रात सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करत होती. मी बातमीदारी करत असल्यामुळे या सगळ्यांशी जानपहचान, दोस्ती होत गेली. काहीशी अरेतुरेची मैत्री झाली. ज्यांनी वैद्यकीय व्यवसाय सोडून पूर्णतः सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कार्य सुरू केले त्यांना मी सातत्याने छेडत होतो. महागा-मोलाची मेडिकल सीट मिळाली असताना, शासनाचा अनुदानाचा लाभ मिळालेला असताना, गरीब जनतेची एका अर्थाने प्रतारणा करत आहात, असा माझ्या छेडछाडीचा रोख असायचा. मी चेष्टामस्करी करतो आहे हे त्यांना माहीत झाल्यानंतर त्यांना राग येत नसे. ते हसण्यावारी नेत असत.

अनिल तेव्हा 'डॉक्टर अवचट' या नावानेच मला परिचित होता. युवक क्रांती दलाचा कार्यकर्ता या भूमिकेत तो असायचा. समाजवादी आणि डाव्या चळवळीतील इतर कार्यकर्त्यांसारखा तो आक्रमक नसे. बिहारमध्ये जाऊन परतल्यावर त्याने 'पूर्णिया' लिहिले ते खूप भावले. रानडेमध्ये पत्रकारितेचे शिक्षक आम्हाला शिकवायचे त्यापेक्षा ती खूप वेगळ्या प्रकारची लेखनशैली होती. 'फाइव्ह डब्लू अँड वन एच' या साचात वर्तमानपत्रासाठी उपयुक्त असलेली वार्तासंकलनाची पद्धत आम्ही शिकलो. दैनिक सकाळमध्ये आणि नंतर यूएनआय वृत्तसंस्थेत थोडक्यात आणि तासा-दोन तासांत बातमी लिहून प्रसिद्धीला द्यायची हे शिकलो. नंतर तेच पुढच्या

पिढीला शिकवले, अनिलची मात्र पूर्णपणे स्वतंत्र पद्धत. 'रिपोर्ताज' तिचे नाव. ते त्याला कुठल्याही मीडिया स्कूलने शिकवले नाही.

मेडिकल कॉलेजमध्ये शिकत असताना आणि नंतरदेखील आपण लिहू शकू, आपले छापून काही येईल असे त्याला स्वप्नातदेखील कधी वाटले नाही. पुण्यात लोकमान्यनगरमध्ये राहत असताना शेजारच्या फ्लॅटमध्ये मो.स. साठे यांची शेजारी म्हणून ओळख झाली. साठे आधी दैनिक सकाळच्या नानासाहेब परुळेकर यांच्या सहकाऱ्यापैकी एक. नंतर त्यांनी 'उत्तम कथा' मासिक काढले. त्यांनी प्रोत्साहन दिले म्हणून अनिलने 'सकाळ'साठी वाचकांची पत्रे लिहायला सुरुवात केली. पहिले पत्र छापून आले तेव्हा खूप आनंद झाला. नंतरच्या आयुष्यात वाचकप्रिय, पुरस्कारप्राप्त लेखक म्हणून त्याची जगाला ओळख झाली असेल, पण त्याचे पहिले साहित्य वर्तमानपत्रात वाचकांचा पत्रव्यवहार या सदरात प्रसिद्ध झाले होते!

पत्रकारनगर १९७९-८० मध्ये उभारले गेले. अनिलचे कुटुंब या कॉलनीमध्ये त्याच वर्षी कृष्णा बिल्डिंगमध्ये राहायला आले. पत्रकारनगरमधल्या आमच्या एकशे दोन सभासदांच्या विस्तारित कुटुंबाचा अविभाज्य भाग झाले. तेव्हा अनिता-अनिल या दाम्पत्याचा आम्हा सगळ्यांनाच लोभ जडला. अनिलची देशभराची भटकंती मुख्यतः लेखनासाठी होती. रुग्णसेवेसाठी नव्हती. मेडिकल कॉलेजपासून सख्य जमलेल्या या दोघांनी आपले जीवन कशा प्रकारे आणि कशासाठी जगायचे हे निश्चित करून ठेवलेले होते. संसार आणि कुटुंब याकडे मी बघून घेईन, तुला जे करायचे ते तू स्वतंत्रपणे करायला पूर्णत: मोकळा आहेस हे अनिताने सांगितल्याचे आम्हालाही त्याच्या लेखनातच कळले. आमच्यातले बहुतेक सर्व या कुटुंबाकडे विस्फारलेल्या डोळ्यांनी बघत असू. डॉ. अनिता नोकरी करण्यासाठी सकाळी बाहेर पडत आणि गरिबांसाठी असलेला नानापेठेतला बाबा आढाव यांच्या जागेतल्या धर्मादाय दवाखान्यात रुग्णसेवा करून रात्री उशिरा त्या घरी परत येत असत.

त्यामुळे पत्रकारनगरमधील बहुसंख्य इतर शेजाऱ्यांचे गप्पांचे, भेटीगाठीचे आणि कट्ट्यावरच्या चर्चांचे विषय वेगळे असायचे.

सोसायटीच्या मीटिंगमध्ये बाबाचा सहभाग आवश्यक तेवढाच असायचा. कॉलनीतील झाडाच्या फांद्या कोणी अकारण तोडल्या तर अनिल कासावीस व्हायचा. अध्यक्ष, सेक्रेटरी यांना फोन करून सांगायचा. मुद्दा रास्त असला तर लगेच कार्यवाही होउन वृक्षसंपदेची हानी टळत असे.

सोसायटीमध्ये सुरुवातीच्या काही वर्षांत कोणी कोणी सहस्रावर्तनाचे उपक्रम सुरू केले होते. रंगपंचमी, गणपतीउत्सव,

बिल्डिंगमधील दुसऱ्या मजल्यावर अवचट कुटुंब राहत असे. त्याच्या अगदी समोरच्या फ्लॅटमध्ये प्रसिद्ध नाटककार सतीश आळेकर राहतात. टाइम्स ऑफ इंडियाचे दिवंगत ज्येष्ठ प्रतिनिधी प्रसन्नकुमार अभ्यंकर यांचे आळेकर हे जावई. आळेकर नाटक, टेलिव्हिजन आणि चित्रपट या क्षेत्रातील दिग्गज. एकमेकांच्या सर्जनतेविषयी आदर आणि कौतुक असणारे हे सख्खे शेजारी. योगायोगाची गोष्ट अशी, की या दोन्ही शेजाऱ्यांच्या पत्नींचे नाव अनिता. समोरासमोरची ही दोन घरे जणू आरशातल्याच प्रतिमा!





कुणाचेही, कधीही स्वागत होणाऱ्या या घराला कधी कुलूप लावावे, असे अनिलला वाटत नसे. त्याच्या या सदैव उघड्या दाराकडे पाहताना आळेकर यांच्या लेखणीतून कागदावर उतरलेल्या ओळी अगदी बोलक्या आहेत...

**दारं**

दार उघडं
दार बंद
बंद दार उघडतं
उघडलेलं बंद होतं
काय खेळ चाल्लाय काय? की किल्ली शोधताय?
कुणाची, तुमची की त्यांची?
दोन्ही गंजल्या असतील. तीस वर्षं खुंटीवर आहेत विनावापर.
उघड्या दारांना कसल्या किल्ल्या लावताय राव?
की ज्यास्त झालीय? नेऊ काय मुक्तांगणात?
अं? नाही. ती नसते तिथे आणि आता... तोही गेला परवा.
मग दारांचं?
दारांची अहो आता काही भानगड नाही.
ती दोघं, रिडेव्हलपमेंटला गेलीयत.
द्या टाळी!

**– सतीश आळेकर**
जानेवारी ३१, २०२२

दिवाळीत किल्ले, फटाके उडवणे, हळदीकुंकू अशा गोष्टी अजूनही लहानमोठ्या प्रमाणात चालू असतात. त्यात अनिल आणि अनिता यांचा सहभाग नसायचा. तद्वतच तात्त्विक विरोध दर्शवण्याचा आक्रस्ताळेपणा नसायचा.

अनिल-अनिता यांच्या दोघी मुली- मुक्ता आणि यशोदा - महापालिकेच्या प्राथमिक शाळेत थोडा काळ शिकायला गेल्या. नामवंत खाजगी शाळांमध्ये जाण्यासाठीची फी देणे त्यांना परवडत नव्हते असे नव्हते, पण आपल्या मुलींनी महापालिकेच्या शाळेत शिकण्याचा अनुभव घेतला पाहिजे ही भूमिका होती. अगदी लहान असताना कॉलनीतील गणपतीउत्सवात दोघा मुलींनी भाग घेतला होता. बाबाच्या ओरिगामीची ख्याती शहरभर झाली होती. कॉलनीतील बच्चेकंपनी ही कला शिकायला कोंडाळे करून बसत असे. अनिल बासरीचा रियाज करायचा. गायचासुद्धा. परंतु शेजारी राहणारे कुटुंबीय याविषयी कधी सोसायटीत तक्रार करत नसत.

*

गेली काही वर्षे कॉलनीतील दुसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या काही सभासदांना आपण आधीपासूनच तळमजल्यावर राहायला हवे होते, असे वाटत आहे. दुसऱ्या मजल्यावरून चढउतार करणे कष्टप्रद झाले आहे. वयोमानानुसार गुडघ्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. बाबाचेही खाली-वर येणे-जाणे खूप कमी झाले होते. जिन्याच्या कठड्याला धरून हळूहळू तो उतरत-चढत यायचा. सोबतीला कोणी असले तर त्याला आधार वाटत असे. कॉलनीतील कोणी समोर भेटले की थोडे काहीतरी बोलून तो गाडीत बसायला जात असे.

सगळीच मुले, सुना, नातवंडे त्याला कौतुकाची होती. आताआतापर्यंत आमच्या नातवंडांना मिनिट-दोन मिनिटे कडेवर घेऊन, थोडे बोलून पुढे जाणारा तो आजोबा होता. आम्हा आजोबा-आजींना वाटेवर थांबवून नातवाला किंवा नातीला कडेवर घ्यायला सांगायचा. आपल्या कॅमेऱ्याने नातवांचे फोटो काढणे याची त्याला खूप हौस होती. आधी तर निवडक फोटोंच्या प्रिंट स्वखर्चाने काढून घरी आणून देण्याचा त्रासही तो घ्यायचा.

*

रिपोर्ताज हा लेखन प्रकार मराठीत अनिलने समर्थपणे हाताळला. तो जे लिखाण करत होता, त्या प्रकाराला पत्रकारितेमध्ये रिपोर्ताज म्हणतात याची त्याला माहिती नव्हती, आम्हालाही माहीत नव्हते. श्री.ग. माजगावकर यांच्या 'माणूस' साप्ताहिकातून रिपोर्ताजची नवी वाट रूढ झाली, त्यात अनिल बर्वेसारखी एक पिढी घडली, अनिल अवचट त्याच वाटेवरचा एक पत्रकार. पण रिपोर्ताज पत्रकारितेला नुसते वळणच नव्हे तर मान्यता आणि प्रतिष्ठा मिळत गेली, ती अनिलच्या सातत्यपूर्ण लिखाणामुळे, असे म्हणणे सार्थ ठरेल.

पत्रकारितेच्या अभ्यासक्रमात मी विभागप्रमुख झालो तेव्हा अनिलला आग्रहाने अनेक वेळा निमंत्रित केले होते. माझ्या आधी अरुण साधू विभागप्रमुख होते. त्यांनीही त्याला औपचारिक-अनौपचारिक गप्पांसाठी बोलवले होते. अनिलची लेखनशैली आणि विद्यार्थ्यांशी बोलण्याची शैलीदेखील खूप छान होती. तो आणि विद्यार्थी रंगून जायचे. प्रत्येक गप्पांच्या वेळी 'पूर्णिया' आणि 'रिपोर्ताज' हा विषय हमखास निघायचा. तसे लिहिण्यासाठी पत्रकारांनी काय करायला हवे असे विद्यार्थी विचाराचे. प्रत्येक वेळी, मी ठरवून काही लिहिलं नाही. त्यामुळे रिपोर्ताज मी कसा लिहिला आणि तुम्ही कसा लिहिला पाहिजे याविषयी मला नाही सांगता येत. असे प्रांजळपणे सांगायचा. तो त्याचा मानभावीपणा अजिबात नसायचा.

मी स्वतः रिपोर्ताज हा प्रकार माझ्या पत्रकारितेच्या पन्नास वर्षांच्या करिअरमध्ये एक-दोनदाच वापरला. मी वर्ष २००७मध्ये निवृत्त झालो त्याच्या एक वर्ष आधी, आपण रिपोर्ताज या पद्धतीचे लेखन कसे करायचे या विषयावर संज्ञापनशास्त्रात फॉरमॅट करून पाहू, असे त्याला बोललो होतो. ते जमले नाही. माझ्या मनातील ही एक गोष्ट राहून गेली.

*

बाबाच्या स्वभावातील ऋजुता आणि निरागसता सगळ्यांना भावायची. तितकाच नित्याचा होता तो त्याचा निगर्वीपणा. तो सर्व अवचट कुटुंबाचा स्थायीभाव होता. या कुटुंबातील प्रत्येकाने खंडीभर पारितोषिके आणि मानसन्मान मिळवले. मात्र कोणीही ते मिरवले नाही. आपल्याला विशेष प्रतिष्ठा पत्रकारनगरच्या कार्यकलापात मिळावी असे कोणी ध्वनितदेखील कधी केले नाही.

एखाद्याला अलिप्तपणा वाटेल असा बाबाचा कॉलनीत वावर होता. परंतु नव्या पिढीतील युवक-युवती काय काय करत आहेत याची तो आस्थापूर्वक चौकशी करायचा. एखाद्याचे विशेष नैपुण्य आणि त्यात मिळवलेले प्रावीण्य यांची तो आपल्या पद्धतीने दखल घेत असे. त्याच्या कौतुकाची छोटीशी थापसुद्धा फार मोलाची असे.

*

बाबा आमच्या या सोसायटीतील अंतर्गत कामकाजात किंवा राजकारणात लक्ष घालत नसे. नित्यनेमाने येणाऱ्या निवडणुकीचे राजकारण यातसुद्धा इच्छुक किंवा स्पर्धक त्याच्याशी चर्चा सल्लामसलत करायला कोणी जात नसे. मात्र तो आमच्या १०२ सभासदांच्या सोसायटीचा कॉन्शस कीपर होता. सोसायटीत राहणाऱ्या ज्या सभासदांमुळे आमच्या कॉलनीला पुणे शहरात प्रतिष्ठा आहे त्यात बाबाचा समावेश होता.

सोसायटीच्या कामात अलिप्तपणे, निरपेक्ष बुद्धीने त्याने हातभार देखील लावला. त्याचा गवगवा न करता. त्याचे एक उदाहरण- सोसायटीच्या सभागृहाचे बांधकाम करण्याचा निर्णय झाला होता. सहकारी बँकेचे कर्ज मिळवण्यात अडथळा येत होता. आमचाच एक असंतुष्ट सभासद बँक मॅनेजरला खोटेनाटे फोन करून

खोडा घालत होता. चार-पाच बँकांकडून कर्जाला नकार आल्याचे कळल्यामुळे एका ज्येष्ठ पत्रकार सभासदाला सोबत घेऊन अनिल दुसऱ्या एका बँकेच्या मॅनेजरला भेटला. हे काय प्रकरण आहे हे कळताच मॅनेजरने कर्ज मंजूर केले.

अशा गोष्टी करायची वेळ फार आली नाही.

✼

चाळीस वर्षांपूर्वी बांधलेली आमची कॉलनी पुनर्निर्माण करण्याचा विचार करते आहे. शासनाचे नवे सुधारित नियम अलीकडे जाहीर झाले तेव्हा पुनर्निर्माण करण्यासाठी सर्वसाधारणसभेची मान्यता हवी होती. तशी मान्यता घेण्यासाठी एक महत्त्वाची मीटिंग अलीकडे झाली. मीटिंगच्या हॉलमध्ये जाणे थोड्या वृद्ध व्याधीग्रस्त सभासदांना अवघड झाले होते. त्यात बाबासुद्धा होता. तसे पत्र त्याने देऊन मीटिंगला उपस्थित राहण्यातील असमर्थता दर्शवली. सभा संपल्यानंतर सदर विकास व्हावा या बाजूचे आपण आहोत अशा अर्थाचे पत्र त्याने नियमानुसार शासन नियुक्त निवडणूक निर्वाचन अधिकाऱ्यांना सादर केले.

✼

काही दिवसांपूर्वी एबीपी माझाने अनिलची मुलाखात दाखवली होती. त्याच्या चेहऱ्यावर आलेली सूज आणि बोलण्यातील जडपणा पाहून सगळ्यांना चर्र झाले होते. अलीकडे घरात पडून इजा झाल्यामुळे बाबाला हॉस्पिटलमध्ये न्यायची वेळ आली तेव्हा लिफ्ट नसलेल्या कृष्णा इमारतीतून खाली उतरवताना चादरीची झोळी करून त्याला न्यावे लागले. थोडे बरे वाटायला लागल्यानंतर परत हॉस्पिटलमधून घरी आणतानाही तसेच झोळीत ठेवून वर न्यावे लागले.

शेवटी पार्थिव नेतानादेखील अंतिम प्रवास तसाच करावा लागला. अंत्यदर्शनाला उपस्थित असलेल्या सर्वांना हे दृश्य पाहणे खूप क्लेशकारक होते.

यंदाच्या प्रजासत्ताकदिनी झेंडावंदनाला बाबा उपस्थित नव्हता. त्याच्या अनुपस्थितीची चर्चा झाली. हॉस्पिटलमधून डिसचार्ज मिळाला. घरी आणले. प्रकृतीमध्ये किंचित सुधारणा आहे असे कळले. त्या रात्रीत बाबा गेला.

✼

बाबाला आपला अंतिम समय आला आहे याची चाहूल लागली होती का? कुणास ठाऊक. पण अनिलच्या अखेरच्या दिवसांत त्याची शेवटची पोस्ट म्हणून 'थांबणं..' हा लेख सोशल मीडियावर वाऱ्यासारखा पसरला. वास्तविक हा लेख अनिलचा नसून त्याचा भाऊ सुभाष याचा आहे. दोघांच्या लेखनशैलीत खरे तर मोठा फरक आहे. पण, या लेखातील हा भाग अनिलचाच वाटावा, इतका फसवा आहे. मात्र हे मनोगत जणू अनिलचेच वाटावे, इतके समर्पक आहे. अनिलच्या नावावर प्रकाशित झालेल्या या ओळींतून बाबा आपल्याला काही संदेश देऊ पाहतो असे वाटते –

आजकाल लोकांना कुठे थांबावे हेच समजत नाही. जीव संपला तरी हावरटपणा जात नाही. छाती फुटेपर्यंत लोक धावत असतात. मागे वळून बघत नाहीत. स्वत:ची पर्वा नसते का..? तर जेवढे कमवता येईल तवढे पदरात पाडून घ्यायचे पण एक दिवस सर्व असूनही सर्व संपल्यासारखे दिवस येतात तेव्हा हातात फक्त निराशा आणि अंधारच दिसतो. ऐश्वर्य येते; पण ते भोगायची मनःस्थिती नसते. मग जीवनभर एवढे पळून काय उपयोग झाला. शेवटी हे सगळे मायाजाल न संपणारे आहे. त्यातून आपणच ठरवून विरक्त होणे केव्हाही चांगलेच..!

विचार करण्यासारखी गोष्ट आहे, पण तेवढापण वेळ आपल्याला नाही..!

**– प्रा. डॉ. किरण ठाकूर**
drkiranthakurgmail.com

ग्रंथाली




**पटावरच्या सोंगट्या**

**चांगदेव काळे**

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

**चाकोरी मांडणारे पुरुष**

**हरीश सदानी**





**मूल्य १५० रु. सवलतीत १०० रु.**



# माझ्या मन:पटलावर कोरलेले पंडित बिरजूमहाराजजी

**सुनीता पुरोहित**

**१७ तारखेची** सकाळ उजाडली आणि सोशल मीडियावर ती बातमी आली! कथकसम्राट पंडित बिरजू-महाराजजी आपल्यात नाहीत. बातमीवर विश्‍वास बसेना. कुठेतरी मनात वाटत राहिले- देवा, ही बातमी खोटी असू दे, पण तसे झाले नाही. कथकप्रेमींचे दैवत बिरजूमहाराजजी आता मंचावर आपले कलाविश्व साकारताना दिसणार नाहीत, दुर्दैवाने हेच सत्य आहे. मन:चक्षूंसमोर महाराजांची अदाकारी तरळू लागली. रंगमंचावरचा त्यांचा दिमाखदार वावर आठवला. त्यांच्या सुरेल नूपुरांचा नाद कानात झंकारू लागला. हस्तक्षेपांचे लाघव मनाला मोहवू लागले आणि आठवले त्यांचे विलक्षण सुंदर नेत्र! समेवर येताना साधलेले संतुलन आणि नजरेची फेक! ओहोहो! जादूगार मोहिनी घालतो ना तसे महाराजजी रंगमंचावरचे जादूगारच होते. सारे वातावरण त्यांच्या अस्तित्वाने भारावून जायचे. काय ती तालतयीवरची बादशहात! तबल्यावर थिरकणारे झाकिरभाईंचे हात आणि महाराजजींचा त्याला आव्हान देणारा पदन्यास! ही जुगलबंदी कधीच न संपावी असे वाटत राहायचे. हा सोहळा ज्यांनी पाहिला, अनुभवला आणि डोळ्यांत साठवला ते खरे भाग्यवान आणि त्या भाग्यवंतांपैकी मी एक! याचा आनंद आज एका डोळ्यांतून वाहतो आहे आणि आता अशी मैफल पुन्हा रंगणार नाही म्हणून दुसऱ्या डोळ्यात अश्रू तरळत आहेत.



कथकसम्राट पंडित बिरजूमहाराजजी

मी महाराजजींना प्रथम पाहिले ते बहुधा बारा-तेरा वर्षांची असताना. माझ्या गुरू पंडिता रोहिणी भाटे यांनी उत्तर प्रदेशची कथक ही मोहक शैली 'नृत्यभारती'द्वारा महाराष्ट्रात आणली, रुजवली आणि सर्वांगाने जोपासली. रोहिणीताईंचे गुरू पंडित लच्छूमहाराजजी आणि पंडित मोहनराव कल्याणपूरकर पुण्यात आले की त्या त्यांना नृत्यभारतीत आमंत्रित करत.

कथकचे सर्वश्रेष्ठ गुरू पंडित कालकामहाराज आणि पंडित बिंदादीनमहाराज यांच्या कुळात बृजमोहन मिश्र म्हणजेच बिरजू-महाराजांनी ४ फेब्रुवारी १९३८ रोजी उत्तर प्रदेशातील हंडिया येथे जन्म घेतला. कालकामहाराजांचे सुपुत्र पंडित अच्छनमहाराजजी त्यांचे पिता तर पंडित लच्छूमहाराजजी आणि पंडित शंभूमहाराजजी त्यांचे काका होत. दुर्दैवाने त्यांना पित्याचा सहवास जास्त काळ लाभू शकला नाही. त्यांचे नृत्यशिक्षण दोन्ही काकांकडे झाले. नृत्यभारतीमध्ये आम्हा विद्यार्थिनींना गुरू रोहिणीताई कोणत्या दिग्गजांचा आविष्कार दाखवत आहेत ते त्या वयात समजत नसले तरी काहीतरी अद्‌भुत आहे, विलक्षण आहे हे जाणवायचे. नृत्यभारतीच्या त्या वास्तूमध्ये या दिग्गजांचा अभिनय पाहता आला. 'कौन गली गयो श्याम' ही एकच ओळ लच्छूमहाराजजी आपल्या अदाकारीने असे रंगवायचे की काळवेळाचे भानच राहत नसे. असे अनमोल क्षण आमच्या गुरूंनी आम्हाला दिले ज्यांचे मोल कधीच करता येणार नाही. नृत्यभारतीची वास्तू गुरू रोहिणीताईंच्या पवित्र हस्तस्पर्शाने आणि अनेक कलाकारांच्या पदस्पर्शाने पवित्र झाली. या नृत्यगंगेचे वैभव,

झळाळी दोन ठिकाणी अनुभवली. एक गुरू रोहिणीताई भाटेंमध्ये आणि दुसरी पंडित बिरजूमहाराजाजींमध्ये! एकाचे तेज चंद्रासारखे शीतल तर दुसऱ्याचे सूर्यासारखे तेजस्वी!

गुरू रोहिणीताईंना महाराजजी दीदी म्हणत असत. त्या दोघांमधला संवाद म्हणजे एका तेजाने दुसऱ्या तेजाची केलेली जणू आरतीच!

कथकचा अभिनय अतिशय तरल आहे. मोठ्या सभागृहामध्ये पाहण्यापेक्षा तो छोट्या मैफिलीत पाहणे म्हणजे पर्वणीच! अशी पर्वणी गुरू रोहिणीताईंमुळे आम्ही अनुभवली. पंडित बिरजूमहाराजजींचा शिष्यवर्ग पुण्यात असल्याने त्यांचे पुण्यात जाणे-येणे असे. ते पुण्यात आले की आमच्या क्लासवर त्यांना आग्रहाचे आमंत्रण असायचेच! तेही मोठ्या आपुलकीने नृत्यभारतीत यायचे. कधी त्यांचा गायचा मूड असायचा. मग ते हातात हार्मोनियम घ्यायचे. त्यांची बोटे मोठ्या नजाकतीने हार्मोनियमवर फिरू लागायची आणि मग आपल्या सुरेल कंठाने ते कितीतरी ठुमऱ्या म्हणून दाखवायचे आणि त्यावर अभिनयही करून दाखवायचे. महाराजजींचे डोळे बोलायचे आणि कृष्णराधेच्या छेडछाडीचा प्रसंग खुलू लागायचा. त्यांच्या डोळ्यांव्यतिरिक्त त्यांचे हस्तकही बोलायचे. आंगिक आणि सात्त्विक अभिनयाचा किती तो सुंदर मेळ! वर्णन करायला शब्द अपुरे आहेत. आमच्यासाठी अशा कलाकारांना पाहणे म्हणजे एक मोठा सण साजरा केल्याचा आनंद असायचा.

दिल्लीमध्ये कालकामहाराज आणि बिंदादीनमहाराज यांच्यासाठी 'कालका बिंदा' नावाने महोत्सव व्हायचा. त्या महोत्सवात आपली संरचना (कोरिओग्राफी) सादर करायला गुरू रोहिणीताईंना आमंत्रण असायचे. गुरू रोहिणीताईंच्या प्रतिभेला अशा वेळी बहर यायचा. या उत्सवात अनेक ठिकाणच्या नृत्यसंस्थांचा सहभाग असायचा. परंतु काहीतरी वेगळे, विशेष रोहिणीताईंच्या प्रतिभेत आहे हे माहीत असल्याने पंडित बिरजूमहाराजजी त्यावेळेस आवर्जून सभागृहात उपस्थित असायचे.

या उत्सवात पारंपरिकतेबरोबरच कालसापेक्ष अशा पंडित बिरजूमहाराजजींनी केलेल्या संरचना आम्हाला पाहायला मिळाल्या. महाराजजी आपल्या शिष्यगणांसाठी स्वत: साथसंगत करायला बसायचे. अशा वेळेस त्यांच्यातील बहुगुणांची जाणीव व्हायची. कधी ते गायचे तर कधी पढंत करायचे, कधी ते तबला वाजवायचे, तर कधी पखावज! सर्व वाद्ये तितक्याच ताकदीने पेलणारी त्यांची प्रतिभा. त्या प्रतिभेचा तो एक चमत्कारच होता.

महाराजजींचे मयूरनृत्य आणि 'शेष फन डगमगत' अप्रतिम! रामाने सीतास्वयंवरात शिवधनुष्याचा भंग केला तेव्हा त्या धनुष्याच्या टणत्काराने क्षीरसागरातील शेषनाग डगमगू लागला. व्यक्तिरेखा मग ती मानवाची असो वा पशुपक्ष्यांची, महाराजजी अशा ताकदीने उभी करायचे की प्रत्यक्ष प्रसंग घडतोय की काय असे वाटून भान हरपून जायचे. तीनताल हा सर्व तालांचा राजा; मात्र महाराजजी जो तीनताल मांडत केवळ अवर्णनीय! कितीही वेळा तोच तीनताल पाहिला तरी समाधान होत नसे. त्यांच्या सादरीकरणाचे ते वैशिष्ट्यच होते. काही गिनती तिहाया त्यांच्या खूप प्रसिद्ध आहेत. त्यात ते पशुपक्ष्यांचा आभास अशा खुबीने आणायचे की त्यातील लयकारीचा आनंद कुणीही घ्यावा. वरवर पाहता अतिशय साध्या वाटणाऱ्या या गिनती कमालीच्या अवघड आहेत हे जाणकारच जाणू शकायचे.

महाराजजी अतिशय साधे होते. नृत्यभारतीच्या काही महोत्सवांना प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित होते. सहजपणे येणार, बडेजाव नाही आणि सहजपणे उत्स्फूर्त भाषण करणार. भाषणही नादमय, शब्दांना लयीच्या खेळात गुंफत केलेले, ऐकत राहावे असे!

गुरू म्हणूनही महाराजजींचे कार्य खूप मोठे आहे. देशविदेशात त्यांचे शिष्यगण महाराजजींचा वारसा चालवत आहेत. त्यांनी कथकच्या शिक्षणपद्धतीत काही बदल केले होते. काही विशिष्ट नृत्यबंध त्यांनी असे बांधले होते की शिष्यांनी त्यांचा रियाज त्याच पद्धतीने केल्यास त्याच्या हस्तक्षेपात लालित्य निर्माण व्हायचे. महाराजजींनी कथक केवळ अनुभवले नव्हते तर त्यांनी त्याची गोडी देशविदेशातील लोकांना लावली. देशविदेशातला असा कोणताही महोत्सव नसेल जेथे त्यांची कला सादर झाली नाही. जाणकारांपासून सामान्य प्रेक्षकांपर्यंत सर्वांना त्यांचे नृत्य आकर्षून घेत असे. सिनेक्षेत्रातही नृत्यदिग्दर्शन करून कथकला एक नवा आयाम त्यांनी दिला. कथकशैलीला लोकप्रिय करण्यात महाराजजींचा वाटा फार फार मोलाचा आहे.

सर्वांशी सारखेपणाने वागण्याचा महाराजजींचा स्वभाव होता. त्याची एक सुंदर आठवण माझ्यापाशी आहे. पंडित नंदकिशोर कपोतेंनी कथक कलाकारांचा सत्कार महाराजजींच्या हस्ते ठेवला होता. त्यावेळी माझ्या नृत्यविषयक अनुभवांवर आधारित कवितांपैकी एक कविता 'एक टुकडे की गुनगुन' एका कागदावर लिहून त्यांना भेट म्हणून दिली तीच मोठ्या धाडसाने! मला वाटले महाराजजी कशाला बघतील माझ्यासारख्या सामान्य कलाकाराची कविता! पण महाराजजींनी तत्क्षणी ती कविता विंगेत जाऊन वाचली आणि पुन्हा पुन्हा सांगितले, 'कविता बहुत ही सटीक है और सुंदर भी!' मी त्यांचे हे शब्द मनात जपून ठेवले आहेत.

महाराजजींना अनेक पुरस्कार मिळाले. पद्मविभूषण पुरस्काराने भारत सरकारने त्यांना गौरवले. वयाच्या सहाव्या वर्षापासून त्र्याऐंशीव्या वर्षापर्यंत रसिकांना आनंद देणारे महाराजजी आज आपल्यात नाहीत असे कसे म्हणावे? त्यांच्या शिष्यवर्गाने, जाणकार वर्गाने आणि रसिक प्रेक्षकांनी त्यांचा नृत्याविष्कार आजही मनामनात साठवला आहे. त्याचा अनुभव त्यांना, आम्हाला पुन्हा पुन्हा येत राहणार आणि येत राहील आणि सदैव ते त्यांच्यासमोर नतमस्तकच होतील.

गुरू रोहिणीताईंच्या ज्येष्ठ शिष्या आणि माझ्या गुरुभगिनी रोशन दाते यांनी मला हा लेख लिहायला उद्युक्त केले आणि अतिशय अवघड वाटलेला हा लेखनप्रपंच माझ्या गुरूंच्या आशीर्वादाने आणि महाराजजींच्या स्मरणाने साकारला.

महाराजजींना माझे शतशत प्रणाम!


**– सुनीता पुरोहित**

sudeepdpurohit1090@gmail.com



# विवेकी योद्धा

**विजय चोरमारे**



प्रा. एन.डी. पाटील

**सांगली** जिल्ह्यातील वाळवे तालुक्यातल्या ढवळी या छोट्या गावात, सामान्य शेतकरी कुटुंबात एन.डी. पाटील यांचा जन्म झाला. त्यांचे आजोबा, वडील शेतकरी होते. दोघंही अशिक्षित होते. आजोबा-रामजी पाटील प्रतिष्ठित शेतकरी म्हणून त्यांचा गावात लौकिक होता. गावातला कुणाचा तंटा मिटवायचा असेल तर रामजी पाटलांची गरज लोकांना वाटायची. आजोबांना दोन मुलं. घरातला सगळा कारभार त्यांचे आजोबाच बघायचे. वडील सतत शेतातच असायचे. शेती आणि कष्ट यातच त्यांचा जन्म गेला.

ढवळी गावात मुसलमानाचं घर नाही, पण गावात पीर आहे. सगळे गावकरी त्याचा उरुस करायचे. त्या उरुसाच्या तमाशात गावातल्या दोन गटांत तणाव झाला. बसण्याच्या जागेवरून वाद झाला. काही दिवसांनी त्यावरून गावातल्या एका प्रतिष्ठित माणसाचा खून झाला. प्राथमिक शाळेत असलेल्या नारायणच्या मनावर त्याचा परिणाम झाला. गावात आपली काही जबाबदारी आहे, म्हणून त्यानं पहिलं पाऊल टाकलं आणि ठरवलं की गावात उरुस होऊ द्यायचा नाही. एन.डी. पाटील यांनी ही कल्पना मांडली तेव्हा ते शाळकरी विद्यार्थी होते. गावात सगळ्यांना भेटून भेटून सांगत होते, कशाला भांडणं करायची. खून झाला आहे, त्यातून सूडाचा प्रवास चालू राहणार, गाव शांत कसं राहणार, वगैरे. त्या अर्थानं विचार केला, तर एन.डी. पाटील याचं पहिलं सार्वजनिक काम कुठलं असेल तर गावानं उरुस बंद केला. दोन्ही गटांतील ताणतणाव कमी झाला.

सांगली जिल्ह्याची राजकीय क्षेत्रातही मोठी आघाडी होती. क्रांतिसिंह नाना पाटील, शिगावचे रंगरावदादा, पांडूमास्तर, नागनाथअण्णा नायकवडी अशी लढवय्यी मंडळी होती. नाना पाटलांवर दहा हजारांचं बक्षीस होतं. पांडूमास्तरांवरही पाच हजारांचं बक्षीस होतं. अशा सामाजिक जागृतीच्या प्रकाशात एन.डी. पाटील यांची सार्वजनिक जीवनातली पावलं पडत होती. कौटुंबिक वारसा नसला तरी असा अवतीभोवतीच्या वातावरणाचा मोठा परिणाम होत होता.

चुकीच्या गोष्टींचा राग येणं, दांभिकतेची चीड येणं हा एन.डी. पाटील यांचा स्वभाव तरुणपणापासूनच होता. त्याचमुळे राजाराम कॉलेजमध्ये शिकत असताना त्यांनी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. ना.सी. फडके यांच्याविरोधात भूमिका घेतली होती. प्रा. फडके यांच्याबाबतीत एन.डीं.चं म्हणणं असं होतं, की कोल्हापूरच्या वातावरणात अनेक वर्षं राहूनही, कोल्हापूरची नस समजून घेऊनही त्यांनी चुकीच्या भूमिका घेतल्या. विशेषतः बहुजन समाजाबद्दल त्यांच्या मनात शुष्क कोरडेपणा होता. राजाराम कॉलेजचे प्राचार्य असलेल्या डॉ. अप्पासाहेब पवारांची बदली झाली. तत्कालीन बऱ्याच राजकीय घडामोडी त्याला कारणीभूत होत्या. जिथे शासकीय कॉलेज असेल तिथे बदली

होणार, त्यानुसार त्यांची बदली उत्तर गुजरातमध्ये वीसनगरला झाली, एकदम आडबाजूला. तिथे ते रुजू झाले. ना.सी. फडके तेव्हा राजाराम कॉलेजमध्येच प्राध्यापक होते. ते तेव्हा 'झंकार' साप्ताहिक चालवत. अप्पासाहेब पवारांची बदली झाल्यानंतर झंकारमध्ये त्यांनी अप्पासाहेब पवारांवर गरळ ओकणारा लेख लिहिला. 'राजाराम कॉलेजची परंपरा वगैरे लिहिली. बाळकृष्णांच्या काळात कॉलेज सर्वोत्तम गणलं जायचं. खर्डेकरांनंतर थोडीफार उतरती कळा लागली. खर्डेकरांनंतर डॉ. पवार या नावाचे गृहस्थ अनेक खटपटी लटपटी करून प्राचार्यपदावर आले. त्यांनी राजाराम कॉलेज हा मराठा विद्यार्थ्यांचा अड्डा बनवला,' असा मजकूर त्यात होता. मराठा विद्यार्थ्यांसाठी पिण्याचं पाणी तेवढं स्वतंत्र ठेवण्याचं या गृहस्थांनी बाकी ठेवलं होतं, असं अप्पासाहेबांबद्दल लिहिलं होतं.

राजाराम कॉलेजमध्ये शेकडो विद्यार्थी होते, परंतु ना.सी. फडके यांच्या लिखाणाचा एन.डी. पाटील यांना प्रचंड राग आला. त्याचा प्रतिवाद करणारा लेख त्यांनी शं.बा. भोसले यांच्या 'लोकसेवक'मध्ये लिहिला. फडक्यांच्या लेखाची आणि त्यातल्या मुद्यांची चिरफाड केली. ते केवळ लेख लिहूनच थांबले नाहीत, तर फडके यांच्या निषेधाची सभा कोल्हापूरच्या नगरपालिकेच्या हॉलमध्ये घेतली. अप्पासाहेब पवार यांच्याविरोधात लिहिलं हे निषेधाचं कारण नव्हतं, तर अप्पासाहेब पवारांची बदली झाल्यावर त्यांनी लिहिलं, हे कारण होतं. अप्पासाहेब कोल्हापुरात असताना लिहिलं असतं तर मला आक्षेप घेण्याचं कारण नव्हतं, असं एनडींचं म्हणणं. अप्पासाहेब प्राचार्य असताना फडके म्याव मांजर होते. कधी हुंकार काढला नव्हता. बदली झाल्यावर 'झंकार' निघू लागला याचा त्यांना विशाद वाटत होता. अप्पासाहेबही शिक्षक, फडकेही शिक्षक. परंतु फडके यांनी लिहिलेलं आवडलं नाही म्हणून त्यांनी जाहीर भूमिका घेतली. आपल्या बदली झालेल्या प्राचार्यांच्या बाजूनं सध्याच्या प्राध्यापकांच्या विरोधात भूमिका घेतली. निषेधसभेला विद्यार्थी, अनेक प्रतिष्ठित मंडळी आली होती. सगळ्यांनी फडक्यांच्या वर्तनाचा निषेध केला.

डाव्या पक्षांच्या आणि कष्टकऱ्यांसाठी काम करणाऱ्या संघटनांच्या स्वतंत्र राहुट्या हा एनडींची काळजी वाढवणारा विषय होता. सगळ्यांनी एकत्रित लढायला पाहिजे, असा त्यांचा आग्रह असायचा. असे कष्टकरीसमूह एकत्र येण्याची शक्यता दिसली की त्यांना खूप आनंद व्हायचा. मधल्या काळात असे वेगवेगळे घटक एकत्र येऊ लागले तेव्हा त्यांना ती काळ्या ढगाची चंदेरी झालर वाटायला लागली. सारे आदिवासी एकत्र येताहेत; सारे मच्छीमार एकत्र येताहेत; गायरानावर आक्रमण केलेले दलित सगळे एकत्र येताहेत; शेतकरी-शेतमजूर एकत्र येताहेत; आज कमी संख्येनं ते एकत्र येत असतील, पण आता शेतमजूर-शेतकऱ्यांमधली जागृती वाढायला लागलेली आहे, याबद्दल त्यांना खूप आनंद वाटायचा. कष्टकऱ्यांच्या या लढ्याला सर्व राजकीय पक्षांनी आपली ताकद लावली आणि सर्वांत उपेक्षित वर्ग आहेत त्यांचे भिजत पडलेले प्रश्न आज आम्ही टोकाला आणण्यासाठी ताकद लावली तर वातावरणनिर्मिती होईल आणि त्या वर्गांना एक मायेची ऊब, दिलासा मिळेल, असं ते म्हणायचे. माझ्या प्रश्नासाठी मलाच लढलं पाहिजे असं नाही. माझ्या प्रश्नासाठी लढणाऱ्या अन्य काही शक्ती आहेत की ज्यांची मदत मला उपकारक ठरावी, त्या शक्तीदेखील घेऊन लढू शकतो. हे सारे वर्ग एकत्र आले तर एक चांगली शक्ती राज्यकर्त्यांच्या विरोधात उभी राहू शकेल, असं त्यांचं मत होतं. पुढे एन्रॉनविरोधातला लढा, कोल्हापूरचा टोलविरोधातला लढा यामध्ये त्यांनी अशा सगळ्या शक्तींना एकत्र आणून लढा यशस्वी करून दाखवला. रायगडच्या सेझविरोधातला लढा हाही त्यांच्या झुंझार वृत्तीचाच निदर्शक होता.

रस्त्यावरचा संघर्ष करूनही, सामान्य माणसांच्या प्रश्नांसाठी लढे उभारूनही डाव्या शक्तींना निवडणुकीच्या राजकारणात लोकांनी साथ दिली नाही. त्याबद्दल त्यांच्या मनात खंत होतीच, परंतु ते वास्तव त्यांनी मान्य केलं होतं. संसदेत किंवा विधिमंडळात डाव्या पक्षांचे प्रतिनिधी नसल्याबद्दल त्यांची कुचेष्टा केली जायची. त्यासंदर्भात एनडी म्हणायचे, तुम्ही कितीही वल्गना केल्या तरी रस्त्यावर बहुमत आमचंच आहे आणि त्या बहुमताच्या जोरावर आम्ही तुम्हाला लोकविरोधी निर्णय मागे घ्यायला भाग पाडू. चित्रही तसंच होतं. रस्त्यावरच्या बहुमताच्या बळावर त्यांनी अनेक लढे यशस्वी करून दाखवले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रयत शिक्षण संस्थेतून पदवीधर झाल्यानंतर एनडी पाटील संस्थेतच काम करायला लागले. पुढे संस्थेचं काम सोडून मुंबईला गिरणी कामगार चळवळीचं काम करायला गेले. कर्मवीरअण्णांनी स्वतः रयत शिक्षण संस्थेवर मेंबर म्हणून त्यांना घेतलं. कर्मवीरअण्णा दवाखान्यात असताना त्यांनी संस्थेला पत्र पाठवून एनडी पाटील यांना संस्थेवर घेण्यास सांगितलं, त्यानंतर पाच-सहा दिवसांनी अण्णांचं निधन झालं. एका अर्थानं एनडींसारखा जबाबदार माणूस संस्थेवर आणला आणि मगच त्यांनी जगाचा निरोप घेतला. या घटनेला अनेक अर्थांनी महत्त्व आहे. अण्णांनी निधनाच्या आधी पाच-सहा दिवस तसं पत्र लिहिलं नसतं, तर एनडी पाटील रयत शिक्षण संस्थेवर आले असते का आणि पुढे दीर्घकाळ रयतवर त्यांचा जो नैतिक धाक आणि अधिकार राहिला तो राहिला असता का, असे जर-तरचे अनेक प्रश्न उपस्थित होतात. रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष म्हणून एनडी पाटील यांनी दीर्घकाळ काम केलं. कर्मवीरअण्णांनी ज्या चारित्र्यसंपन्न जीवनाचा, शिक्षणाचा आग्रह धरला तो त्यांनी पुढे नेला. रयतची प्रतिमा अधिक उंचावण्याचा प्रयत्न केला.

एनडींचं बरंचसं आयुष्य रस्त्यावरच्या संघर्षात गेलं. शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता, नेता या नात्यानं अनेक लढ्यांत, निदर्शनांत, मोर्च्यांत, धरणं धरण्याच्या व घेरावाच्या कार्यक्रमांत भाग घेतला. अनेकदा तुरुंगवास भोगावा लागला. पोलिसांच्या लाठ्या झेलल्या. अनेक निदर्शनांचं व मोर्च्यांचं नेतृत्व त्यांनी केलं.

२८ मार्च १९६९ रोजी मुंबईच्या विधानसभेवर सीमाप्रश्नासाठी म्हणून हजारो लोकांचा मोर्चा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीनं नेण्यात आला होता, त्या मोर्च्याचं नेतृत्व एनडींनी केलं. पोलिसांनी जारी केलेली बंदीरेषा ओलांडून जाऊन व आपल्या सहकाऱ्यांसह त्यांनी अनेकदा अटक करवून घेतली. अनेक प्रसंगी शांतपणे व कर्तव्यबुद्धीनं पोलिसांच्या लाठ्यांचा मार खाल्ला. लढ्यांच्या प्रसंगी हाडाच्या सत्याग्रही कार्यकर्त्याला साजेल असंच वर्तन त्यांनी केलं. महाराष्ट्राच्या विधानसभेवर लाख लाख शेतकरी-शेतमजुरांचे मोर्चे नेले. मात्र राजकीय हेतूनं प्रेरित होऊन व्यक्तिगत स्वार्थासाठी अशी आंदोलनं त्यांनी कधी केली नाहीत. आजच्या काळात अशी बहुतांश आंदोलनं केवळ राजकीय हेतूनं केली जातात, तेव्हा एनडींच्या लढ्यांचं वेगळेपण मनावर ठसल्यावाचून राहत नाही.

१९७२च्या दुष्काळातला इस्लामपूर तहसील कचेरीवर काढलेला मोर्चा ही एनडींच्या सार्वजनिक जीवनातली एक महत्त्वाची घटना म्हणून नमूद करावी लागेल. त्या काळात ते दुष्काळाची परिस्थिती समजून घेण्यासाठी गावोगावी फिरत होते. ज्या गावातून रोजगार हमी योजनेची कामं चालू होती, त्या कामावर त्या-त्या गावातील स्थानिक मजुरांनाच पुरेसा कामधंदा मिळत नव्हता. बहुसंख्य गावांतून कामंच काढण्यात आली नव्हती. त्यामुळे त्या त्या गावांतील व परिसरातील गरजू लोकांना शासनातर्फे कोणतंही काम मिळालं नव्हतं. सुरू केलेली कामं संपण्यापूर्वी नव्या कामांची आखणी केली जात नव्हती. त्यामुळे कामामध्ये खंड पडून मजुरांवर सक्तीची बेकारी लादली जात होती. अनेक लोक कामाच्या ठिकाणी जाऊनही काम मिळत नसल्यानं परत येत होते. अशा सर्वच लोकांना त्यांच्या तक्रारी घेऊन बी.डी.ओ. किंवा तहसीलदार यांच्याकडे जाणं शक्य नव्हतं. २ ऑक्टोबर १९७२ रोजी सकाळी स्कूटरवरून एनडी एकटेच बावचीला निघाले असताना रस्त्यात अनेक लोक खांद्यावर कुदळी, फावडी टाकून परत गावात येत असताना त्यांना दिसले. चौकशी केली तेव्हा समजलं, की आष्टा-वाळवा रस्त्यावर कामासाठी गेलेल्या बावचीच्या सुमारे दोनशे लोकांना काम देता येत नाही, म्हणून परत पाठवण्यात आलं होतं. एनडींनी आपली स्कूटर रस्त्याकडेलाच एका वगळीत लावली आणि त्यांच्यापैकी पाच-सहा जणांना कुदळी फावड्यांसहित सोबत घेऊन त्यांची तक्रार बी.डी.ओ. पंचायत समिती, वाळवा यांच्या कानावर घालण्यासाठी पंधरा मैल पायी चालत इस्लामपूरला गेले.

त्यातूनच पुढे इस्लामपूर तहसील कचेरीवरचा दुष्काळग्रस्तांचा भव्य मोर्चा निघाला. सनदशीर मार्गानं आणि शांततेत निघालेल्या या मोर्च्यावर पोलिसांनी लाठीमार, गोळीबार केला. त्यात तीन तरुणांचा बळी गेला. एनडी पाटील यांचा सख्खा पुतण्या सुरेश, याच्यासह रंगराव पाटलांचा मुलगा राजेंद्र आणि दिलीप निलाखे हा शाळकरी विद्यार्थी, अशा तिघांचे बळी गेले. पहाडासारख्या एनडींचं हृदय पिळवटून टाकणारी ही घटना होती. ज्या मोर्च्याचं आपण नेतृत्व केलं त्यावर गोळीबार होऊन काही कोवळे जीव त्यामध्ये निष्कारण बळी पडले, या गोष्टीचा त्यांच्यावर फार मोठा आघात झाला.

अलीकडच्या काळात संघर्षाला हिंसाचाराची जोड दिल्याशिवाय त्याची दखल घेतली जात नाही त्यामुळे समूहांना हिंसेसाठी प्रवृत्त केलं जातं. परंतु एनडी पाटील अशा गोष्टींच्या ठाम विरोधात होते. सत्याग्रह शांततेच्या मार्गानंच व्हायला हवा, असा त्यांचा आग्रह असे. चार दगड फेकून काहीतरी बदल होईल, असं मानणाऱ्यांपैकी ते नव्हते. त्यांचा विश्वास संख्याबळावरच होता. संख्याबळ आणि काम करत असताना संयम महत्त्वाचा, असं ते मानत. आपल्याला जे नैतिक बळ मिळतं ते हिंसक प्रकारानं मिळत नाही, यावर त्यांचा दृढविश्वास होता.

त्यांना या वास्तवाची जाणीव होती, की आपल्यापेक्षा सरकारची दमनशक्ती अधिक आहे. तेव्हा हिंसेला हिंसेनं उत्तर देणं हे काही ठीक नाही. सरकार लाठीहल्ला करतं, तेव्हा हिंसेनं त्याला प्रत्युत्तर न देता संख्याबळाच्या आधारानं आपल्या प्रश्नांवर, आपल्या विचारांवर ठाम राहणं, हे खरं उत्तर असल्याची त्यांची धारणा होती. तुमच्या लाठीहल्ल्याला, गोळीबाराला आम्ही काही भीक घातलेली नाही, आम्ही अजूनही आमच्या भूमिकेवर ठाम आहोत, हे आपल्या प्रत्येक कृतीतून दाखवणं हेच खरं उत्तर. दमनशक्तीचा विचार केला तर आपल्यापेक्षा सरकारकडे दमनशक्ती अधिक आहे, या वास्तवाचं भान त्यांनी कधी सुटू दिलं नाही. म्हणून त्याविरुद्धची लढाई सोडली नाही किंवा त्या दमनशक्तीपुढे कधी कच खाल्ली नाही. एनडींना माहीत होतं की कुठेतरी दगड मारून चळवळ पुढे जात नाही. प्रश्न सुटत नाहीत. प्रश्न सुटायचे असतील, चळवळ पुढे न्यायची असेल; तर सोबत विचारानं पक्की असलेली निष्ठावान माणसं असावी लागतात. त्यांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता विचारांवर पक्की निष्ठा ठेवून एकत्र वाटचाल केली पाहिजे. अशी माणसं सोबत असतील, तर चळवळ करणाऱ्याला भिण्याचं अजिबात कारण नाही, असं त्यांचं म्हणणं होतं. हिंसेला हिंसेनं प्रत्युत्तर, हे कुठल्याही प्रश्नावरचं समर्पक उत्तर होत नाही. चळवळीत काम करत असताना उभ्या आयुष्यात आपण हिंसाचाराचा प्रचार कधी केला नाही. मी संयमानं चालणारा, संख्याबळावर चालणारा, त्यावर विश्वास ठेवणारा माणूस आहे, असं ते जाहीरपणे सांगत.

लोकशाही मूल्यांवर श्रद्धा असलेला, नैतिक ताकदीच्या बळावर बलशाली सत्तेवर अंकुश ठेवणारा योद्धा एन.डी. पाटील यांच्या निधनानं काळाच्या पडद्याआड गेला आहे.

**– विजय चोरमारे**
vijaychormare@gmail.com



# मनस्वी मित्र...

## कुमार केतकर

**एकाच** आठवड्यात जवळचे दोन मित्र गेले. कुमार नवाथे १३ जानेवारीच्या सकाळी आणि अरुण जाखडे १६ जानेवारीच्या पहाटे. विशेष म्हणजे ते दोघेही एकमेकांचे जवळचे स्नेही होते.

कुमार नवाथे गेल्याचे मीच अरुण जाखडेंना कळवले होते. कुमार सर्वंकष कलासक्त आणि अरुण व्यासंगी साहित्यासक्त. आम्हाला जोडले गेले होते पुस्तकांनी. एखादा दारुसक्त बारमध्ये गेल्यावर मग्नावस्थेत जातो तसे कुमार पुस्तकांच्या दुकानात धुंद झालेले दिसत. दुकान कुठचेही असो, लंडनमधले वा मुंबईतले. तर अरुण जाखडे म्हणजे जुनी व दुर्मिळ पुस्तके आवर्जून विकणारे वा नवी, नुकतीच प्रसिद्ध झालेली पुस्तके उत्साहाने दुकानात ठेवणारे, पुस्तके प्रकाशित करताना त्यात व्यवहार न पाहणारे. नफा-तोटा-उत्पादनखर्च, वितरण, वसुली याबद्दल बव्हंशी बेफिकीर. एखादा लेखक, विचारवंत, कवी लोकांपर्यंत जायला हवा यासाठी आकाशपाताळ एक करणारे. त्या पुस्तकाला मागणी आहे की नाही, वगैरे बाबी गैरलागू. मग ते र.धों. कर्वेंचे साहित्य असो, श्री.व्यं. केतकरांची ग्रंथसंपदा असो वा गणेश देवींचे भाषा-संशोधनविषयक प्रबंध वा संशोधन असो. प्रकाशन व्यवसायात असूनही प्रसिद्धीचा लोभ नाही. देखणे आणि दर्जेदार दिवाळी अंक दरवर्षी प्रसिद्ध करूनही ('पद्मगंधा' आणि 'अनुवाद') आणि त्यातही प्रयोगशीलता दाखवूनही (हल्लीची प्रचलित संज्ञा 'इनोव्हेशन') जाखडे कधी प्रकाशझोतात येण्याचा प्रयत्नही करत नसत. किंबहुना तशा 'सेलिब्रिटी' वर्तुळापासून चार हात दूरच असत. ते फक्त प्रकाशक नव्हते तर स्वत: लेखक-स्तंभलेखकही होते.



कुमार नवाथे

त्यांच्या स्तंभलेखनात त्यांचे बालपण, ग्रामीण जीवनातील शांत, हालचालशून्य नीरवता आणि त्या वातावरणात निर्माण होणारा नर्मविनोद असे सर्व काही असे. त्याचप्रमाणे अगदी हॉलीवूड-बॉलीवूडचे संदर्भही तितक्याच सहजतेने येत. (राम जगताप यांनी 'अक्षरनामा'मध्ये जाखडे यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांची साहित्यजाण याचे अत्यंत नेमकेपणाने वर्णन केले आहे. त्यांचा तो लेख अंकात पुढे घेतला आहे.)

कुमार नवाथे 'सेलिब्रिटी' नसले तरी मराठी कलाक्षेत्रातील तमाम सेलिब्रिटी त्यांच्या दाट वर्तुळात असत. यशवंत देव, मंगेश पाडगावकर, अरुण दाते, मोहनदास सुखटणकर, मीना प्रभू यांच्यापासून नारायण सुर्वे, माधव गडकरी, मोहन आगाशे, रवींद्र साठे, दिनकर गांगल अशी मांदियाळी सांगायची झाली तर त्याची एक स्वतंत्र टेलिफोन डिरेक्टरीच तयार होईल. फक्त कलासक्तच नव्हे तर समाजसक्तसुद्धा. विविध सामाजिक-सांस्कृतिक चळवळींशी संबंध आणि त्यांच्याविषयीची आस्था - राष्ट्रसेवा दलापासून अगदी ग्रंथालीपर्यंत.

राजकारण आणि इतिहास यांसारख्या बाबी या कलासक्त माणसाला वर्ज्य नव्हत्या. म्हणूनच नाझी भस्मासुराचा क्रौर्यप्रवास ज्या नरसंहारामुळे जगासमोर आला त्याचे ऐतिहासिक वर्णन आणि निरुपण करण्यासाठी नवाथेंनी जर्मनी, पोलंड आणि एकूणच युरोपचा

दौरा केला. भरपूर दस्तऐवज जमा केला. त्यातूनच 'नाझी नरसंहार' हे पुस्तक (ग्रंथाली) निर्माण झाले. त्याचे इंग्रजी भाषांतरही 'द डेथ फॅक्टरी' या नावाने अरुण जाखडेंच्या पद्मगंधा प्रकाशनने प्रसिद्ध केले. त्या पुस्तकाचे स्वागत युनिस डिसूझा या ख्यातनाम इंग्रजी समीक्षिकेने केले आणि त्यामुळे नवाथेंच्या संशोधनाला इंग्रजी ग्रंथवर्तुळातही दाद मिळाली होती.

परंतु या लौकिक गोष्टी झाल्या. कुमार नवाथेंच्या सहवासात आलेल्या माणसांना त्यांच्या निर्मळ, नि:स्पृह आणि निर्व्याज स्वभावाचा असा स्नेहस्पर्श होत असे, की खडीसाखरेला मोठ्या ग्लासमध्ये विरघळताना जसे त्या खड्याला किंवा पाण्याला वाटेल तसे आपल्याला वाटत असे. कुमार आपल्या जीवनात तसेच विरघळत असत.


त्यांच्या त्या वृत्तीमुळेच त्यांना क्रौर्य, हिंसा, अविचार आणि कुविचार माणसाच्या मनात येतातच कसे असा प्रश्न पडे. त्यातूनच त्यांनी हिटलरच्या नरसंहाराचा शोध आणि वेध घेतला. त्याचप्रमाणे नंतर त्यांनी कंबोडियाला जाऊन पोल पॉटच्या महाभयंकर अशा अत्याचार-हत्याकांडाचाही शोध घेऊन त्यावरही पुस्तक लिहिले.


हा सोस पुस्तक लिहिण्याचा नव्हता. तर मानवी क्रौर्याचा शोध घ्यायचा त्यांचा मनस्वी प्रयत्न होता. विशेष म्हणजे स्वत: अगदी पूर्णपणे अहिंसक वृत्तीच्या, सहिष्णू स्वभावाच्या आणि मार्दवाने वागणाऱ्या माणसाला 'हिंसा' या विषयाचे इतके आकर्षण वाटावे आणि त्याचा शोध घेण्यासाठी त्याने स्वखर्चाने जगाची भटकंती करावी, हाच कुणाला विरोधाभास वाटावा.

म्हटले तर राजकारणापासून दूर आणि खरे तर राजकारणाच्या गाभाऱ्यापर्यंत असे त्यांचे वैचारिक व्यक्तिमत्त्व होते. नथुराम गोडसे ही फक्त व्यक्ती नाही तर आपल्या समाजातली रुजत चाललेली प्रवृत्ती आहे आणि तोच धोका आहे, असे त्यांना मनापासून वाटत असे. म्हणूनच हिंदुत्ववादी विचारसरणी आणि हिंसा यातील जवळचे नाते त्यांना अस्वस्थ करत असे.

ते आपल्यातून जाण्यापूर्वी काही दिवस हरिद्वार येथे एक 'धर्मसंसद' भरली होती. त्या संसदेत स्वयंभू आध्यात्मिक साधू मंडळींनी 'देशातील सर्व मुसलमानांची कत्तल केली पाहिजे' आणि 'तत्पूर्वी सर्व सामाजिक, व्यापारी आणि सांस्कृतिक व्यवहारातून तमाम मुस्लिमांना दूर केले पाहिजे' असे आवाहन त्या हरिद्वारच्या सभेत खुलेआम केले होते. परंतु केवळ बहिष्कारापुरतेच न राहता त्यांच्या हत्याकांडाचा 'यज्ञ'च करायला हवा असे या साधूंनी जाहीर म्हटल्यानंतर, त्या हिंसक आवाहनाचा दूरचित्रवाणीवरून व विशेषत: सोशल मीडियावरून त्याचा बेधडक प्रचार केला. त्यानंतरही पंतप्रधान नरेंद्र मोदींपासून अगदी स्थानिक, प्रादेशिक, राज्यपातळीवरील भाजप नेत्यांनी व संघपरिवाराने त्याचा निषेधही केला नव्हता. परंतु निषेध नव्हे तर त्यांच्यावर थेट पोलीस कारवाई करायची गरज होती. सर्वोच्च न्यायालयाने मुळमुळीत स्वरूपाचा आदेश दिल्यानंतर चार-दोन साधूंना पोलिसांनी ताब्यात घेतले होते.

हे सर्व पाहून स्वस्थचित्ताचा हा माणूस उद्वेगाने मला फोनवर




म्हणायचा, 'कुमार, काय चाललंय काय?' या हरिद्वार धर्मसंसदेत हिटलरवादाचे धोकादायक चित्र त्यांना दिसत असे. पण अशी त्यांची धारणा असूनही कट्टर मोदीभक्त त्यांच्याशी 'विसंवाद-युक्त संवाद' करत असत. त्यांचे संबंध तुटले नसले तरी कुमारना नेहमी आश्चर्य वाटत असे की अशा हिंस्र राजकारणाला आपल्याच नात्यातली व मित्र-वर्तुळातली माणसं समर्थन कशी देऊ शकतात?

नवाथे कोणत्याही राजकीय पक्षाचे नव्हते. कोणत्याही अर्थाने ते धार्मिक नव्हते. आध्यात्मिकता, पूजा-पाठ, भजन-कीर्तन, देऊळभेटी, सनातनी सत्संग, अंगठ्या, गंध असे काहीही त्यांच्या दिनचर्येत नव्हते. ते 'नास्तिक'वादाचा अहंकार बाळगत नसत, पण आस्तिक तर ते नव्हतेच. लहान व तरुण वयात राष्ट्रसेवा दलाचा संस्कार आणि सहवास लाभल्यामुळे असेल कदाचित, कुमारची काही दैवते होती. देव नाही पण 'दैवते'! आणि 'दैववादी' नसूनही काही माणसांवर नितांत श्रद्धा. मित्रवर्तुळ अक्षरश: प्रचंड आणि मित्रांवरचे प्रेम अजोड.

मित्र कोणत्याही अडचणीत असेल, आर्थिक वा कौटुंबिक, सामाजिक वा व्यावहारिक वा मानसिक - कुमार त्या अडचणीतून त्याला बाहेर काढण्यासाठी जे जे शक्य आहे ते करत असत. त्यात नारायण सुर्वे असोत वा मंगेश पाडगावकर, लीलाधर डाके असोत वा अगदी माधव गडकरी.

त्यांच्या अफाट आणि व्यक्तिगत मित्रवर्तुळामुळे ते कायम अशा प्रश्नांनी व्यग्र असत. पण, त्या व्यग्रतेचा त्यांच्या वागण्यात वा एकूण भटकंतीमध्ये फरक पडत नसे.

भटकंती हा तर कुमार यांचा 'धर्म' होता. आम्ही एकत्र इस्तंबूल, लंडन असो वा खंडाळा, पुणे ते अगदी अलिबाग-औरंगाबाद असे भटकलो आहोत.

लंडनमधील पब आणि बार यांबद्दल एक विलक्षण रोमॅन्टिक आकर्षण कुमारना होते. गंमत म्हणजे ते कोणत्याही अर्थाने दारूच्या आहारी गेले नव्हते-गेलेही नसते. कारण बीयर किंवा दर्जेदार व्हिस्की हे कुमारचे गप्पाष्टक, चर्चा, विनोद या गोष्टींचे माध्यम होते. विविध प्रकारच्या ग्रुपना, व्यक्तींना, रसिकांना एकत्र आणून

त्यांच्याबरोबर सांस्कृतिक आनंदात वेळ घालवणे (बहुतेकवेळा स्वखर्चाने!) हा त्यांचा छंद त्यांनी शेवटपर्यंत जपला.

परंतु कुमार प्रचलित 'कलासक्त' नव्हते. लोकांपासून फटकून (वा तुसडेपणाने) राहून 'कलासक्त' मंडळींची आत्मगुंजनी जीवनशैली असते. कुमार समाजाभिमुख होते, पण त्यांच्यात 'पारंपरिक पुरोगामित्वही नव्हते. हळवेपणा हे त्यांच्या मनाचे व्यवच्छेदक लक्षण होते. त्यांची पत्नी रेखा, मुलगी सोनल आणि तिच्या दोन्ही मुली हा त्यांच्या मनाचा हळवा कोपरा होता- खरे तर कोपरा नव्हता, तो एक मोठा कोनाडा होता. आणखी एक व्यक्ती त्यांच्या कुटुंबाइतकीच कुमारच्या जीवनाची अविभाज्य घटक होती, ती म्हणजे लता मंगेशकर. लताचे प्रत्येक गाणे, प्रत्येक अदा, प्रत्येक चित्र-चरित्र, आठवणी हे सर्व कुमारच्या जीवनाचे अभेद्य घटक होते. कुमार 'सिलोन रेडिओ'च्या व्यवस्थापकांना भेटण्यासाठी (स्वखर्चाने) कोलंबोला गेले होते. त्यांचे 'बंद पडू लागलेले' (व तशी घोषणा केलेले) केंद्र कुमार यांच्यामुळे पुन्हा सुरू झाले. ज्या गाण्यांना आपण 'जुनी गाणी' म्हणतो ती १९५०च्या अलिकडची आणि नंतरची गाणी हा कुमारच्या मनोविश्वाचा आणि स्मृतिरंजनाचा भाग होता.


असे खूप लिहिता येईल. गेल्या सुमारे तीन दशकांच्या आमच्या आठवणींनी मनाचे सेफ डिपॉझिट लॉकर गच्च भरलेले आहेत.

असा हा मनस्वी मित्र आणि अरुण जाखडेंसारखा आमचा सुसंस्कृत स्नेही आणि सामाजिक संवेदना असलेला; स्तंभलेखन करणारा आणि प्रकाशनांद्वारे ती संवेदना टिकवू पाहणारा प्रसिद्धीपराङ्मुख माणूस आपल्यातून गेल्यामुळे अगोदरच पडलेला सांस्कृतिक दुष्काळ अधिकच गडद झाला आहे. या दोन्ही संस्कृतिसंपन्न मित्रांना श्रद्धांजली वाहण्यासाठी त्यांचा अलिखित वारसा जपण्याची जबाबदारी आपली आहे.

**– कुमार केतकर**

ketkarkumar@gmail.com

ग्रंथाली




# बखर घारापुरीची

**रवींद्र लाड**

श्री. लाड यांनी, घारापुरीतील त्रिमूर्ती- महेशासह सर्व शिवप्रतिमा- शिल्पांची माहिती या पुस्तकात अत्यंत उत्कृष्टपणे करून दिली आहे. महाराष्ट्रातील अन्य महत्त्वाच्या लेणी-शिल्पांशी असलेले त्यांचे साम्य-भेद यांचा अभ्यासपूर्ण परामर्श त्यांनी घेतला आहे.

**– सेतुमाधवराव पगडी**

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**




# जिवलग जिवाचे

**नंदा भटमुळे**

महाराष्ट्राच्या मातीत एक आगळेपणा आहे. माणसं ऐ-सपैस असतात. गावरान आंब्याप्रमाणे तुरट असतात, आंबूस असतात. तरीही स्वादाच्या बाबतीत कोणाला हार जात नाहीत हेही कादंबरी वाचून पटेल. कथानकात कटू संघर्ष नाही; पण आवश्यक तेवढा सस्पेन्स आहे.

**– डॉ. प्रकाश लोथे**

**मूल्य ६०० रु. सवलतीत ३६० रु.**



# स्नेहाची श्रीशिल्लक

**श्रीकांत बोजेवार**

**काही** माणसं अशी असतात, की ती तुमच्या आयुष्यात येणं हा जणू भाग्ययोग असतो. अरुण जाखडेंशी ओळख होणं, ओळखीचं मैत्रीत रूपांतर होणं आणि मैत्रीचं 'जणू एका कुटुंबातले आहोत' अशा भावनेत रूपांतर होणं ही प्रक्रिया फारच अल्पकाळात घडून आली, त्याला सतरा वर्षं होतील. आठवड्यातून एकदा माझ्या सदरावर प्रतिक्रिया देण्याच्या निमित्तानं एखादा फोन आणि पंधरा-वीस दिवसांतून एखादा दीर्घ फोनसंवाद, कधी अर्धाएक तासाचा तर कधी तासाभराहूनही अधिक चालणारा. मला एक सांस्कृतिक संपन्नता मिळवून देणारा हा संवाद अरुण जाखडेंच्या अचानक, अकाली मृत्यूनं मध्येच तोडून टाकला आहे. प्रकाशनक्षेत्राचं, संशोधनप्रकृतीच्या साहित्याचं आणि मराठीतील आधीच क्षीण होत चाललेल्या बौद्धिक प्रगल्भतेचंही जाखडेंच्या निधनामुळे मोठं नुकसान झालेलं आहे. 'तुम्हाला वेळ आहे ना बोलायला?' या त्यांच्या प्रश्नानं सुरू झालेली अनेक संभाषणं आणि 'तुम्हाला सांगतो, तो प्रतिभावंत आहे, पण महाबिलंदर आहे' या वाक्यानं सुरुवात होऊन त्यांच्या पोतडीतून बाहेर आलेले खासगी मैफिलीतील अनेक किस्से यातून जाखडेंच्याही स्वभावाचं आकलन मला होत गेलं, स्नेहबंध घट्ट होत गेले.



अरुण जाखडे

मी लोकसत्तामध्ये 'लोकरंग'चं काम करत असताना जाखडेंशी ओळख झाली. तेव्हा ते नव्या प्रकाशित पुस्तकांचे गठ्ठे घेऊन पुण्याहून यायचे आणि एकेका वृत्तपत्राच्या कार्यालयाला भेट देत संध्याकाळी परत जायचे. एखाद्या पुस्तकाचं परीक्षण लवकर प्रसिद्ध व्हावं असं वाटत असेल तर त्याचं महत्त्व सांगण्यात थोडा जास्त वेळ खर्ची घालायचे आणि शेवटी, 'बघा तुम्हाला काय वाटतं, मी आपलं सांगायचं काम केलं' म्हणत निर्णय तुमच्यावर सोडून द्यायचे. मात्र आपल्या पुस्तकांविषयी काही सांगण्यापेक्षा या माणसाला गप्पा मारण्यात जास्त रस आहे हे मला कळलं आणि एक्स्प्रेस टॉवर्सच्या कँटिनमध्ये गप्पा मारतामारताच जाखडेंचं प्रकाशक असणं मागे पडलं, मैत्र जुळलं. एका अशाच गप्पाष्टकांच्या वेळी शेती, शेतकरी, शेतीच्या परंपरा, समजुती याविषयी त्यांच्याकडून खूपच वेगळी माहिती ऐकायला मिळाली. ती माहिती मी शुभदा चौकर, तेव्हाचे लोकसत्ताचे संपादक कुमार केतकर यांना सांगितली आणि त्यातून 'इर्जिक' या लोकप्रिय सदराचा जन्म झाला. कृषिसंस्कृतीविषयीचं प्रेम आणि ग्रामीण परिसराविषयीची आस्था या दोन्हीचं नेमकं प्रतिबिंब त्या सदरात उमटलं होतं. ग्रामीण महाराष्ट्राची लोकसंस्कृती आणि लोकजीवन

याच्या निरीक्षणातूनच त्यांचा 'हुसेनभाई बाताड्या' जन्माला आला. या हुसेनभाईचा एक किस्सा त्यांनी लिहिला आणि तो माझ्यासह इतर काही मित्रांना वाचायला पाठवला, त्याला चांगला प्रतिसाद मिळाल्यावर आणखी काही किस्से लिहिले. परंतु त्या लिखाणाला नियमित स्वरूप त्यांना द्यावं लागलं ते मात्र त्यांची कन्या अनुजा हिच्या सततच्या पाठपुराव्यामुळे. पुढे त्या किश्शांचं पुस्तक झालं. या हुसेनभाईविषयी त्यांना लिहावंसं वाटलं तेही लोकरंग पुरवणीतील 'सर्किट' या सदरामुळे. अत्यंत मनस्वी, प्रतिभावंत, एखाद्या कामात झोकून देणारी परंतु अव्यवहारी, लहरी आणि विक्षिप्त स्वभावाची माणसं समाजात असतात आणि समाजाचं ती एक प्रकारे भूषण असतात, अशा व्यक्तींवर आम्ही तेव्हा 'सर्किट' हे सदर बेतलं होतं. त्यात जाखडेंनी एका विक्षिप्त कवीवर लेख लिहिला होता. चेन्नईतील एका टेलिफोन बूथमध्ये सुचलेली आणि अर्धवट राहिलेली एक कविता पूर्ण करण्यासाठी तो कवी काही महिन्यांनी पुन्हा चेन्नईला गेला होता, कारण त्याच्या मते ती जिथे सुचली तिथेच पूर्ण होऊ शकते! जाखडेंनी त्याचा कवितासंग्रह काढला आणि त्याचं प्रकाशन नागपूरला करायचं ठरलं. जाखडे नागपूरला पोचले तेव्हा त्या कवीनं जाखडेंना सांगितलं, की 'आपण प्रकाशन करू, परंतु माझ्या कविता या फक्त माझ्यासाठीच लिहिलेल्या आहेत. त्या प्रकाशित केल्याबद्दल मी तुम्हाला कोर्टाची नोटीस पाठवणार आहे.' जाखडेंना वाटलं की तो गंमत करतोय, परंतु त्यानं खरंच कोर्टाची नोटीस पाठवली. मात्र काही दिवसांनी जाखडेंच्या घरी जाऊन त्यांना दिलेल्या मनस्तापाबद्दल माफीही मागितली. हा लेख खूप गाजला. त्यानंतर दोनेक वर्षांनी कधीतरी आम्ही फोनवर या कवीविषयी बोलत असतानाच जाखडेंनी हुसेनभाईचा एक किस्सा सांगितला, तेव्हाच त्यांच्या मनात बहुधा त्यावर लिहायचं निश्चित झालं असावं.

आवडीचा विषय निघाला की त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळीच चमक आणि डोळ्यांमध्ये वेगळीच उत्सुकता दिसू लागे. राजकारण, समाजकारण आणि साहित्यकारण या तिन्हीविषयीची सखोल आणि चिकित्सक जाण त्यांच्यात होती आणि गप्पांमधून ती प्रकट होत असे. एखादं पुस्तक प्रकाशित करण्याचं ठरल्यावरही ते त्याची घाई करत नसत, कारण त्या पुस्तकावरील चिंतनासाठी पुरेसा वेळ देण्याची त्यांची भूमिका असे. 'छापणार आहे असं म्हणता तर मग एवढा वेळ का घेताय,' असं लेखक सतत विचारत, त्यातून जाखडेंच्या वेगाविषयी अनेक विनोदही होत. जाखडे मित्रांविषयी खूप भिडस्तही होते. अलिकडे आम्हा दोघांचाही मित्र असलेल्या एका व्यक्तीनं एका पुस्तकाचा अनुवाद करण्याची इच्छा व्यक्त केली. झालेला अनुवाद जाखडेंना




आवडला नाही, काही सूचनांसह जाखडेंनी त्याला अनुवादावर पुन्हा काम करायला सांगितलं. त्यानंतरही जाखडेंना तो पसंत पडला नाही. तो मित्र सतत विचारणा करत होता. एक दिवस जाखडेंनी मला फोन केला आणि त्या अनुवादातील त्रुटींबद्दल बोलत राहिले. 'तुम्हाला संकोच वाटत असेल तर मी त्यांच्याशी बोलू का' असं मी विचारलं, तेव्हा जाखडे म्हणाले, 'कधी कधी मला वाटतं की माझ्या अपेक्षा खूपच जास्त असतात, त्यामुळे केवळ माझं असमाधान व्यक्त करण्यासाठी मी मन मोकळं केलं, परंतु तो अनुवाद मी आता आहे तसा छापणार आहे.' 'पद्मगंधा' दिवाळी अंकासाठी जाहिराती मागतानाही त्यांचा हा संकोच आडवा येत असे. मी, अरुण शेवते, जाखडे आणि किशोर मेढे असा मैफलीचा एक ग्रुप आहे. (जाखडेंच्या संदर्भात आता 'ग्रुप होता' म्हणावं लागेल. गप्पांच्या अशा मैफिलीत किस्से सांगताना, व्यंकटेश माडगूळकरांच्या आठवणी सांगताना जाखडेंचं निराळेच रूप दिसे.). किशोर मेढे अनेकदा त्यांच्या संपर्कातून दिवाळी अंकासाठी जाहिराती मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत, मात्र एवढं मैत्र असूनही जाखडेंनी हक्कानं कधी जाहिरातींसाठी त्यांना फोन केला असं होत नसे.

माझ्या 'दोन फुल एक हाफ' या सदराचं पुस्तक करण्याविषयी त्यांनी विचारलं तेव्हा, जे सदर लोकांनी मोठ्या प्रमाणावर वाचलेलं आहे आणि बरचसं तात्कालिक संदर्भ असलेलं आहे, त्याचं पुस्तक लोक घेतील का, असा प्रश्न मला पडला होता. परंतु जाखडे आणि कुमार केतकर यांना ते पुस्तक लोकांना आवडेल याची खात्री होती. पुस्तक करायचं ठरलं तेव्हा जाखडेंनी मला विचारलं, 'कव्हर करायला कोणाला सांगावं?' माझ्या इच्छेनुसार त्यांनी वसंत सरवटेंना त्याविषयी विचारलं, ते तयार झाले त्याचा एक मोठाच किस्सा आहे. परंतु त्यातली महत्त्वाची गोष्ट अशी की पुस्तकाची पूर्ण तयारी झाल्यावर केवळ मुखपृष्ठासाठी आम्ही वर्षभर थांबलो, कारण जाखडेंनाही पुस्तकाची घाई नव्हती आणि मलाही. सरवट्यांनी प्रत्यक्षात ते कव्हर दिलं तेव्हा त्या वाट पाहण्याचं सार्थक झाल्याची जाखडेंचीही भावना झाली आणि माझीही.

अलिकडे गेली काही वर्षं ढेरेअण्णा आणि गणेश देवी या त्यांच्या श्रद्धास्थानांविषयी आमच्यात वारंवार चर्चा होत असे संशोधन आणि भाषा या विषयांवर जाखडे पोटतिकडकीनं बोलत तेव्हा ते ऐकत राहावंसं वाटे. आ च्या अशाच एका चर्चेतून स्फुरलेली 'शब्द' नावाची एक कथा मी लिहिली ती 'पद्मगंधा' दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली. 'विनोदी कथां'च्या मांडवाबाहेर येऊन कथा लिहिण्याची माझी मानसिकता तयार झाली ती जाखडेंमुळेच. गेली दहा वर्षं मी न चुकता पद्मगंधाच्या दिवाळी अंकात तशा कथा लिहीत आलो आहे. रां.चि. ढेरे आणि गणेश देवी यांचं

जाखडे यांनी प्रकाशित केलेलं साहित्य हा अत्यंत महत्त्वाचा ऐवज आहे. मराठीला गणेश देवी माहीत झाले ते जाखडे यांनी प्रसिद्ध केलेल्या 'वानप्रस्थ' या पुस्तकामुळेच. पुढे जाखडेंनी देवींच्या भाषाकोषासाठी स्वतःला वाहून घेतलं. जाखडेंच्या ज्ञानाचा, माहितीचा आणि आकलनाचा आवाका पाहिला की एकाच व्यक्तीमध्ये अनेक 'अरुण जाखडे' सामावलेले आहेत याची जाणीव होत असे. साहित्यावर, माणसांवर मनस्वी प्रेम करणारे जाखडे, ग्रामीण संस्कृती उराशी घट्ट कवटाळून असलेले जाखडे, शहरी 'स्मार्टनेस' अंगी बाणवलेले जाखडे, नावडत्या व्यक्तींना चलाखीनं हातभर दूर ठेवणारे जाखडे आणि एखाद्याशी गोत्र जमलं की हात आखडता न घेता मदतीला धावून जाणारे जाखडे.

काही विषय असे असतात की त्यासंबधीच्या नोंदी, दस्तऐवज एकत्रित प्रकाशित होणं भाषेच्या जतनासाठी आवश्यक असतं. अशा पुस्तकांना किती मागणी आहे, त्याची किती चर्चा होईल वगैरेचा विचार जाखडेंनी कधी केला नाही. त्यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांची यादी बघून एकदा एकानं, खपतात का हो ही पुस्तके? कसं काय परवडतं तुम्हाला हे? अशी विचारणा केली होती. तेव्हा, मी काढतो, मी खपवतो. तुम्ही कशाला काळजी करता? असं उत्तर जाखडेंनी दिलं होतं. र.धों. कर्वे यांचं समग्र साहित्य, श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या कादबंऱ्या प्रसिद्ध करताना त्यांचा हाच दृष्टिकोन होता. अगाथा ख्रिस्ती हा जाखडेंच्या जिव्हाळ्याचा आणखी एक विषय. मधुकर तोरडमलांनी अगाथाच्या कादंबऱ्यांचा मराठीत अनुवाद करण्याची इच्छा प्रकट केली तेव्हा त्यांना कोण आनंद झाला होता. तोरडमलांना ते भेटायला येत तेव्हा तोरडमलांच्या घरी गप्पा आणि जेवण असा त्यांचा निवांत बेत असे, त्याच अटीवर तोरडमल त्यांना वेळ देत असत. अशा ऐका भेटीत मीही सहभागी झालो होतो. तोरडमल जाखडेंना म्हणाले, 'अगाथाच्या कादंबऱ्यांमध्ये काही संदर्भ, काही वर्णनं अशी असतात, जी मराठी अनुवादात मला अनावश्यक वाटतात आणि ती नसली तरी कथानकात काही फरक पडत नाही. तेव्हा तुम्ही पुस्तकांवर अनुवाद असं लिहिण्याऐवजी भावानुवाद असं लिहा.' जाखडेंनी त्याला ठाम नकार दिला. मराठी माणसाची वृत्ती पाहता, अनुवाद कसा आहे यावर चर्चा होण्याऐवजी अकारण या गाळण्याच्या मुद्द्यावरच चर्चा होईल, असं ते म्हणाले आणि तोरडमलांनीही माघार घेतली. अगाथा ख्रिस्तीच्या लिखाणाविषयी तोरडमलांनी तेव्हा केलेलं विश्लेषण कदाचित माझ्या मनाच्या एखाद्या कप्प्यात राहिलं असेल, त्यातूनही मला 'अगस्ती' लिहिण्यासाठीची ठिणगी लाभली असेल.


कधीतरी एखाद्या हळव्या क्षणी जाखडे त्यांच्या एखाद्या पुस्तकाला मनासारखा प्रतिसाद न मिळाल्याची खंतही व्यक्त करत. सिमोन द बोव्हुआरच्या 'सेकंड सेक्स'चा अनुवाद खूप गाजायला हवा होता, असं त्यांना वाटत असे. 'हाल सातवाहनाची गाथा सप्तशती' हा जवळपास सातशे पानांचा ग्रंथराज त्यांनी प्रसिद्ध केला तेव्हा बोलताना त्यांनी 'विक्रीचा मी फार विचार केलेला नाही', असं म्हणाले. त्यांच्या या भावनेचं प्रतिबिंब या पुस्तकाच्या प्रस्तावनेतही उमटलं आहे. या प्रस्तावनेत त्यांनी या पुस्तकाचे संपादक स.आ. जोगळेकर यांचं एक वाक्य दिलं आहे, 'एखाद्या कामाबद्दल प्रशंसा करणारांपेक्षा, झालेल्या विलंबाबद्दल निर्भत्सना करणारांची आपुलकी आणि संख्या अधिक मोठी.' या वाक्याशी आपण सहमत असल्याचं सांगत जाखडेंनी ती प्रस्तावना संपवलेली आहे.

तीन-चार वर्षांपूर्वी काही कौटुंबिक कारणांमुळे त्यांना काळजीनं घेरलं होतं. पाठोपाठ आजारानं ग्रासलं. या काळात अनेकदा मन मोकळं करताना त्यांना गहिवरून येई. परंतु लगेचच सावरून गमतीजमती सुरू होत. 'मधुमेहापायी पायी घालावा लागला जोडा, तो एवढा महाग की जणू अंगठीतला खडा' असं वाक्य फेकत ते त्या औषधी जोड्याच्या गमती सांगू लागत. त्या आजारातून बाहेर पडून आणि कौटुंबिक कारणांचंही निराकरण होऊन जाखडे त्यांच्या नव्या कार्यालयात हल्लीहल्लीच रमू लागले होते. नव्या पुस्तकांच्या योजनांवर काम करू लागले होते, तेवढ्यात त्यांना मृत्यूनं अकस्मात झोपेतच गाठलं. मी ज्या रविवारी संध्याकाळी त्यांच्या फोनची वाट पाहत असतो त्या रविवारी सकाळीच त्यांच्या जावयाचा फोन आला, 'जाखडे गेले!' मी लोकसत्ता सोडून महाराष्ट्र टाइम्समध्ये आलो तेव्हा, जाखडेंनी मुंबईत येऊन मला पार्टी दिली होती. येताना ते माझ्यासाठी गणपतीची तांब्याची एक सुबक कलाकृती घेऊन आले होते. माझ्या घरातील भिंतीवर विराजमान असलेला तो गणपती, माझ्या पुस्तकांच्या कपाटात असलेली पद्मगंधाची पुस्तकं आणि असंख्य स्मृती ही आता आमच्या 'स्नेहाची श्रीशिल्लक' म्हणून राहील.

**– श्रीकांत बोजेवार**

shrikant.bojewar@gmail.com


ग्रंथाली




# दिसामाजी

**प्रशांत भरवीरकर**

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

'दिसामाजी'मधील लेखनाला गावाकडच्या मातीचा सुगंध आहे. गावखेड्यातील बोलीभाषेत बोलले जाणारे गावरान शब्दांचा आपल्याला या पुस्तकातून परिचय होतो. त्याने लेखनाची रंजकता वाढते.




# अलविदा सुनीलभाई

**यशोधरा काटकर**

**१२ जानेवारीला** सकाळीच कळली होती ती बातमी, पण तिच्यावर विश्वास ठेवणे अशक्य होते. सुनीलभाई मेहता आजारी असले तरी त्यांची प्रतिकूलतेशी पंगा घेण्याची धाडसी वृत्ती आणि रोखठोक स्वभाव परिचयाचा असल्याने ते या परिस्थितीलादेखील आश्चर्यकारक कलाटणी देत ठणठणीत बरे होतील अशी खात्रीच वाटत होती. परंतु दिवस कलता कलता 'ती' बातमी आलीच आणि घरात सकाळपासून पसरलेल्या मृत्युशोकाच्या सावल्या अधिक गडद होत गेल्या.

आणि आठवत गेले काही...



सुनील मेहता

कोल्हापुरातल्या माझ्या लहानपणातल्या ज्या आठवणी आहेत त्यात विद्यापीठ हायस्कूल, अंबाबाईचे मंदिर आणि भवानी मंडपाचे महाद्वार पार केल्यावरचे 'अजब पुस्तकालय', आताचे 'मेहता बुकसेलर्स' अगदी ठळक स्मृतिबिंदू बनून रेखाटले गेले आहेत. मला वाचनाची गोडी लागली ती जयप्रभा स्टुडिओमधल्या ग्रंथालयात, पण तिथे सगळा ऐतिहासिक साहित्याचा बोलबाला म्हणून 'अजब'मधला साहित्याचा खजिना बघून जीव खुश होऊन जाई. तिथे एखाद्या विद्यार्थ्याला किंवा शिक्षकाला नेमके हवे ते पुस्तक, ते स्टॉकमध्ये नसल्यास मागवून देत त्या व्यक्तीला कायमचे जोडून घेणाऱ्या अनिलभाई मेहतांशी माझी विद्यार्थिदशेतच ओळख झाली. मुळात सांगलीसारख्या गावातून कोल्हापूर संस्थानात येऊन 'मेहता' नावानिशी मराठी पुस्तकविक्री-वितरणासारख्या बिनभरवशाच्या व्यवसायात उतरणे हेच एक मोठे धाडस होते. परंतु बाजारपेठेची अचूक जाण, पुस्तक मिळण्याची खात्री आणि ग्राहकाशी सौहार्दाने नाते जोडण्याची कला यामुळे 'मेहताकाकां'शी कोल्हापूरमधल्या अनेक पिढ्यांचे भावबंध जुळले ते कायमचे. माझ्याशी त्यांचे खास नाते जुळण्याचे कारण म्हणजे हा किताबी किडा उत्तम वाचक आहे हे त्यांनी ओळखले होतेच, शिवाय मी लिहू लागले तेव्हा रणजितदादा, माधवी देसाई असे साहित्यिक घरातच असल्याने यशूच्या लिखाणाकडे कोण लक्ष देणार होते? पण अनिलभाईंनी जुने ते सोने, पण नव्या पिढीचे लिखाणही मूल्यवान आहे हे जाणून माझा 'बंजाऱ्याचे घर' हा ललितलेखसंग्रह प्रकाशनासाठी हाती घेतला. मात्र हे सगळे काहीसे पुढचे.

अनिलभाईंनी नामवंत प्रकाशनगृहे प्रस्थापित असलेल्या पुण्यासारख्या शहरात १९७६ साली 'मेहता पब्लिशिंग हाऊस' स्थापन करून इथे पाय रोवले. सांगलीहून कोल्हापूरमध्ये स्थिरावण्यापेक्षा कोल्हापूरहून पुण्याला स्थलांतरित होणे, पुस्तकविक्रीकडून प्रकाशनात झेप घेणे कितीतरी पटींनी अधिक आव्हानात्मक होते,

पण कुंपणाबाहेर पडल्याशिवाय बाहेरचे आकाश दिसत नाही, ते आकाश त्यांना खुणावत होते. 'माळावरची मैना' हा डॉ. आनंद यादव यांचा कथासंग्रह प्रकाशित करून त्यांनी व्यवसायाला सुरुवात केली. पुढे रणजितदादा आणि नव्याने लिहू लागलेल्या माधवीवहिनी 'मेहता'शी जोडले गेले तेव्हा त्यांच्याबरोबर माझेही मेहतांच्या घरी नित्यनेमाने जाणे होऊ लागले. कोल्हापूरमधले मेहतांचे घर शनिवारपेठेतल्या चार घरांसारखे, अतिशय साधे राहणीमान असलेले; पण लेखक-प्राध्यापकांचा राबता असणारे होते. त्यात आई-दादांची भर पडली. ते आले की अंजलीकाकींची शर्मिलाला मदतीला घेऊन पाहुणचार करण्यासाठी गडबड सुरू होई. पुढे आई-दादांच्या आयुष्यात वादळ आले तरी मेहता कुटुंबीयांनी त्या दोघांशी आणि आम्हा मुलींशी नाते कायम जपले.

रणजितदादांप्रमाणे वि.स. खांडेकर आणि अनेक ज्येष्ठ मराठी साहित्यिक 'मेहता'शी जोडले जात होते, अनुवादाचा प्रवाह धडाक्यात सुरू झाला होता, महाराष्ट्रभर मजबूत वितरणशृंखला आणि ग्रंथालयांशी उत्तम संपर्क स्थापन झाला होता. मराठी पुस्तके महाराष्ट्राबाहेरच नव्हे तर सातासमुद्रापल्याडच्या वाचकांपर्यंत पोचली पाहिजेत यासाठी प्रयत्न सुरू होते. प्रकाशन व्यवसायातल्या आव्हानांना आणि स्पर्धेला टक्कर देत अनिलभाईंनी या व्यवसायाचा एकखांबी डोलारा समर्थपणे पेलून धरला होता. मराठी प्रकाशक संघाचे अध्यक्षपद, फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्सचे उपाध्यक्षपद त्यांच्याकडे चालून आले. त्यातून सगळ्या भाषिक प्रकाशनविश्वाला नवी दृष्टी आणि दिशा देण्याचे त्यांचे कार्य सुरू होते. त्यांच्या रूपाने प्रकाशनक्षेत्रात एका नव्या नेतृत्वाचा उदय होत होता .

या टप्प्यातच मी कधीतरी भेदक नजरेच्या, गुटगुटीत तब्येतीच्या, स्टायलिश सुनीलना पाहिले होते. पण, अनिलभाईंचा लेक त्यांच्यापेक्षा सवाई निघेल, 'मेहता'ला डिजिटल युगात घेऊन जात एखाद्या बहुराष्ट्रीय कॉर्पोरेटसारखे रूप देईल, व्यावसायिकतेचे नवे पायंडे घालून प्रकाशनक्षेत्राला समकालीनत्वाचे आयाम देईल, याची त्या काळात माझ्याप्रमाणे कुणालाच कल्पना नव्हती.

सुनीलभाईंच्या हाती १९८६ साली 'मेहता'ची सूत्रे आली त्या टप्प्यावर जागतिकीकरण आणि उदारीकरणाचे वारे भारताच्या दिशेने वाहू लागले होते. माहिती-तंत्रज्ञानाच्या येऊ घातलेल्या लाटेमुळे उद्योग-व्यवसायांच्या स्वरूपात क्रांती घडणार आहे, हे सुनीलभाईंनी अचूक ओळखले. या लाटेमध्ये प्रकाशनक्षेत्र कौटुंबिक व्यवसाय म्हणून टिकू शकणार नाही, त्याला आधुनिक व्यवस्थापन आणि औपचारिक शिस्तबद्ध कार्यप्रणाली असणारे तंत्रज्ञानाधारित रूप घ्यावेच लागेल, त्यासाठी नव्या युगातले तंत्रज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करत, दीर्घकालीन विकासासाठी रणनीती आखावी लागेल, हे या भेदक नजरेच्या प्रकाशकाने हेरून त्या लाटेवर आरूढ व्हायचे ठरवले. परंतु असा कायापालट करताना वडिलांनी रुजवलेली लेखकांशी नातेसंबंध जपण्याची पूर्वप्रचलित प्रणाली त्यांनी कायम ठेवली. त्यातून आई-दादांप्रमाणे व.पु. काळे, विश्वास पाटील, शंकर पाटील, द.मा. मिरासदार आणि व्यंकटेश माडगूळकर अशा बिनीच्या साहित्यिकांची सगळी पुस्तके 'मेहता'कडे आली. पिताश्रींचे मार्गदर्शन होतेच, त्याबरोबर आनंद यादव, शंकर सारडा यांसारख्या ज्येष्ठ साहित्यिकांच्या सल्ल्याने 'मेहता'च्या भविष्यकालीन प्रकाशनांची दिशा ठरवण्यासाठी आणि दर्जा सातत्याने वृद्धिंगत ठेवण्यासाठी ते कार्यरत झाले. त्यामुळे नव्या सहस्रकाचा उदय झाला तेव्हा त्यांना थबकावे लागले नाही, कारण त्यांच्यासमोर 'मेहता'चे नवे रूप, ब्रँडिंग, वितरण-विपणनाबाबत पक्क्या योजना तयार होत्या.

या टप्प्यावर अनेक देशी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या दिग्गज प्रकाशनसंस्थांशी नातेसंबंध जोडल्यामुळे मराठीतील दर्जेदार पुस्तकांसोबत विविध भारतीय भाषिक तसेच इंग्रजी साहित्याचे अनुवाद मराठीत आणणाऱ्या 'मेहता'चे रूपरंग अंतर्बाह्य बदलत गेले. नानी पालखीवाला, अरुण शौरी, खुशवंत सिंग, चेतन भगत, एस.एल. भैरप्पा, शिवराम कारंथ, अरुंधती रॉय, किरण बेदी अशा भारतीय; तसेच, जेफ्री आर्चर, मायकल क्रायटन, फ्रेडरिक फोरसाइथ, रॉबिन कूक, जॉन ग्रिशॅम, डॅन ब्राऊन, डेबोरा एलिसपासून झुम्पा लाहिरीचे साहित्य मराठीत आणण्यात सुनीलभाईंचे मोठे योगदान आहे. साहित्यिक ज्येष्ठ असो वा नवोदित; सगळ्या व्यावसायिक बाबींची पूर्तता करूनच पुस्तक प्रकाशनासाठी हाती घ्यायचे हा पायंडा पाडून त्यांनी दोन्ही पक्षांना आश्वस्त करण्याची प्रथा पाडली. अनेक नवनवे लेखक, अनुवादक, कलाकार 'मेहता'शी जोडले जात वैविध्यपूर्ण विषय आणि आशय त्यांच्या प्रकाशनामधून झळकले. साहित्याची विविधता आणि संख्या वाढली. त्यांची बाह्य रूपे- बांधणी, छपाई, मुखपृष्ठेही बदलत गेली. टी-बुक क्लब, साहित्यिकाच्या वाढदिवशी त्याच्या पुस्तकांवर सवलत देण्याचा उपक्रम अशा नवनव्या कल्पना 'मेहता मराठी ग्रंथजगत' आणि दिवाळी अंकातून वाचकापर्यंत पोहोचवल्यामुळे अनेक निष्ठावंत ग्राहक 'मेहता'शी जोडले गेले.

काळाची पावले ओळखणाऱ्या सुनीलभाईंनी मराठीत सर्वप्रथम इ-बुक्सचा प्रयोग यशस्वीरीत्या राबवला. आज 'मेहता'ची दीड हजारांहून अधिक इ-बुक उपलब्ध आहेत. तंत्रज्ञानाधारित वितरणसाखळी आणि पेमेंट पद्धतीचा वापर सुरू झाल्याने 'मेहता'ची पुस्तके त्यांची इ-कॉमर्स वेबसाइट, ॲमेझॉन, फ्लिपकार्ट; तसेच, बुकगंगा, अक्षरधारा यांसारख्या प्लॅटफॉर्मवर उपलब्ध होत गेली. त्यासाठी गूगल-पेसारखा पर्यायही उपलब्ध करण्यात आला. त्यांनी फ्रँकफर्टमधली आंतरराष्ट्रीय बुकफेअर आणि नॉर्वेमधल्या आंतरराष्ट्रीय प्रकाशकांच्या परिषदेत मराठी प्रकाशनजगताचे प्रतिनिधित्व केले होते. या उपक्रमशीलतेतून 'मेहता'ची प्रतिमा मर्यादित न राहता तिला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख प्राप्त होत गेली. मेहता पब्लिशिंग हाऊसचे बस्तान सदाशिवपेठेतल्या लहानशा ऑफिसमधून माडीवाले कॉलनीसारख्या मोक्याच्या जागी, स्वतःच्या मालकीच्या- एखाद्या कॉर्पोरेटला साजेशा-सुसज्ज इमारतीत हलवणे हादेखील सुनीलभाईंच्या आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख प्रस्थापित करण्याच्या रणनीतीमधला महत्त्वाचा टप्पा होता.

माझी 'बंजाऱ्यांचे घर', 'थर्ड पर्सन' आणि 'प्रवास-पर्यटनाचे नवे पैलू' ही पुस्तके प्रकाशित होत असताना सुनीलभाईंबरोबर या नव्या ऑफिसात भेटीगाठी होत गेल्या. तळमजल्यावरचे कल्पकतेने सजवलेले सुसज्ज बुकस्टोअर आणि वरच्या मजल्यांवरचे विविध विभाग, तिथल्या अद्ययावत यंत्रणा, काम करणाऱ्या टीम बघून अभिमान वाटे. हा बदल केवळ बाह्य रूपापुरता मर्यादित नसून 'मेहता'चे अंतरंगही बदलले आहे. आता मला 'मेहता'बरोबर पूर्वीसारखे दोन पिढ्यांमधल्या कौटुंबिक नात्याचा पदर पकडून काम न करता, व्यावसायिक दृष्टिकोन घेऊनच काम करावे लागेल, हेही जाणवत गेले.

सुनीलभाईंची कारकीर्द पाहताना मला सतत जाणवते, की हा माणूस उद्योजकतेचे बाळकडू पचवूनच जन्माला आला होता 'Perpetual Optimism is a Force Multiplier' हे प्रत्येक उद्योजकाचे ब्रीदवाक्य असते, म्हणून कधी संकटे कोसळत अपयश आले तरी तो खचून जात नाही, उलट अपयशावर स्वार होत कल्पकतेने नव्या संधी शोधतो, त्यातून जे नवोन्मेषांचे धुमारे फुटतात त्यातून स्वतः, संस्था आणि समाजाला विकासाच्या मार्गावर नेतो, हे सुनीलभाईंच्या बाबतीतही खरे होते. म्हणून नोटाबंदीमुळे नैराश्य पसरलेल्या काळात सुनीलभाईंनी तरुणाईसमोर प्रकाशन व्यवसायाचे सकारात्मक चित्र रेखाटून त्यांना करिअरची दिशा दाखवली. नोटाबंदीचे वादळ शमण्याआधीच आलेल्या जीएसटी, कोविडच्या लाटेमुळे 'मेहता'चे कामही वर्ष-दीड वर्ष काहीसे थंडावले, पण जरासे स्थैर्य मिळताच थबकून राहिलेली वैविध्यपूर्ण पुस्तके वाचकांच्या भेटीला येत गेली. त्यांनी माझी दोन्ही नवी पुस्तके, मी गोव्याला आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सव 'इफ्फी'साठी उपस्थित असताना तिकडे पोहोचवून मला सुखद धक्का दिला, पण त्यामागचा त्यांचा गर्भित इशारा जाणवून 'इफ्फी'च्या व्यासपीठावरच 'अपूर्व, अलौकिक, एकमेव' या पुस्तकाचे प्रकाशन जोरात करता आले.


नाशिकमध्ये पार पडलेल्या अखिल भारतीय साहित्यसंमेलनात त्यांनी स्वतंत्र दालन घेऊन वाचक आणि लेखकांचा संवाद घडवणाऱ्या 'साहित्योत्सवा'चे आयोजन केले. यात 'मेहता'च्या नव्या-जुन्या लेखकांचा उचित मान राखणे, नवोदित लेखकांना संपर्क साधण्यासाठी आवाहन, मुलांसाठी व्यासपीठ निर्माण करून पुस्तके हाताळण्याचा आनंद देणे, अशी अनेक उद्दिष्टे सफल झाली. याचे प्रसारण फेसबुक लाइव्हच्या माध्यमातून केल्याने जगभरातल्या वाचकांना त्याचा आनंदही घेता आला. या उपक्रमामुळे 'मेहता'चे ब्रँडिंग, पुस्तकविक्री झालीच, त्यापलीकडे जात आजच्या अस्थिर परिस्थितीत मराठी प्रकाशकाने काय केले पाहिजे याचा वस्तुपाठ घालून दिला गेला.

दर्जेदार साहित्याची पायरसी, डुप्लिकेट पुस्तकमाफियाला रोखण्यासाठी, त्याचबरोबर घटणारा वाचकवर्ग, मराठी व परकीय भाषाशिक्षणाचा ऱ्हास व कोविडनंतर बदललेले साहित्यविश्व यावर विचारमंथन घडवून आणण्यासाठीही सुनीलभाई प्रयत्नशील होते. भारतीय प्रकाशनजगतात किती मोठी पोकळी निर्माण करून ते गेले! त्या तडाख्याने मन इतके सुन्न झाले, की अनिलभाई, वहिनी, शर्मिला यांना फोन करण्याची हिंमत होईना. त्यांचे सांत्वन करण्यासाठी धीर कुठून एकवटायचा? काही सुचत नव्हते. मनातला अपराधभाव असा गडद होत चाललेला असताना अचानक फोनची बेल वाजली. ''मी अखिल बोलतोय, सुनील मेहतांचा मुलगा...'' ते शब्द ऐकताच मन किती भरून येत गेले ते सांगता येणार नाही. पित्याचे छत्र हरपलेल्या या मुलाचे आम्ही सांत्वन करायचे, त्याला धीर द्यायचा, पण या मुलाने एवढा तडाखा खाऊनदेखील अल्पावधीत सावरत 'मेहता'ची सूत्रे धीराने हाती घेतली आहेत. खूप विलक्षण क्षण होता तो, पराकोटीचा व्याकूळ करणारा, त्याला आशीर्वाद द्यायला लावणारा आणि आश्वस्त करणारा! आता अखिलच्या पाठीशी राहून 'मेहता'चा नावलौकिक वाढत राहील असे काम करत राहणे हीच सुनीलभाईंना सगळ्यात मोठी श्रद्धांजली ठरेल.

**– यशोधरा काटकर**
lekhikaat12a@gmail.com

ग्रंथाली

शशिकांत जागीरदार यांचा 'कॅलिडोस्कोप' व 'ओंजळभर शिंपले' यानंतरचा निवडक तेरा कथांचा हा संग्रह. यात 'अरबी दर्यावर जरब तिरंग्याची', 'सागरा प्राण तळमळला', 'सुतार पक्षिणीची पावनखिंड', 'काळरात्री लढता लढता उष:काल झाला', 'कत्तलची रात', या शौर्यगाथांचा समावेश तर आहेच, त्याखेरीज 'निर्मळ वाही नर्मदामाई', 'हरफनमौला-ची-दोकान', 'रंगांच्या कुळकथा' अशा ललितकथांचाही अंतर्भाव असलेला हा विविधरंगी लेखसंग्रह वाचकांना निराळाच आनंद देऊन जाईल.




# शूरांच्या शौर्यगाथा
## आणि इतर कथा.....

**शशिकांत जागीरदार**

**मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**



# ताईमावशी

**मनवा नाईक**

**प्रत्येक** घरामध्ये एक बेबीमावशी, दादाकाका, अण्णामामा, माईआजी, असते तशीच माझ्या कुटुंबात आहे... होती, ताईमावशी. मम्माला सात भावंडं आणि त्यांच्यातली मोठी ताई... ताईमावशी... अर्थात रेखा कामत.



रेखा कामत

कुमुद-कुसुम, किंवा रेखा-चित्रा किंवा ताई-माई अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या माझ्या दोन मावश्या मला नेहमीच आजीसारख्या होत्या. मम्मा आणि ताईमावशी यांच्यामध्ये अठरा वर्षांचं अंतर. ताईमावशीची मोठी मुलगी संजू आणि माझी मम्मा जवळजवळ सारख्या वयाच्या. माझ्यात आणि ताईमावशीमध्ये पन्नास वर्षांचं अंतर, त्यामुळे सगळ्या नात्यांमध्ये, वयाच्या अंतरामुळे, जणू गडबडच होती. मी लहान असताना कोण कोणाची मुलगी, कोण मोठी कोण लहान, कोण आजी-कोण मावशी, काही केल्या कळेना आणि त्यामुळे, सगळी मंडळी 'नाती' आणि 'नातेवाईक' असण्याच्या पलीकडे जाऊन माझ्यासाठी माणसं होती. अशी माणसं, ज्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये त्यांची ओळख होती. त्यांच्याबरोबरची मैत्री ही नात्याच्या पलीकडची होती. रक्ताच्या नात्यांना फारसं महत्त्व नव्हतं, आणि आजही नाही.

दादरच्या अल्ट्रा सोसायटीमधलं ताईमावशीचं घर तिसऱ्या म जल्यावर. सोनूताईचे दादा (वडील - ग. रा. कामत), ताईमावशी, संजूताई, सोनूताई... ही सगळी मंडळी झपाझप जिने चढायचे. सगळेच सुपर फिट. संजय मोने एकदा ग. रा. कामतांना ते खूप चालतात आणि फिरतात म्हणून 'गरा गरा' कामत म्हणाला होता. ताईमावशी काही वेगळी नव्हती, तीही नेहमी चालत यायची. अगदी लांब, दूरपर्यंत. तिच्या अल्ट्रा सोसायटीमधल्या घरापासून ती चालत निघायची. वेळेच्या आधीच निघायची. एक साधी मऊ-मऊ पेस्टल कलरची साडी आणि काखोटीला कापडी पिशवी. प्लाझा सिनेमाला चालत, सिटी लाइट मार्केटला चालत, अगदी रवींद्र नाट्यमंदिरलाही चालत. म्हणायची, 'कशाला टॅक्सी आणि बस? तुझ्या गाडीतून नेणार असशील तर ने, नाहीतर मी चालत येते. वाटेत छान भाजीपण मिळेल.' टॅक्सी, गाडी परवडत नाही असं नव्हतं, पण साधेपणा आणि पैसे वाचवणं हे ती नेहमीच करायची. तिला प्रत्येक भाजीचा भाव माहीत असायचा. काल कितीला होती आणि आज कितीला आहे याची तुलना ती सांगत असे.

हे इतकं मोजूनमापून जगणं का? मला प्रश्न पडायचा. सोनूताईनं एकदा सांगितलं, 'भावंडांना शिकवायला. स्वतः छानशौकी न करत पैसे वाचवले आणि भावंडांच्या शिक्षणावर खर्च केले.' मम्मानं सांगितलं, 'लहानपणी आमची परिस्थिती फार बरी

नव्हती आणि आम्ही सात भावंडं. ताईनं आम्हा भावंडांना आधार दिला.' माझे दोन मामा तिच्याकडे पुण्याला शिकायला होते तर मम्मापण अनेक वर्षं ताईमावशीकडे राहायला होती. 'मेडिकलला वैगरे जायचंय आहे का? आम्ही करू खर्च', असं ताईमावशी आणि कामतांनी विचारलं होतं मम्माला. भावंडं शिकून मोठी झाली, पण तोवर पैसे वाचवावेत हे तिच्या अंगवळणी पडलं. ती आयुष्यभर साधं आणि समृद्ध जीवन जगली. लग्नानंतरही एका स्त्रीनं तिच्या भावंडांना शिकवणं त्या काळात, १९५० मध्ये फार प्रोग्रेसिव्ह होतं. 'मुलगी लग्न करून दिली' हा विचार किती मूर्खपणाचा आहे हे कामतांना तेव्हाच कळलं होतं. त्यांनी त्यांच्याच नाही तर सुखटणकर कुटुंबातपण शिक्षणाचं महत्त्व रुजवलं.

मावशीच्या प्लाझा, सिटी लाइट आणि रवींद्र... यात सगळ्या आवडीपण सामावल्या होत्या. सिनेमा, मासे आणि नाटक. या तिन्ही गोष्टींवर ताईमावशीनं प्रेम केलं. तिला वाचनाची आवड होती. तिनं अनेक नाटकांतून कामं केली. 'लाखाची गोष्ट' या चित्रपटामधल्या अभियनानं, ताईमावशीनं लोकांना वेडं केलं. तो काळ सिम्पल लुक आणि स्टाईलाइज्ड परफॉर्मन्सचा होता. सिनेमामध्ये मधला काळ फार बटबटीत झाला होता, पण ताईमावशीनं तोच लुक, अभियनाची स्टाईल साधी आणि ड्रामॅटिक ठेवली. 'सिम्प्लिसिटी इज रीअल' हा तिच्या आयुष्याचा मंत्र होता. आज अभिनय करताना ड्रामॅटिक पण रीअलिस्टिक परफॉर्मन्सला खूप किंमत आहे. तिला ते नेहमीच माहीत होतं. 'एका लग्नाची गोष्ट असो' वा जाहिरात असो, रीअल परफॉर्मन्सचा गोडवा तिला माहीत होता, आणि तिच्या चेहऱ्यावर ती तो सहज खुलवायची. नाटक, सिनेमा आणि मालिका या तिन्ही माध्यमांतून तिनं साठ वर्षं सातत्यानं काम केलं. ग्लॅमर नाही तर पॅशनसाठी. या निमित्तानं लोक भेटतात, तरुण मुलामुलींबरोबर मैत्री होते, हे तिला आवडायचं.

मी लहानपणापासून मस्तीखोर होते, तरीही तिला माझं फार कौतुक होतं. ती मला गायल्यासारखं करत 'मव्वा' म्हणायची. मी जेव्हा जेव्हा एक छोटंसं पाऊल प्रगतीच्या दिशेनं टाकलं, तेव्हा तेव्हा ताईमावशीचा फोन कन्फर्म असायचा. २०१४च्या सप्टेंबरमध्ये मी दिग्दर्शन केलेला 'पोरबाजार' हा सिनेमा रिलीज झाला. तेव्हा पावसात, ब्याऐंशी वर्षांची ताईमावशी चालत आली सिटी लाइट सिनेमाला! फक्त मला विश करायला आली होती. 'तुला शाबासकी द्यायला आले आहे' म्हणाली. मी खूप धावपळीत होते, अँक्शस होते, पण तिचं तिथे येणं हे आजही मला आत्मविश्वास देणारं होतं. ती माझ्या कायम पाठीशी आहे. नेहमीच होती. सतत आपल्याला सपोर्ट आहे हा विचार स्ट्रगलिंगच्या दिवसांत फार फार महत्त्वाचा असतो आणि तो तिनं मला नेहमीच दिला.

त्या काळात स्ट्रगल नव्हता का? तर होता. पण या मंडळींनी त्याचा स्ट्रेस नाही बनवला. त्यांनी तोंडावर प्रॉब्लेम पाहिले, सोल्युशन शोधली. त्यांनी स्ट्रगल आणि प्रॉब्लेमना आनंदानं स्वीकारलं आणि विचारांत मन रमवलं. ताईमावशी राजकारणावरही चर्चा करत असे आणि वाङ्मयावरपण. कारण ती खूप वाचायची. तिची भेट व्हायची तेव्हा चर्चेचा ठरलेला विषय होता – वाचन. ताईमावशी विचारायची... 'काय ग, कोणतं नवं पुस्तक वाचलंस?' एका बाजूला भाजीचा भाव आणि दुसरीकडे पुस्तक. Perfect blend of practical/real and idealistic/imaginative mind.

नवरा-बायकोचं नातं काय असतं हे आपण अनेक सिनेमांत, नाटकांत, आजूबाजूला बघतो. परंतु एका बाईचं तिच्या नवऱ्याशी बायको म्हणून काय नातं असतं, ते मी एका क्षणात पाहिलं. ६ ऑक्टोबर २०१५ रोजी ग.रा. कामत गेले. ताईमावशीचा बासष्ट वर्षांचा संसार संपला. बिल्डिंगखाली कामतांचा शांत देह ठेवला होता. आता त्यांना घेऊन जाणार तेव्हा ताईमावशी शांतपणे खाली बसली. तिनं तिचे दोन्ही हात कामतांच्या खांद्यावर ठेवले, आणि डोळेभरून त्यांना पाहिलं. त्या तिच्या बघण्यात तिचं पूर्ण आयुष्य, संसार, प्रेम आणि शेवट होता. 'मी समृद्ध जीवन तुझ्याबरोबर जगले', हे तिच्या डोळ्यांत मी पाहिलं. The two have spelled out marriage or even further love to me that day. कामत गेल्यावर ताईमावशीनं अभिनय करणं पूर्णपणे सोडलं. कामत हे तिचं सर्वस्व होतं आणि त्या दिवशी ते सगळं संपलं होतं.

दिवाळीमध्ये आमची आणि ताईमावशीची शेवटची भेट झाली. ती अगदी अंथरुणावर होती. काही किलोमीटर चालणाऱ्या ताईमावशीला आता चालायची-फिरायची अजिबात इच्छाच नव्हती. एका तासाच्या तिच्या भेटीत, तिनं एकच प्रश्न अनेकदा विचारला, 'तुम्ही सगळे बरे आहात ना! तुमचं सगळ्यांचं बरं चाललंय ना!' ती आजारी म्हणून आम्ही तिला भेटायला गेलो होतो, पण नेहमीप्रमाणे ती आमची खुशाली विचारत होती.

ही माणसं अशी का घडली, हा साधेपणा आपल्यात का नाही, वाचनकला आपल्याला कधी समजणार, प्रेम-माणुसकी कशी कळेल, ही विचारांतली श्रीमंती आपण कशी आत्मसात करू शकतो, असे प्रश्न मला पडतात तेव्हा ताईमावशीसारखे लोक डोळ्यांसमोर उभे राहतात. ब्युटी इज विदिन अँड नॉलेज इज चार्म. ते आत असलं की चेहऱ्यावर येतं. हे सौंदर्य ताईमावशीच्या चेहऱ्यावर होतं. तिला ते लहानपणीच सापडलं होतं, कदाचित ग.रा. कामतांच्या सान्निध्यात.

ताईमावशी गेली तेव्हाही तिनं लग्नाच्या साडीत मला न्या असं सांगितलं होतं. कुमुद सुखटणकर, रेखा, ताई, ताईमावशी जरी ती असली, तरी खऱ्या अर्थानं ती 'मिसेस रेखा कामत' होती.

**– मनवा नाईक**

manavanaik@gmail.com



# कीर्ती शिलेदार गेल्या म्हणे... कसं शक्य आहे?

**डॉ. मुकुंद कुळे**

**त्या** तिकडे भामिनी, रुक्मिणी, सुभद्रा, शारदा, वसंतसेना, कान्होपात्रा, मैनाराणी... नावं तरी किती घ्यावीत, सगळ्याजणी विंगेत ताटकळत उभ्या आहेत. कीर्तीताई कधी एकदा आपल्याला धारण करताहेत आणि मोठ्या धीटाईनं रंगमंचावर जाताहेत याची वाट पाहत. आजवर संगीत रंगभूमीवर काही कमी जणींनी त्यांना धारण केलं नाही... बालगंधर्वांपासून खुद्द त्यांच्या मातोश्री जयमालाबाईंपर्यंत कित्येक जणींनी या नायिका साकारल्या. तरीही कीर्तीताई सगळ्यांपेक्षा वेगळ्या होत्या खास. भूमिकेतलं गाणं असो वा भूमिकेतला अभिनय, त्या कायम वरचढ असत. एखादी भूमिका रसरसून कशी करावी, ते त्यांच्याकडून शिकावं! 'मानापमान'मधील मानिनी काय, भामिनी काय, 'स्वयंवर'मधील कृष्णप्रेमात आकंठ बुडालेली रुक्मिणी काय किंवा 'स्वरसम्राज्ञी'मधील गावरान ठसक्यातील मैनाराणी काय... त्या-त्या व्यक्तिरेखेचा आब, डौल त्या सुरेख राखायच्या. म्हणूनच त्यांची भामिनी किंवा रुक्मिणी कधी नाटकी-कृतक वाटली नाही की मैना-कान्होपात्रा. जणू त्याच बोलक्या व्हायच्या कीर्तीताईंच्या रूपात. त्यांना त्यांचं असं काहीबाही सांगायचं असायचं कीर्तीताईंच्या माध्यमातून.



कीर्ती शिलेदार

... बघा कशा अबोल आणि मुक्या होऊन उभ्या आहेत साऱ्याजणी विंगेत! पण केवळ कीर्तीताईंनी साकारलेल्या या नायिकाच नाही, अवघी संगीत रंगभूमीच त्यांच्या जाण्यानं स्तब्ध झालीय. उदासीन झालीय. कारण कीर्ती शिलेदार म्हणजे संगीत रंगभूमीवरील मूर्तिमंत चैतन्य होतं. कोणत्याही भूमिकेत रंगमंचावर त्यांचं आगमन व्हायचा अवकाश, रंगमंचासह सारं प्रेक्षागृह त्यांच्या सळसळत्या ऊर्जेनं उजळून निघायचा... रसिकमनाला आलेली मरगळ झटकली जायची, त्यांच्या भुवया उंचावल्या जायच्या. ही सारी किमया असायची, कीर्तीताईंच्या चापल्याची. हे चापल्य त्यांच्या गाण्यात होतं, त्यांच्या गद्य संवादात होतं आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वातही होतं. परिणामी रंगमंचावरचा त्यांचा वावरच उपस्थितांना भारून आणि भारावून टाकत असे.

खरं तर संगीत नाटक म्हणजे केवळ त्यातील गाणी आणि गाणी, असं समीकरण जनमानसात रूढ झालेलं असताना आणि संगीत रंगभूमीवरील पारंपरिक कलाकारही त्या वलयातून बाहेर पडायला तयार नसताना, त्या समजाला छेद देण्याचं मोठं काम कीर्ती शिलेदार यांनी केलं. रुढार्थानं त्यांनीही केली पारंपरिक संगीत नाटकंच, पण त्यांच्या पूर्वसुरींनी रंगवलेल्या व्यक्तिरेखा आणि कीर्ती शिलेदार यांनी रंगवलेल्या व्यक्तिरेखा यांत जमीन-अस्मानाचा फरक होता. पारंपरिक संगीत नाटकातील कलाकार फक्त गाणंच चोख गायचे, त्याव्यतिरिक्त आपण निभावत असलेल्या पात्राबाबत त्यांना फारशी आस्था नसायची. पण कीर्तीताईंनी आपल्या प्रत्येक नायिकेचं गाणं तर बंद्या रुपयासारखं खणखणीत गायलंच, शिवाय प्रत्येक नायिकेला

तिचा-तिचा म्हणून आविर्भावही दिला. त्या-त्या भूमिकेला साजेसा स्वभाव-विभावही बहाल केला आणि तो रंगमंचावरील आपल्या वावरण्यातून अधोरेखितही केला. आईवडिलांकडून, म्हणजेच जयमालाबाई आणि जयराम शिलेदार यांच्याकडून गाणं तर जन्मजातच लाभलं होतं. घरातूनच लहानपणी मिळालेली तालीमही पक्की होती. परंतु केवळ गाणं हा कीर्तीताईंच्या भूमिकेचा सर्वोच्च बिंदू कधीच नव्हता. गाण्याबरोबरच गद्य संवादांना दिलेला न्याय आणि भूमिका निभावत असलेल्या व्यक्तिरेखेच्या मनातील भावनांचा केलेला रसपरिपोष, ही त्यांची खासियत होती. सर्व गुणांचा असा समुच्चय कीर्तीताईंच्या ठायी असल्यामुळेच त्यांच्या सगळ्या नायिका जिवंत व्हायच्या. नव्हे, रुक्मिणी-भामिनी-मैनाराणी-शारदा या कीर्तीताईंपासून वेगळ्या काढता यायच्या नाहीत. कीर्तीताई त्याक्षणी ता साऱ्या जणींचंच जगणं त्यांच्या-त्यांच्या सुखदुःखासह जगायच्या. म्हणून तर कान्होपात्राच्या रूपात त्या 'अगा वैकुंठीच्या राया' म्हणत टाहो फोडायच्या तेव्हा प्रेक्षकांच्या डोळ्यांत पाणी तरळायचं आणि रुक्मिणीच्या रूपात 'नरवर कृष्णासमान' हे पद आळवताना 'कितीक नृपती ते आले गेले' ही ओळ पुनःपुन्हा आळवताना त्या अभिनयाच्या ज्या नाना तऱ्हा दाखवायच्या, त्यानं प्रेक्षक अक्षरशः मोहरून जायचा. आणि कीर्तीताईंच्या या अभिनयात मोठी बाजी मारून जायचे ते त्यांचे डोळे.

आपले दोन डोळे हे आपल्या भावाभिव्यक्तीचं सगळ्यात मोठं साधन आहे, असं त्यांना त्यांच्या नानांनी म्हणजे वडिलांनी लहानपणीच सांगून ठेवलं होतं, त्याचं कीर्तीताईंनी आजन्म पालन केलं. त्यांच्या गाण्यातील भाव त्यांच्या डोळ्यांत कधी उतरायचे, तेच कळायचं नाही. केवळ संगीत रंगभूमीवर गातानाच नाही, तर एरवीही त्या गळ्यांतून आणि डोळ्यांतूनच बोलायच्या. या संदर्भातील प्रसिद्ध विचारवंत रावसाहेब कसबे यांचा एक अनुभव सांगण्यासारखा आहे. आपल्या संतानी कोणत्याही प्रकारचं सामाजिक कार्य केलं नाही, समाजाला दिशा दाखवली नाही, असं रावसाहेबांचं मत अभ्यासाअंती आणि निरीक्षणाअंती तयार झालं होतं. मात्र एका कार्यक्रमात त्यांनी कीर्तीताईंनी गायलेला चोखामेळ्याचा 'जोहार मायबाप जोहार, तुमच्या महाराचा मी महार' हा अभंग ऐकला आणि त्यांचं संतपरंपरेविषयीचं मत एकदम बदललं. ते म्हणतात- 'मराठी संतांबाबत माझं मत कधीच अनुकूल नव्हतं. परंतु मी कीर्ती शिलेदार यांनी गायलेला चोखामेळ्याचा अभंग ऐकला आणि मी अंतर्बाह्य थरारलो. कीर्ती शिलेदारांनी चोखामेळ्याची वेदना ज्या प्रखरपणे आणि उत्कटतेनं सादर केली, ती माझ्या थेट अंतरंगात पोचली नि मी संतसाहित्याचा नव्यानं अभ्यास सुरू केला.'

कुठलीही भूमिका अभ्यासाशिवाय सादर करायची नाही, असा जयराम आणि जयमाला शिलेदार या दाम्पत्याचा दंडक होता आणि तो त्यांच्या लता (आता दीप्ती भोगले) आणि कीर्ती या दोन मुलींसाठीही होता. म्हणून तर लहानपणी एकदा या दोघी जणी नानांचं आणि आईचं नाटक पाहून आल्यावर त्यात कुणाचं काय चुकलं ते नकला करून सांगू लागल्या, तेव्हा नानांनी त्या दोघींसोबत आपला पुतण्या सुरेश याला घेऊन तिघा छोट्या शिलेदारांचं 'संगीत सौभद्र' नाटक बसवलं; जेणे करून मुलांची कला केवळ नकला करण्यात वाया जाऊ नये. या तीन शिलेदारांच्या सौभद्राला तेव्हा म हाराष्ट्रातील रसिकांचा मोठाच प्रतिसाद मिळाला होता. या नाटकाची आठवण सांगताना एकदा कीर्तीताई म्हणाल्या होत्या- 'नानांनी खरं तर आम्हाला अद्दल घडवण्यासाठीच हे नाटक बसवायला घेतलं. चांगली वर्षभर तालीम घेतली. आम्हाला भूमिका वाटून दिल्या. आईनं आमची गाण्याची तयारी करून घेतली. माझ्या बहिणीचा, लताचा गळा तयार होता, पण माझा आवाज काही केल्या तेव्हा फिरत नव्हता. मग आईनं तान आलीच पाहिजे ही जबरदस्ती न करता, सुवर्णमध्य काढत मला बेहलाव्याचं गाणं शिकवलं. मला लयीची थोडीशी जाण होती. सम महत्त्वाची हे डोक्यात फिट्ट बसलं होतं. समेला आलंच पाहिजे ही एक भावना पहिल्यापासून होती, त्यामुळे मला फार श्रम पडले नाहीत. शिलेदारांच्या या 'सौभद्र'मध्ये स्त्री भूमिकेतून पुरुष भूमिकेत, पुन्हा पुरुष भूमिकेतून स्त्री भूमिकेमध्ये मी लीलया ये-जा करायचे. हा सगळा प्रयत्न नाट्यविषयक जडणघडणीत खूप महत्त्वाचा ठरला.'

विशेष म्हणजे या तीन चिमुकल्यांचं हे संगीत सौभद्र पाहून खुद्द ना.सी. फडके यांनी जयराम शिलेदार यांना पत्र पाठवून- 'या तीन शिलेदारांच्या रूपानं तुम्ही नटेश्वराच्या चरणी हृदय अर्पण केलंय...' अशी कौतुकाची थाप दिली होती.

मात्र लहानपणीच नाही, आताआतापर्यंत नकला हा कीर्तीताईंचा जिव्हाळ्याचा विषय होता. त्या हुकमी नकला करायच्या. 'संगीत सौभद्र'च्या एका प्रयोगात बालगंधर्वांना सुभद्रा म्हणून उभं राहणं शक्य नव्हतं. तेव्हा त्यांनी जयमालाबाईंना सुभद्रा साकारायला सांगितली आणि त्यांनीही ती बालगंधर्वांइतकीच सुरेख साकारली. विशेष म्हणजे तेव्हा जयमालाबाई कीर्तीताईंच्या वेळी गरोदर होत्या. त्यामुळेच गाणं तर मी अभिमन्यूसारखं आईच्या पोटातच शिकलेय असं त्या सांगायच्या आणि खरोखरच तसं असल्यासारखं त्यांना नाटकातल्या कलावंतांनी गाण्यात केलेल्या चुका लगेच कळायच्या... की मग घरी आल्यावर त्या चुकांच्या नकलांची त्यांची उजळणी सुरू व्हायची. पण याचा फायदाही झाला. नकळत्या वयापासून संगीत नाटकं पाहिली असल्यामुळे त्यांनी नाटकातील गद्य-पद्य सगळंच पाठ असायचं. त्यामुळेच एकदा 'ललित कलादर्श'चा ग्वाल्हेरला 'सौभद्र' नाटकाचा प्रयोग असताना नारदाची भूमिका करणारा कलाकार येणार नव्हता, तेव्हा नटवर्य भालचंद्र पेंढारकरांनी 'तुमचा छोटा नारद आम्हाला मिळेल का' अशी विचारणा जयराम आणि जयमालाबाईंकडे केली आणि वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी कीर्तीताईंनी नारदाची भूमिका अगदी लीलया पार पाडली, त्यातील 'पावना वामना' या गाण्यासकट.

कीर्ती शिलेदारांचं संगीतशिक्षण घरातच झालं. जयराम आणि जयमालाबाई हेच त्यांच्या दोन्ही मुलींचे पहिले गुरू. लता आणि कीर्ती दोघींनाही गाण्याची आवड होती आणि साहजिकच त्यांच्यावर संगीताचे म्हणून जे पहिले संस्कार झाले ते संगीत रंगभूमीचेच होते.

विशेष म्हणजे संगीत रंगभूमीच्या वलयापासून दूर जावंसं असं ना कधी जयराम-जयमालाबाईंना वाटलं, ना कधी लता-कीर्ती या त्यांच्या दोन मुलींना वाटलं. उलट या चौघांनीही संगीत रंगभूमीच्या पडत्या कळात संगीत रंगभूमीचा तंबू 'मराठी रंगभूमी' या आपल्या नाट्यसंस्थेच्या माध्यमातून एकहाती सांभाळला. लताताई काय किंवा कीर्तीताई काय; दोघींचीही गाण्याची उपज आणि ताकद अफाट होती. लताताईंचं गाणं भारदस्त आणि पल्लेदार होतं, तर लाघव, चापल्य आणि लालित्य हे कीर्तीताईंच्या गाण्याचं वैशिष्ट्य होतं. त्यांच्या या गायनवैशिष्ट्याला पैलू पाडून अधिक चमकदार नि टोकदार केलं, ते पं. नीळकंठबुवा अभ्यंकर यांनी. विद्याधर गोखले यांनी खास कीर्ती शिलेदार यांच्यासाठीच 'संगीत स्वरसम्राज्ञी' हे नटक लिहिलं. या संगीत नाटकातील पदांना नीळकंठबुवांनी चाली दिल्या होत्या. त्या चाली शिकवण्याच्या निमित्तानं कीर्ती शिलेदार आणि बुवांच्या भेटी सुरू झाल्या आणि मग ते गुरू-शिष्याचं नातं त्या नाटकापुरतं मर्यादित न राहता, कायमसाठीचं झालं. बुवांनी लताताई-कीर्तीताई दोघींना शास्त्रीय संगीताचे धडे दिले आणि त्यामुळे त्यांच्या मूळच्या गाण्याला अधिक बळ मिळालं.

कीर्तीताईंचं गाणं बोलकं होतंच, पण त्यांचे गद्य संवादही तेवढेच बोलके होते आणि त्याचं श्रेय त्या कायमच मा. दत्तारामांना देत आल्या. संगीत रंगभूमीवरील महत्त्वाच्या नायिका लहानपणीच साकारल्यावर वयाच्या पंधरा-सोळाव्या वर्षीच कीर्तीताईंना रुक्मिणीचा मोह पडला. खरं तर संगीत नाटकातील इतर नायिकांपेक्षा रुक्मिणीची भूमिका काहीशी भारदस्त आणि करायलाही कठीण. त्यातली नाट्यपदं आणि गद्य संवादही कलावंताचा कस पाहणारी. म्हणूनच कीर्तीताईंनी जेव्हा रुक्मिणी करायचं ठरवलं, तेव्हा जयमालाबाईंनी आधी त्यांची रुक्मिणीच्या भूमिकेतील नाट्यपदांची तयारी करून घेतली आणि ती पक्की झाल्यावर त्यांना मुंबईजवळ वसईला मास्टर दत्तारामांकडे 'स्वयंवर'मधील गद्य संवादांच्या तालमीसाठी पाठवलं. मास्टर दत्ताराम हे तेव्हा संगीत रंगभूमीवरीलच नाही, तर एकूणच रंगभूमीवरील मोठं नाव होतं. जुनी आणि नवी रंगभूमी त्यांनी पाहिलेली होती. जुन्या संगीत नाटकांतील पल्लेदार वाक्यांची परिभाषा त्यांच्या अंगवळणी पडली होती. म्हणूनच ती शिकण्यासाठी जयराम-जयमालाबाईंनी आपल्या दोन्ही मुलींना मा. दत्तारामांकडे पाठवलं आणि त्यांनीही लताताई-कीर्तीताई दोघींना गद्य संवादांमध्येही गाण्यासारखी लय कशी असते, ताल कसा असतो आणि गद्यातही वरचा व खालचा स्वर कसा लावायचा ते शिकवलं. कीर्तीताई या मार्गदर्शनासाठी शेवटपर्यंत मा. दत्तारामांच्या ऋणी राहिलेल्या आहेत.


कीर्तीताई काय किंवा लताताई काय, दोघींनी आपल्या आई-वडिलांप्रमाणेच आजन्म संगीत रंगभूमी हेच आपलं आपलं कार्यक्षेत्र मानलं. संगीत रंगभूमीच त्यांनी जपली आणि वाढवलीही. कीर्तीताईंच्या बाबतीत आणखी एक विशेष म्हणजे- बालगंधर्वांनी ज्या-ज्या नायिका साकारल्या, त्या साऱ्या जयमालाबाईंनी साकारल्या आणि त्याच कीर्तीताईंनीही साकारल्या. मात्र बालगंधर्व आणि जयमालाबाईंचा यथोचित आदर राखूनही, हे म्हणावंच लागेल की कीर्तीताई त्यांच्याही पुढे गेल्या!

...कारण कीर्ती शिलेदार यांनी त्या नायिका साकारल्या नाही, तर त्या नायिकाच कीर्ती शिलेदार बनून अवतरल्या...


**– डॉ. मुकुंद कुळे**

mukundkule@gmail.com
भ्रमणध्वनी : ९७६९९८२४२४

॥ग्रंथाली॥




शरद काळे
यांचे
दोन पुस्तके




**चिंतन - भाग २**

**मूल्य ७५० रु.**
**सवलतीत ४५० रु.**

**विज्ञानाच्या पाऊलखुणा**

**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २४० रु.**



# यशाचे धडे न गिरवणारा प्रकाशक

**राम जगताप**

**पुणे-मुंबई** ही शहरे अगदी सुरुवातीपासूनच मराठी ग्रंथप्रकाशनाची गंगोत्री राहत आली आहेत. त्यातही गेल्या काही वर्षांत पुण्याने पहिल्या नंबरवर आपली मोहोर कायम ठेवली आहे. जवळपास साठ टक्क्यांहून अधिक मराठी प्रकाशन व्यवसाय पुण्यात एकवटलेला आहे. त्यात मूळचे पुणेकर प्रकाशक किती? म्हणजे ज्यांचा जन्म पुण्यात झाला आहे किंवा जे वाडवडिलांपासून पुण्यात राहत आले आहेत, असे मराठी प्रकाशक किती? त्यांची संख्या सुरुवातीपासूनच कमी आहे. पुण्यातले एकेकाळचे आणि आजचे आघाडीचे बहुतेक पण प्रकाशक हे मूळचे पुणेकर नाहीत. ते व्यवसायानिमित्त पुण्यात आले. धडपड करत, किडुकमिडूक व्यवसाय वा नोकरी-कामधंदा करत पुण्यात स्थिरावले आणि नंतरच्या काळात प्रकाशक म्हणून नावारूपाला आले. 'पद्मगंधा प्रकाशना'चे अरुण जाखडे हे त्यांपैकीच एक.



अरुण जाखडे

जाखडे मूळचे अहमदनगर जिल्ह्यातल्या पेडगाव या एका छोट्याशा खेडेगावातले. त्यांचे वडील शेतकरी. लहानपणी त्यांच्या घरी साधे वर्तमानपत्रही येत नसे. जाखडे शिकले. बी.एससी. झाल्यानंतर नगरच्या कायनेटिक इंजिनीयरिंग लि.मध्ये नोकरीला लागले. थोड्या दिवसांनी ड्रिल्को मेटल कार्बाईड्समध्ये गेले. तिथल्या मॅनेजरने त्यांच्यातली चुणूक हेरून त्यांना धातुशास्त्राच्या पुढच्या परीक्षा द्यायला सांगितल्या. त्या नगरमध्ये राहून देणे शक्य नव्हते, म्हणून ते ६ मे १९८२ रोजी ते पुण्यात आले. बजाज टेम्पोमध्ये नोकरीला लागले. भोसरीला एका चाळीत राहू लागले. वाचनाची-साहित्याची त्यांना आवड होती. त्यामुळे त्यांनी आपल्या सहकारी कामगारांसाठी सांस्कृतिक उपक्रम राबवायला सुरुवात केली. साहित्य परिषदेची शाखा काढली. साहित्यिक कार्यक्रम घ्यायला सुरुवात केली. त्यामुळे या कामगारांच्या साहित्यप्रेमाला चालना मिळाली. पण त्यांचे साहित्य छापणार कोण, हा प्रश्न होता. त्यातून जाखडेंनी १९८८ साली 'पद्मगंधा' हा दिवाळी अंक काढला. तेव्हा खरे तर त्यांना संपादन, अंकमांडणी, मुद्रण, कागद यातली कसलीही माहिती नव्हती. साहित्यप्रेम आणि हौस मात्र दांडगी होती. शिवाय मशिनशी खेळणं हा त्यांच्या कामाचा भाग होता. त्यामुळे कंपनीतून बाहेर पडल्यावर ते मुद्रणालयात जात आणि मुद्रण कसे होते, ते समजून घेत. १९८९मध्ये छत्रपती संभाजी-महाराजांची त्रिशताब्दी होती. त्यानिमित्त त्या वर्षी त्यांनी बरीच भाषणे केली. त्या भाषणांचे 'धर्मवीर छत्रपती संभाजीमहाराज' हे पुस्तक स्वत:च प्रकाशित केले आणि जाखडे संपादकानंतर लेखकही झाले.

'पद्मगंधा'मुळे त्यांचा साहित्यिकांशी संबंध येऊ लागला, ओळखी झाल्या. सुरुवातीला ते दिवाळी अंकातल्याच मजकुराची पुस्तके प्रकाशित करू लागले. त्यातून त्यांची रुची वाढत गेली

आणि १९९६मध्ये त्यांनी डॉ. रा.चिं. ढेरे यांची एकाच वेळी तीन पुस्तके प्रकाशित करून 'पद्मगंधा प्रकाशना'ला सुरुवात केली. ढेरेंसारख्या व्रतस्थ संशोधकाची पुस्तके काढल्यामुळे त्यांच्याकडे पुण्या-मुंबईतल्या साहित्य-जाणकारांचे लक्ष वेधले गेले. नोकरी सांभाळत त्यात हळूहळू जम बसू लागला, तसा त्यांनी २०००मध्ये नोकरी सोडून पूर्ण वेळ प्रकाशक होण्याचा निर्णय घेतला.

गावाकडे असताना, शेती करतानाही जाखडे यांचे संवेदनशील मन लोकजीवन, लोकसंस्कृती न्याहाळत, अनुभवत आणि अभ्यासत होते. महाविद्यालयीन जीवनात केलेल्या वाचनातून त्यांची साहित्यअभिरुची घडत गेली होती. त्यामुळे लोकसाहित्य, देवताविज्ञान, मिथके-रूढी-परंपरा जाणून घेण्याची आवड त्यांच्यात निर्माण झाली. या गावाने दिलेल्या संस्कारातून जाखडे यांची जडणघडण झाली होती. त्यांच्या 'पद्मगंधा' दिवाळी अंकाचे स्वरूप आणि प्रकाशनसंस्थेच्या माध्यमातून त्यांनी प्रकाशित केलेली, लोकसाहित्य, साहित्य-समीक्षा, संदर्भग्रंथ या वाङ्मयप्रकारांतली पुस्तके पाहिली, की त्याचा प्रत्यय येतो. किंबहुना हीच त्यांच्या प्रकाशनसंस्थेची मुख्य ओळख आहे.

रामचंद्र देखणे, निनाद बेडेकर, व्यंकटेश माडगूळकर, रा.चिं. ढेरे, द.दि. पुंडे, कल्याण इनामदार, द.भि. कुलकर्णी, व.दि. कुलकणी, गंगाधर महांबरे, स.रा. गाडगीळ, के.रं. शिरवाडकर, प्रा. रा.ग. जाधव, गणेश देवी, यांच्याशी त्यांचा कामानिमित्त संपर्क आला. या मान्यवर लेखकांनी जाखडेंची तळमळ, सच्चेपणा आणि कष्टाळू वृत्ती पाहून त्यांना खुशीने आपली पुस्तके दिली. रविमुकुल हे चित्रकारही सुरुवातीपासून त्यांच्याशी जोडले गेले. ह.वि. मोटे प्रकाशन आणि मौज प्रकाशन गृह ही जाखडे यांची प्रेरणास्थाने बनली. त्यांचा वारसा जाखड्यांनी आपल्या परीने चालवण्याचा प्रयत्न केला.

जाखड्यांनी सुरुवातीपासूनच गंभीर स्वरूपाचीच पुस्तके प्रकाशित केली. त्यामुळे मराठी साहित्यातील धुरिणांचे त्यांच्याकडे लक्ष वळले. त्याचाच परिणाम म्हणून अगदी गो वि. करंदीकरांसारख्या तिरपागड्या स्वभावाच्या लेखकानेही आपले समीक्षेचे पुस्तक त्यांना सहजपणे दिले.

रा.चिं. ढेरे यांची संशोधनात्मक पुस्तके, निवडक र.धों. कर्वे, भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण, श्री.व्यं. केतकरांच्या कादंबऱ्यांचे पुनर्प्रकाशन, अगाथा ख्रिस्ती या लेखिकेच्या अनुवादित पुस्तकांची मालिका, असे विविध प्रकल्प जाखड्यांनी राबवले. गणेश देवी, द.भि. कुलकर्णी, के.रं. शिरवाडकर, रा.ग. जाधव, जर्नादन वाघमारे, रामचंद्र देखणे, गणेश देवी यांची पुस्तके प्रकाशित केली. रा. चिं. ढेरे यांची तर 'श्रीनरसिंहोपासना – उदय आणि विकास', 'श्रीपर्वताच्या छायेत', लज्जागौरी', 'दक्षिणेचा लोकदेव श्रीखंडोबा', 'श्रीविठ्ठल – एक महासमन्वय', 'नाथसंप्रदायाचा इतिहास', 'करविरनिवासिनी श्रीमहालक्ष्मी', 'दत्तसंप्रदायाचा इतिहास', 'लोकदैवतांचे विश्व', 'तुळजाभवानी', 'लोकसाहित्य – शोध आणि समीक्षा', 'मुसलमान मराठी संतकवी', 'संत, लोक आणि अभिजन', 'श्रीआनंदनायकी', 'लोकसंस्कृतीचे उपासक', अशी विविध पुस्तके प्रकाशित केली. लोकसाहित्य, लोकसंस्कृती, साहित्यसमीक्षा हाच जाखड्यांचा सर्वाधिक आवडीचा विषय होता. या वाङ्मयप्रकारातील नव्या-जुन्या लेखकांची कितीतरी पुस्तके त्यांनी हौसेने प्रकाशित केली.

कविता, विनोद, कथा, कादंबऱ्या या वाङ्मयप्रकारातील पुस्तकेही प्रकाशित केली, पण ती तुलनेने कमी म्हणावी अशीच. त्याचप्रमाणे चरित्र-आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारातली पुस्तकेही तशी कमीच काढली. उदाहरणार्थ, ज.श्री. टिळक यांचे 'मी जयंत टिळक', डॉ. कुमार सप्तर्षी यांचे 'येरवडा विद्यापीठातील दिवस', राजू शेट्टी यांचे 'शिवार ते संसद' अशी मोजकी आत्मकथनपर पुस्तके दिसतात.

'प्रतिभा आणि सर्जनशीलता', 'राष्ट्र आणि राष्ट्रवाद' (सुधाकर देशमुख), 'हाल सातवाहनाची गाथासप्तशती' (संपा. स.आ. जोगळेकर), 'उत्तम मध्यम' (श्री. बा. जोशी), 'कार्ल मार्क्स : व्यक्ती आणि विचार', 'फ्रेडरिक नित्शे : जीवन आणि तत्त्वज्ञान' (विश्वास पाटील), 'मागोवा मिथकांचा' (सुकन्या आगाशे), 'दोन फुल एक हाफ' (तंबीदुराई), 'मुंगी : अदभुत विश्व' (प्रदीपकुमार माने) अशी कितीतरी मौलिक पुस्तकेही त्यांनी प्रकाशित केली. अरुण टिकेकर यांच्यावरील गौरवग्रंथ अतिशय देखण्या स्वरूपात प्रकाशित केला.

अनुवादित साहित्यातही जाखड्यांनी तशी फारशी खपावू नसलेलीच पुस्तके प्रकाशित केली. उदाहरणार्थ, सिमॉन द बोव्हुआर यांचे 'द सेकंड सेक्स', अल्बेर काम्युचे 'आऊटसायडर', गाओ झिंगजिआन यांचे 'सोल माऊंटन', जाँ पॉल सार्त्रचे 'द वर्ड्स', टोनी मॉरिसनचे 'बिलिव्हड', अमिताव गोष यांची 'सी ऑफ पॉपीज', जोनाथन गिल हॅरिस यांचे 'द फर्स्ट फिरंगीज', एम. जी. लिमये यांचे 'व्हल्चर्स', ए. एम. टी. जॅक्सन यांचे 'कोकणची लोकसंस्कृती', ॲन फेल्डहाऊस यांचे 'नदी आणि स्त्रीत्व', मिनेका इवासाकी यांचे 'गेशा ऑफ गिओन', मागरिट मिचेल यांचे 'गॉन विथ द विन्ड', पॅट्रिक लेव्ही यांचे 'लिव्हिंग विथ साधुज्', जॉन गुंथर यांचे 'डेथ बी नॉट प्राउड' इत्यादी.

२००३ साली म्हणजे अवघ्या सात वर्षांतच पद्मगंधा प्रकाशनाला मुंबई मराठी साहित्य संघातर्फे दिला जाणारा वि.पु. भागवत उत्कृष्ट प्रकाशक पुरस्कार जाहीर झाला. त्यांच्या प्रकाशनसंस्थेने २०२०मध्ये रौप्यमहोत्सवी पर्दापण केले, तेव्हा त्यांना राज्य सरकारतर्फे दिला जाणारा श्री.पु. भागवत उत्कृष्ट प्रकाशक पुरस्कारही मिळाला. त्यानिमित्ताने त्यांची साप्ताहिक साधनाच्या ४ एप्रिल २०२०च्या अंकात सविस्तर मुलाखत प्रकाशित झाली आहे. तिचे शीर्षक आहे- 'पुरस्कार स्वीकारताना निर्भेळ असा आनंद होत नाही!' त्यामागची तीन कारणे त्यांनी सांगितली आहेत – एक- ''खरं सांगायचं तर आता या व्यवसायातली मजा संपलेली आहे. मी ज्या वेळी या व्यवसायात आलो तेव्हा कमीत कमी दोन वेळची भाकरी तरी मिळेल, याची शाश्वती असायची. आता ती परिस्थिती राहिलेली नाही. त्यामुळे नव्याने या व्यवसायात येणाऱ्यांची काळजी वाटते. दोन- या व्यवसायातले माझे सर्व सहकारी या ना त्या कारणाने अडचणीत आहेत. आपल्याच व्यवसायातील लोक जर कष्टी असतील, तर तो आनंद निर्भेळ राहत नाही. तीन- ज्याच्यातून

काही भलं होईल, असं आता तरी समाजात काही दिसत नाही. अतिशय गांभीर्यानं लेखन करणारे संशोधक दुर्मिळ होत चालले आहेत. समाज ग्रंथसन्मुखतेपासून दूर जात आहे. पुढं आशा जिवंत राहाव्यात असा समाजाकडूनही ग्रंथांना प्रतिसाद मिळत नाही.''

'माझं गाव आणि शेत हीच माझ्या लेखनाची प्रयोगशाळा आहे', असे जाखडे म्हणत. शेती-मातीशी संबंध नसलेल्या आणि लोकजीवन, लोकसंस्कृती यांच्याशी दुरान्वयेही संबंध न राहिलेल्या मध्यमवर्गीयांना जाखडे यांच्या पद्मगंधा प्रकाशनाची पुस्तके विशेष आकर्षित करणारी नव्हती. जाणकारांची दाद किंवा पुरस्कार यांच्यामुळे कुठलाही व्यवसाय किंवा संस्था चालत नाही. त्यासाठी तिला बाजारपेठेतही चांगले स्थान असावे लागते. जाखडे प्रकाशित करणारी पुस्तके चार-दोन अपवाद वगळता काउंटर-सेलला विकली जाणारी नव्हती. 'जी पुस्तकं घरात असावीत आणि ज्यांचा संदर्भ उपयुक्त ठरावा, अशी पुस्तकं मी प्रकाशित करतो' असे ते अभिमानाने सांगत. पण ज्यांचे पोट पुस्तके शिकवणे-वाचणे यांवर अवलंबून आहे, असा शिक्षकवर्गही सहसा अशा पुस्तकांच्या वाट्याला जात नाही, अशी तऱ्हा आहे. मग सामान्य वाचक अशी संदर्भबहुल पुस्तके विकत घेऊन घरात कसा ठेवणार आणि त्यांचा दैनंदिन जीवनात उपयोग तरी कसा करणार?

त्यामुळे जाखडे यांना त्यांचे काही समव्यावसायिक आणि ग्रंथव्यवहारातले धुरीण 'अयशस्वी प्रकाशक' असेही म्हणत. अलीकडच्या काळात जाखडे यांची सर्वाधिक विकली गेलेली पुस्तके कुठली, याचे उत्तर आहे अगाथा ख्रिस्ती या लेखिकेच्या रहस्य-गूढ कादंबऱ्यांचे अनुवाद. या प्रकल्पाने जाखड्यांना चांगलाच हात दिला, पण ही काही त्यांची आवड नव्हती. त्यामुळे हा प्रकल्प त्यांनी अपरिहार्यतेतूनच राबवला होता, असेच म्हणावे लागेल.

मातीतली माणसे फार चिवट असतात. ती स्वत:ला मातीत गाडून घेतात, स्वत:च्या आयुष्याचीही परवड करतात पण जे पिकवतात त्याचा लाभ कितीतरी जणांना होतो. जाखड्यांनी मातीतून धान्य पिकवले आणि पद्मगंधाच्या माध्यमातून त्याच पद्धतीने कितीतरी पुस्तकांचीही निर्मिती केली. भलेही त्यांची प्रसारमाध्यमांनी दखल घेतली नसेल, त्यावर परीक्षणे छापली नसतील, त्यांची विक्रीही खूप झाली नसेल, पण त्यांचे मोल नाकारता येत नाही. ती आज, उद्या आणि परवाही संदर्भग्रंथ म्हणून उपयुक्त ठरतील, अशीच आहेत.

'पद्मगंधा' हा दिवाळी अंकही जाखडे कायम गंभीर वाङ्मयीन स्वरूपाचाच काढत. त्यांनी कधीच मुखपृष्ठावर मादक, अर्धनग्न वलयांकित ललना छापल्या नाहीत आणि वलयांकित कलावंतांच्या मुलाखती छापून अंकाचा खप वाढवण्याचा प्रयत्नही केला नाही. तरीही 'पद्मगंधा'ने दिवाळी अंकांच्या भाऊगर्दीत आपले एक स्वतंत्र स्थान निर्माण केले होते. त्यामानाने त्यांनी सुरू केलेल्या 'आरोग्यदर्पण' या आरोग्यविषयक दिवाळी अंकाला तितकासा प्रतिसाद मिळाला नाही. मात्र 'उत्तम अनुवाद' या त्यांच्या दिवाळी अंकाला तसा बरा प्रतिसाद मिळाला. केवळ अनुवाद या विषयाला वाहिलेला हा अंक वैशिष्ट्यपूर्ण तर आहेच, तसाच तो बहुधा मराठीतला अशा स्वरूपाचा एकमेव अंकही आहे.

जाखडे संपादक, प्रकाशक होतेच, बरोबर लेखकही होते. 'शोधवेडाच्या कथा', 'भारताचा स्वातंत्र्यलढा', 'विश्वरूपी रबर', 'प्रयोगशाळेत काम कसे करावे', 'लोहमित्र धातू जिंदाबाद', 'पावसाचे विज्ञान', 'गावमोहर', 'एक-एक काडी गवताची' अशी विविध उपयुक्त व विज्ञानविषयक पुस्तके त्यांनी लिहिली. त्याचबरोबर उसप्रश्नावर 'पाचरुट' ही कादंबरीही लिहिली आहे.

माती आणि नाती यांतच आपले आतडे गुंतवून टाकलेला जाखडे हा माणूस होता. ज्या हातात रुमणे धरले, त्याच हातात त्यांनी नंतरच्या काळात पुस्तके धरली. अगदी शून्यापासून सुरुवात करत, प्रत्येक गोष्ट शिकत त्यांनी पद्मगंधा ही प्रकाशनसंस्था अवघ्या आठ-दहा वर्षांतच नावारूपाला आणली.

पण जाखडे यांना बदलत्या काळाची दिशा ओळखता आली नाही, ही गोष्टही तितकीच खरी. १९९१ साली भारताने आर्थिक उदारीकरणाचे, म्हणजेच पर्यायानं जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले. त्यानंतर पाच वर्षांनी जाखडे यांनी प्रकाशनसंस्था सुरू केली. पण पुढच्या जवळपास १० वर्षांत जागतिकीकरणाने भारतीयांचे, महाराष्ट्रीयांचे आयुष्य उलटेपालटे करून टाकले. अमूलाग्र, अभूतपूर्व असे बदल या काळात समाजावर, समाजकारण-राजकारण-साहित्य-संस्कृती-शिक्षण यांच्यावर झाले. माणसांच्या जगण्याचे प्राधान्यक्रम बदलले, नीतीमूल्यांची संकल्पना बदलल्या. बाजारपेठ आणि ग्राहक हाच जणू माणसांचा स्थायीभाव आणि दैनंदिन स्वभाव बनला. शिवाय हे बदल इतके झपाट्याने होत गेले की, त्यांचा सुगावा लागेपर्यंत आपला भवताल उलटापालटा होत होता. अशा काळात जाखडे लोकसाहित्य, लोकसंस्कृती, साहित्य-समीक्षा, संदर्भग्रंथ अशा विषयांवरील पुस्तकांचाच खटाटोप करत राहिले. हा एक प्रकारे वेडेपणाच होता.

जागतिकीकरणानंतर मराठी ग्रंथव्यवहारात सेल्फ हेल्फ आणि तथाकथित बेस्टसेलर पुस्तकांना 'मोठे' महत्त्व आले. श्रीमंत कसे व्हावे, सीईओ कसे व्हावे, लोकांना कसे जिंकावे, यशस्वी कसे व्हावे, अशा कितीतरी प्रकारच्या पुस्तकांची मागणी वाढलीही आणि लादलीही गेली. आधी आपले उत्पादन तयार करायचे आणि मग जाहिरात-प्रचारतंत्राचा प्रभावी वापर करून त्याची गरज निर्माण करायची आणि ते विकायचे, असे एक अघोरी तत्त्वज्ञान याच काळात जन्माला आले. त्यात अनेक मराठी प्रकाशकांनी स्वत:चे चांगभले करून घेतले. पण जाखडे या पुस्तकांच्या नादाला लागले नाहीत.

'समकालीन संस्कृतीचं सुईणपण करण्याचा आनंद मला मिळतो', 'मी स्वत:ला पुस्तक प्रकाशक न समजता ग्रंथप्रकाशक समजतो', 'शेती आणि प्रकाशन-लेखन यात नवसर्जनाचा आनंद दडलेला आहे', या जाखडे यांच्या विधानांत बदलत्या वाऱ्याचा दिशा ओळखणारा धागा कुठे दिसतो? कुठेच नाही. दिसते ती फक्त त्यांची 'एकला चलो रे' वृत्ती!

याच काळात मराठी ग्रंथव्यवहारातही कितीतरी पडझड झाली. अगदी उदहारणेच सांगायची तर गेल्या काही वर्षांत पुण्यात, डेक्कनचे 'इंटरनॅशनल बुक डेपो' बंद झाले. फर्ग्युसन रस्त्यावरील 'अभिनव

बुक सेंटर' आणि 'पॉप्युलर बुक हाऊस' ही पुस्तकांची दोन दुकानं बंद झाली. (इतकेच नव्हे तर 'ऑक्स्फर्ड बुक स्टोअर'ही बंद झाले.) उपेंद्र कुलकर्णी यांच्या निधनानंतर श्रीविद्या ही प्रकाशन संस्था केवळ म्हणायला चालू आहे. कॉन्टिनेन्टलही जेमतेम चालू आहे. देशमुख आणि कंपनी व वरदा प्रकाशन यांचीही तीच गत आहे. प्रेस्टिज प्रकाशन, प्रतिमा प्रकाशन, अस्मिता व रविराज प्रकाशन, व्हिनस प्रकाशन प्रकाशनसंस्था बंद झाल्या. संदेश बुक एजन्सी बंद झालीय. याशिवाय छोटी-मोठी किती मुद्रणालये बंद झाली, याची तर कुणाला खबरबातही नाही.

हे सगळे जाखडे इतर अनेकांप्रमाणे हताशपणे पाहत होते. त्यातून त्यांचा मराठी प्रकाशन-व्यवसायाविषयी भ्रमनिरासच होत गेला. मौलिक पुस्तकांविषयी, अभ्यासपूर्ण संदर्भग्रंथांविषयी, संशोधनातून सिद्ध झालेल्या लेखनाविषयी आणि एकंदर गंभीरपणे लिहिलेल्या पुस्तकांविषयी मराठी माणसांची जी उदासीनता, गेल्या तीसेक वर्षांत सातत्याने उजागर होत आली आहे, त्याचे त्यांना अतोनात दु:ख होत असे.

पाचेक वर्षांपूर्वी म्हणजे २०१६मध्ये पुण्यात भेटले तेव्हा बरेच बोलत होते. अगदी भडभडून आल्यासारखे. मी आता पुण्यात फारसा नसतो, गावी राहून शेती करतो. त्यात मस्त वेळ जातो आणि आनंदही मिळतो, असे काय काय सांगत होते. साधारणपणे याच काळात त्यांना थोडेसे नैराश्यानेही ग्रासले होते. तेव्हा त्यांच्या मुलीने त्यांना ब्लॉग लिहिण्याची कल्पना सुचवली. लेखनावर त्यांचे प्रेम होतेच. त्यामुळे या नव्या माध्यमात ते बऱ्यापैकी रमलेही. त्याला चांगला प्रतिसाद मिळाल्याने, ते लिहीत राहिले. त्यातून त्यांच्या 'हुसेनभाई बाताड्या' या पुस्तकाची निर्मिती झाली. त्याआधी त्यांनी 'दै. लोकसत्ता'च्या रविवार पुरवणीत 'इर्जिक' हे साप्ताहिक सदर सलग दोन वर्षे लिहिले. त्यातून त्यांच्या वेगळेपणाची, संवेदनशीलतेची, हळवेपणाची, रसिकतेची आणि अभ्यासूपणाचीही ओळख पुन्हा पुन्हा होत राहिली. हे त्यांचे एकमेव पुस्तक जे लोकवाङ्मयगृहाने प्रकाशित केले. त्याला महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कारही मिळाला.

अरुण जाखडे प्रकाशक म्हणून लोकप्रियता, प्रसिद्धी, स्टॉलवर्डनेस, सेलिब्रिटीनेस यांच्यापासून लांब राहिले. पण त्यांना भ्रमनिरासापासून लांब राहता किंवा स्वत:ला वाचवता आले नाही. गेल्या काही वर्षांत मराठी ग्रंथव्यवहारात प्रकाशनसंस्थांचा अक्षरश: सुळसुळाट झालेला आहे. त्यातल्या किती प्रकाशनसंस्था येत्या २५-३० वर्षांनंतर टिकून राहतील, माहीत नाही. मौज प्रकाशन गृहाच्या कितीतरी पुस्तकांच्या जुन्या माफक किमतीतल्या आवृत्त्या काल-परवापर्यंत पुस्तकांच्या दुकानांच्या कानाकोपऱ्यात धूळ खात पडलेल्या असत. २०-२५ वर्षांपूर्वीची ही पुस्तके वाचकांना फारशी आकर्षित करत नसत. ह.वि. मोटे यांनीही मोजकीच पुस्तके काढली. त्यांना त्यांच्या हयातीत फारसे यश मिळाले नाही, असे म्हणतात. पण गेल्या काही वर्षांत त्यांना जाणकारांच्या दृष्टीने विशेष महत्त्व येत गेले आहे. जाखडे यांच्या पद्मगंधा प्रकाशनाने २५ वर्षांत जे स्थान, ओळख मिळवली, ते या नव्या संस्थांना मिळवता येईल की नाही, माहीत नाही. जाखडे यांच्यानंतर पद्मगंधा प्रकाशनाचे, दिवाळी अंकाचे काय होईल? ते चालू राहील का? राहिले तर जाखडे यांनी केली तशी विचक्षण पुस्तके प्रकाशित होतील का? माहीत नाही. पण जेव्हा केव्हा मराठी प्रकाशन-व्यवसायाचा, त्यातील विचक्षण प्रकाशकांचा आणि त्यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा त्यात जाखडे यांची नोंद 'एक अवलिया, कल्पक, गंभीर आणि यशाचे धडे न गिरवणारा प्रकाशक' अशीच करून द्यावी लागेल.

जाखडे हा लिहित्या हाताचा, आपल्यासह आपल्या समव्यावसायिकांचाही विचार करणारा, मनस्वी, पुण्यात राहूनही पुणेरी न झालेला, आपले गावपण - अगदी थेट सांगायचे तर 'नगरी'पण शिल्लक ठेवलेला लोभस माणूस होता. त्यांचे बोलणे फटकळ होते, पण स्वभाव प्रेमळ होता. देशावरच्या लोकांना फणसाची उपमा सहजपणे देता येत नाही, त्यांना उसाचीच उपमा शोभून दिसते. जाखडेही तसेच होते. उसाची दोन-चार कांडकी खाऊन त्याची गोडी नीट कळत नाही आणि रेडिमेड रस पिऊनही त्याची खुमारी कळत नाही. त्यासाठी थेट उसाच्या शेतात जावे. त्याची पाती अंग कापणार नाहीत, याची काळजी घेत चांगला ऊस निवडावा. तो आपल्या हातांनी तोडून काढावा. त्याचा हिरवागार शेंडा गाईगुरांसमोर टाकावा किंवा त्यांच्यासाठी राखावा. ऊस गुडघ्यावर दाबून मोडावा आणि मुळाकडचा भाग टाकून द्यावा. आणि मग बांधावर बसून निवांतपणे चिवट्या सोलत तो चावून चावून खावा.

लांबवर पसरलेली हिरवीगार शेते, वाहणाऱ्या वाऱ्याचा नाद, आसपासच्या झाडांवरचा किलबिलाट, बांधावर पाय पसरून मारलेली बैठक आणि जिभेवर रेंगाळणारी उसाच्या रसाची चव. एखादी गोष्ट मन:पूत अनुभवल्याशिवाय तिचा खरा 'स्वाद' कळत नाही. अर्थात त्यासाठी आपल्याला मूळ प्रक्रियेचा भाग व्हावे लागते, वेळेची गुंतवणूकही करावी लागते.

जाखडे हा माणूस, लेखक आणि प्रकाशकही असाच होता. त्याच्या फार जवळ गेल्याशिवाय किंवा त्याच्याशी नाळ जोडल्याशिवाय तो इतरांना कळत नसे. ज्यांना जाखडे कळले, ते यापुढच्या काळातही कधी त्यांना विसरणार नाहीत आणि ज्यांना त्यांना प्रत्यक्षपणे जाणून घेता आले नाही, त्यांना यापुढच्या काळात त्यांनी प्रकाशित केलेल्या कितीतरी मौलिक पुस्तकांतून त्यांची ओळख करून घेता येईल, होत राहील. जाखडे गेले, पण त्यांच्या पद्मगंधा प्रकाशनाचा मराठी ग्रंथव्यवहारावरचा ठसा राहील, त्यांनी प्रकाशित केलेली पुस्तके आज-उद्या आणि परवाही राहतीलच...

**- राम जगताप**

('अक्षरनामा'वरून साभार)

jagtap.ram@gmail.com



# सहवास

## जयंत सावरकर

**दोन** नटांचा सहवास म्हणजे नेमकं काय? तो त्या नाटकापुरताच असतो. फार कमी नट असे असतात की जे व्यक्तिगत आयुष्यातसुद्धा एकमेकांच्या सहवासात असतात. भेटीगाठी काही सातत्यानं होत नाहीत. नाटकाच्या दौऱ्यात एकत्र असलो तरच भेट होते. या क्षेत्रातल्या जुन्या लोकांचे अगदी अनौपचारिक, जिव्हाळ्याचे संबंध असायचे. गेल्या काही वर्षांत तर असा सहवास फार राहिलेला नाही. निकटचा सहवास घडला नाही तरीही मैत्री होते – तशी आमची मैत्री होती – माझी आणि रामदासची!



रामदास कामत

अगदी कौटुंबिक पातळीवरची मैत्री नव्हती आणि इतकी गांभीर्यानं केली गेली नव्हती. तो नोकरी करून नाटकांत कामं करत असे आणि मी नोकरी सोडून या व्यवसायात शिरलो होतो. १९५७ सालापासून आम्हा दोघांची चांगली ओळख होती. मी या व्यवसायात आलो १९५५ मध्ये – हौशी नट म्हणून. तसाच तोही आला होता. त्यावेळेस साहित्य संघात ओपन एअर थिएटर होतं. आम्ही एकत्र सगळी नाटकं बघायचो. मी संघाच्या जवळच राहत होतो. रोज नाटक बघायचो. आम्हा दोघांची चौथ्या-पाचव्या रांगेतली सीट ठरलेली असायची. नाटकाला गर्दी नसली, संध्याकाळपासून तालीम असली की आम्ही तिथे जाऊन बसायचो. आमच्या गप्पा व्हायच्या नाटकांवर. गाणं हे त्याचं 'ॲडिशनल क्वालिफिकेशन' असल्यामुळं बरोबरची माणसं माझ्यापेक्षा त्याला जास्त मान द्यायची, ओळख दाखवायची. मलाही ते जाणवायचं की हा आपल्यापेक्षा 'वेगळा' आणि वेगळं शस्त्र असलेला 'अर्जुन' आहे! आम्ही 'सौभद्र'मध्ये एकत्र काम केलं तेव्हा आमची जास्त जवळीक झाली. त्याआधी मी त्याचा 'मत्स्यगंधा'चा पहिला प्रयोग पाहिला होता. मी सगळीच संगीत नाटकं बघत असे आणि काम करायला, बघायला गेलं की सगळ्या नटांशी परिचय व्हायचा. या नाटकातलं त्याचं गाणं मला अतिशय आवडलं. अत्यंत निकोप आवाज होता त्याचा. यांतली पदं, अभिषेकीबुवांच्या चाली, त्याचे अनुभव यांवर गप्पा रंगत.

'मत्स्यगंधा'नंतर त्यानं नोकरी बदलली. एअर इंडियात आणखी जबाबदारीच्या पदावर गेला. प्रायव्हेट फर्ममध्येच नोकरी करायची यावर आमचं एकमत होतं, कारण पगार जास्त मिळतो. मी मुंबईतून पहिला क्रमांक आलेला स्टेनोग्राफर होतो. मिनिटाला १८० शब्द लिहिण्याची फायनल परीक्षा फक्त पास होऊ शकलो नाही. 'बँकेत नोकरी करायची नाही' यातही आम्ही समविचारी! रामदास हुशारच होता, पदव्युत्तर होता. 'नाटक' या विषयावर आमच्या खूप गप्पा व्हायच्या. 'सौभद्र'मध्ये मी काम केलं. त्या नाटकात 'वक्रतुंड' नावाचं पात्र आहे; मात्र पुस्तकात त्याचा उल्लेख 'विदूषक'! बबन प्रभूला ते काम विचारलं होतं. त्यानं शोध-शोध शोधलं; पण पुस्तकात 'वक्रतुंड' सापडेना. निर्माता म्हणाला, जयंताला विचार. त्याला माहितीय. बबन मला म्हणाला, अरे, मला नावापासूनच काही माहीत नाही. तू त्या नाटकात बारीकसारीक काम केलंयस, नाटक बघितलंयस. तूच कर ते! नाटक व्यवसायात आल्यापासून सगळ्या प्रकारच्या नाटकांसाठी माझी

बॅकस्टेज उमेदवारी झाली – बारा वर्षं! तर मी 'वक्रतुंड' केला. वेशभूषेत त्या काळाप्रमाणे 'गोटा' असणं गरजेचं होतं. मेकअपमन त्यावेळेस पाच रुपये घ्यायचा. रामदास मला म्हणाला, बाकीचे तर वसईवाल्याची लाल कानटोपी घालतात भटजी करताना. तू मात्र तसं केलं नाही. मी म्हटलं, मला कारण सांगता येणार नाही. मात्र त्या काळी कुठली आली टोपी? असायचे ते मुकुट. आता भटजी काही मुकुट घालणार नाही. ऋषिमुनींच्या तर वाढलेल्या जटा! मग राहता राहिले आमच्यासारखे फुटकळ भिक्षुक– त्यांना काय तर 'गोटा'! निर्माता म्हणाला, आजचा दिवस पाच रुपये देतो, रोज देणं शक्य नाही. परवडणार नाही. मलाही शक्य नव्हतं. मुळात नाईट किती, तर पंधरा रुपये! त्यातले पाच रुपये द्यायचे तर घरी काय नेणार? इतक्या 'अर्जुनां'बरोबर मी काम केलं; पण जाणीवपूर्वक रामदासनं या लहानशा गोष्टीचं ॲप्रिसिएशन केलं, दाद दिली. मला त्याच्या निरीक्षणशक्तीचं, लहानसहान गोष्टी टिपणं, आवर्जून सांगणं याचं मनापासून कौतुक वाटलं. बिरबलाची गोष्ट नाही का– बैलाचं सोंग घेतलेल्या बहुरूप्याची परीक्षा पाहण्यासाठी बिरबलानं त्याला खडा मारला, तर त्याचं अंग थरारलं. तो झाला पास! तसं माझं झालं, की एका तरी माणसानं मला दाद दिली. माझा हुरूप वाढला.

रामदासची आणि माझी मैत्री तशी जुजबीच. 'मानापमान' नाटकात आम्ही एकत्र काम केलं तेव्हा त्यानं पहिल्यांदाच 'धैर्यधर' केला. 'विनोद' हे पात्र मी करत असे. त्यानं मला सांगितलं, की माझ्या लक्षात आलंय की तू विनोद निर्माण करण्यासाठी पदरचं काहीच बोलत नाहीस. लेखकानं मुळात लिहिलेला प्रसंग जास्त फुलवावा त्यासाठी एखाददुसरं वाक्य पदरचं बोलायची परवानगी असते, पण तेवढीच! त्या गोष्टीवर माझा कटाक्ष होता आणि त्याचाही – त्यामुळे पुन्हा आमचे विचार असे जुळले.

आणखी एक प्रसंग – प्रयोग झाल्यावर त्यानं मला विचारलं, की धैर्यधराचं काम कसं झालं? आता साधारणपणे लोक सांभाळून प्रतिक्रिया देतात. 'आवडलं', 'लोकांना आवडलं', अशा साधारण प्रतिक्रिया येतात. मात्र आमच्यात प्रतिक्रिया देण्याचा मोकळेपणा होता. माझं काम आटोपलं की विंगेत किंवा सभागृहात जाऊन उरलेलं नाटक पाहायचं ही माझी सवय. त्या दिवशी मी त्याला एवढंच म्हटलं, आज गाण्यात तोच तोपणा वाटला. त्यानंही ही प्रतिक्रिया अगदी सहज स्वीकारली. ही 'सहजता' या मैत्रीचा पाया होती. त्याचा माझ्याबद्दल थोडासा समज असा, की मला गाण्यातलं खूप कळतं. मला काही गाण्यातलं कळत नाही. गाण्याचा, गाणाऱ्यांचा सहवास मला खूप मिळाला. श्रीपादराव नेवरेकरांपासून अनेकांसोबत कामं केली. त्या अनुभवातून रामदासच्या गाण्याचा आस्वाद मला घेता आला.

एका नाटकाचा प्रयोग होता पेणला. नाटक झालं. रामदास म्हणाला, 'परत कसं जायचं? मी म्हणालो, आता पहाटेची गाडी! आता इथेच झोपायचं. पहाटे पहिली बस पेणहून मिळेल मुंबईला जायला. तो म्हणाला, अरे बापरे! त्याला ती सवय नव्हती. त्याची नोकरी होती; जी त्यानं शेवटपर्यंत सोडली नाही. याचं एक कारण या व्यवसायात आर्थिक स्थैर्य यायला खूप काळ जावा लागतो. एखादाच डॉ. घाणेकरांसारखा नशीबवान की ज्याला एका प्रयोगातच प्रसिद्धीचं वलय प्राप्त होतं. मात्र घाणेकरांनीही वर्देंच्या हाताखाली आंतरमहाविद्यालयीन वगैरे स्पर्धांमधून बरंच काम केलं होतं, याची लोकांना कल्पना नसते. रामदासनं नोकरी सोडली नाही याचं कारण 'आर्थिक स्थैर्य' हे असू शकतं आणि तेच कुठल्याही माणसाचं पहिलं कारण असतं. मी ज्यावेळेस नोकरी सोडली त्यावेळेस दोन मुलं होती पदरात. मात्र 'नोकरी' या विषयावर आमचं फार बोलणं होत नसलं तरी तिची गरज का ही जाणीव होती. इतर काही कौटुंबिक विषयांवर बोलण्यापेक्षा तो मला एवढंच म्हणाला, की मामा पेंडसेंचा जावई आहेस तू. तुला सासरा खूप मोठा मिळालाय. तुझ्यावर जबाबदारी आहे. मामा पेंडसे माझे सासरे खूप नावाजलेले होते. आताची पिढी कदाचित त्यांना ओळखत नसेल. 'जबाबदारी' अशा दृष्टीनं की सामान्यपणे इथे वावरतानासुद्धा जोपर्यंत मला स्वत:ला स्वतंत्र नाव, ओळख नाही, तोपर्यंत लोक त्यांच्याच नावानं मला ओळखणार. माझं स्थान निर्माण करताना या क्षेत्रात मला तितकं ठाशीव काम करायलाच हवं, या जबाबदारीचं ओझं होऊ न देता, त्याची जाणीव राहावी – हा निखळ मैत्रीतला सल्ला होता तो.

रामदास अत्यंत अदबशीर! अगदी गप्पा मारतानाही होणारे विनोद एका मर्यादेबाहेर जाऊन कधीही न करणारा. हा अजिबात हास्यविनोद, टिंगलटवाळ्या करत नाही वाटायचं आम्हाला; पण अत्यंत मर्यादशील वागणं हा त्याचा स्वभावच होता. अगदी अखेरच्या क्षणापर्यंत आमची मैत्री कायम राहिली.

५७ ते ६० मधली एक आठवण. तो तपकीर ओढत असे. एकदा मी त्याला आठवण करून दिली, की रामदास, तुम्ही तपकीर ओढत होता पूर्वी. आवाजावर काही परिणाम झाला नाही का हो? तो म्हणाला, नाही झाला. पण ते माझं कसं सुटलं ते काही मला आता सांगता येणार नाही, पण ती सुटली तपकीर, गेलीच माझ्या आयुष्यातनं. त्याला बाकी कधी कुठलंच व्यसन नव्हतं. कधीही असल्या गोष्टीत तो अडकलेला मी पाहिला नाही. १९६९ साली मी एका संगीत नाटकाची निर्मिती केली होती. 'प्रीत फुले स्वप्नात' – उषा–अनिरुद्धाची प्रेमकथा. माझ्या थोड्याशा हेकेखोरपणामुळे असेल पण मी म्हटलं की 'मी पैसे घालून नाटक करतोय तर मी निर्णय घेणार.' त्यात जवळजवळ सत्तर हजार रुपयांचा तोटा झाला. तीनशे रुपये तोळा दरानं बायकोचे सगळे दागिने विकले. हे रामदासला कळलं तेव्हा आमच्या मित्राकरवी माझ्याकडे निरोप पाठवला, की 'मी आर्थिक मदत करू शकत नाही. मित्र म्हणून एक जिवाभावाचा सल्ला एवढाच देतो की नुकसान झालंय; पण आलेल्या संकटाचा कुठलाही परिणाम स्वत:वर होऊ देऊ नको. कृपया व्यसनात अडकू नको.' मी व्यसनात अडकणारा नव्हतोच कारण माझी अशी धारणा होती की मी स्वत: पाच रुपये खर्च केले; तर घरातल्या प्रत्येकासाठी मला पाच रुपये खर्च करता आले पाहिजेत. निर्व्यसनी राहिलो हे मोठेपणा मिरवायला म्हणून म्हणत नाही; मात्र घरातल्या जबाबदाऱ्याच अशा होत्या की परिस्थितीनं

मला निर्व्यसनी ठेवलं. नोकरी सोडताना बायकोला सांगितलं होतं की मिळालेला प्रत्येक पैसा घरात देईन. दुसरं असं, की व्यसनं करून कुणीतरी मला घरी आणून सोडलं, हे कधीच होऊ द्यायचं नव्हतं. त्यामुळे ठरवून 'व्यसनाधीन' झालो नाही. या सगळ्या प्रसंगात मित्र म्हणून रामदासनं जिव्हाळ्यानं पाठवलेला निरोप मला खूप भावला.

रामदासचं कामसुद्धा अत्यंत शिस्तशीर! आमचा षण्मुखानंदला प्रयोग होता 'सौभद्र'मध्ये तो अर्जुनाचं काम करत असे. त्यात पं. राम मराठे होते, मा. दामले होते. अनेक गायक-नट नाटकात असले की लोकांना प्रेफरन्स असतो गाणं कुणाचं ऐकायचं. त्या दिवशीचा ऑडियन्स पं. राम मराठेंचा होता. कुणीही कुणाला काहीही सांगितलेलं नव्हतं; पण हे सगळं लक्षात घेऊन रामदास त्या दिवशी अगदी नेमकं, मोजकं गायला. कारण रामभाऊ कृष्णाचं काम करत होते, त्यांना गायला वेळ मिळाला पाहिजे. मा. दामले रामभाऊंच्या बरोबरीचे. नारदाचं काम करत होते, तेदेखील असंच मोजकं; परिणामकारक गायले. रामभाऊंनी वन्समोअर घेतले तरी पुन्हा गायले नाहीत. गाण्याचा कंटाळाच येणार नाही अशा पद्धतीनं त्यांनी प्रयोग रंगवला. प्रयोग जरा लांबलाही. षण्मुखानंदच्या संचालकांनी पडदा टाकावा लागेल म्हटलं, तेव्हा शेवटचा काही भाग आटोपता घेतला. या प्रसंगात रामदासची विचार करण्याची पद्धत मला महत्त्वाची वाटली. 'नाटक' हा त्याचा तसा अभ्यासाचा विषय नसला तरी आपण जे काम करतोय त्याचा प्रामाणिकपणे अभ्यास केला पाहिजे, वेळकाळानुरूप सुसंगत वागलं पाहिजे ही त्याची जाणीव माझ्यासारख्या दुय्यम भूमिका करून पुढे आलेल्या नटांना खूप मार्गदर्शक ठरणारी होती. तो म्हणाला, प्रयोग बांधेसूद झाला हे लोकांनी वाखाणणं महत्त्वाचं. त्याची जबाबदारी प्रत्येकाची असते. भावनांवर नियंत्रण असणं हा गुण नटाकडे असणं अत्यंत आवश्यक आहे. रामदासच्या शिस्तीचा दुसऱ्याला कधीही त्रास झाला नाही. आपलं काम सोडून इतरांत ढवळाढवळ करणं, अनाहूत सल्ले देणं हा त्याचा पिंडच नव्हता. वारंवार भेटी होत नव्हत्या; तरी आमच्यातला स्नेह कायम होताच.

शिस्तीची ही सवय आम्हा दोघांनाही, की नाटकात काम करताना 'ओव्हर ड्रॉ' करायचं नाही. 'प्रेक्षकांच्या ताब्यात आपण किती जायचं' यावर तो म्हणाला, की नटाची तुलना कुणाशी करावी वाटते तुला? मी म्हणालो, 'प्रेक्षकांना हसवण्याच्या आपल्याकडच्या दोनचार पद्धतीत एक असतो विदूषक! सर्कसमधला, नाटकासिनेमातला; अगदी रस्त्यावर एकपात्री करणारा, ट्रेनमध्ये शिट्ट्या वाजवणारा, वेगवेगळ्या पक्ष्यांचे आवाज काढणारा नकलाकार - ही प्रत्येकाची तऱ्हा आहे लोकांचं मनोरंजन करण्याची. पण मला वाटतं की नट हा 'विदूषक' नाही.' रामदास मला म्हणाला, की 'तेच मला तुला सांगायचंय की आपण लोकांना हसवताना किती त्यांच्या ताब्यात जायचं याचं भान ठेवायलाच हवं.' 'ॲक्टिंग फॉर गॅलरी' हे त्याला कधीच आवडलं नाही.


रामदास नोकरीनिमित्त परदेशी गेला. लोक म्हणत, 'काय नोकरीत अडकवून ठेवलंयस स्वत:ला.' तो शांत राहत असे. 'आपल्याला जोडा कुठे टोचतो हे शेवटी वापरणाऱ्यालाच कळतं.' नोकरी न सोडण्याची त्याची कारणं असतील ती स्वाभाविकही होती. यावर आमचं बोलणं कधी झालंच नाही; मात्र त्याची भावना मी न बोलता समजून घेतली- ते त्यालाही ठाऊक होतं.

त्याच्या सहवासातले सगळे क्षण आनंदाचेच होते. आमची शेवटची भेट झाली नाट्यपरिषदेच्या एका कार्यक्रमात. त्याच्या हस्ते मला पुरस्कार मिळाला होता. सहवासातल्या या सगळ्या आठवणी मनात घर करून आहेत - रामदासच्या स्वरांसारख्या स्वाभाविक आणि आनंददायी!

**- जयंत सावरकर**
jayantganna@gmail.com

**शब्दांकन : अस्मिता पांडे**
asmitapande@gmail.com

ग्रंथाली




**कपडे वाळत घालणारी बाई**


**हर्षदा सुंठणकर**

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत १०० रु.**

**सरकते आहे वाळू**

**लखनसिंह कटरे**


**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**





# ‘देव’ नाही देव्हाऱ्यात...

**पुरुषोत्तम बेर्डे**



रमेश देव

**२ फेब्रुवारी** रोजी एका दीर्घ कारकिर्दीचा अंत झाला. मराठी चित्रपटांच्या साठ-सत्तरच्या दशकातले सुपरस्टार रमेश देव अंतिम प्रवासाला निघून गेले. आणि मनाच्या कोपऱ्यात उगाचच एक पोकळी निर्माण झाली. उगाचच एवढ्यासाठी की जितकी पोकळी सीमाताई, अजिंक्य आणि अभिनय यांच्या आयुष्यात निर्माण झाली आहे तितकी कोणाच्याच आयुष्यात होणे शक्य नाही. आपण चित्रकर्मी असलो तरी आधी चित्ररसिक आहोत. आपली पोकळी रुपेरी पडद्यापुरती मर्यादित. बालपणी त्याकाळात गिरगावातल्या मॅजेस्टिक आणि सेंट्रल सिनेमात त्यांचे मराठी चित्रपट आईवडिलांचे बोट धरून पाहिले, तो काळच झर्रकन नजरेसमोरून गेला. घोडागाडीत बसून सहकुटुंब मराठी सिनेमे आणि नाटके बघणे हा एक कौटुंबिक सोहळा होता, आणि त्या सोहळ्यात रमेश देव-सीमा, सुलोचनादीदी, राजा गोसावी-शरद तळवलकर, चंद्रकांत-सूर्यकांत, जयश्री गडकर आणि भालजी व राजा परांजपे यांचे सिनेमे बघणे ही कौटुंबिक आणि सांस्कृतिक घटना असे. त्यात रमेश देव यांचे ते देखणे रूप फक्त सीमाताईंनाच मोहून टाकत नव्हते तर कित्येक तत्कालीन तरुणीही त्यांच्या रूपावर भाळून पागल झाल्या होत्या. त्या काळात ‘बघण्याचा’ कार्यक्रम अगदी सिनेमातल्या-सारखा व्हायचा किंवा सिनेमातला घरच्यासारखा व्हायचा. लग्नाचे मध्यस्त, मुलाबद्दल बोलताना ‘अगदी रमेश देवच जसा’ असे म्हणायचे. लग्न झाले की ‘जोडा अगदी सीमा-रमेश देव यांच्यासारखा शोभतो हो’ म्हणून मल्लिनाथी करायचे... रमेश देव हे रुबाबदार व्यक्तिमत्त्वाचे, कोल्हापुरातून येऊनसुद्धा भाषेच्या बंधनात न अडकलेले असे नायक होते. अगदी पुण्यामुंबईतल्या रसिकांनाही त्यांचे बोलणे आपलेसे वाटले. त्याच रुबाबदार व्यक्तिमत्वाच्या आधारावर अगदी योगायोगाने ते मराठी चित्रपटसृष्टीत आले. नुसते आले नाहीत, तर त्यांच्या शिस्तबद्ध आणि व्यावसायिक कार्यपद्धतीमुळे निर्माता-दिग्दर्शकांमध्ये लोकप्रिय झाले. त्याचा परिणाम त्यांना रसिकांमध्ये अफाट लोकप्रियता मिळण्यामध्ये झाला. अभिनेता नुसता उत्तम अभिनेता असून चालत नाही, त्याच्यात हे गुणही आवश्यक आहेत.

रमेशजींच्या काळात भालजी, राजाभाऊ परांजपे, सुलोचनादीदी यांच्यासारखे ज्येष्ठ कलावंत-दिग्दर्शक नवोदित कलावंतांना मार्गदर्शक म्हणून लाभले. त्यातून त्याकाळातली एक अख्खी पिढी उभी राहिली, ज्यांनी पुढे अनेक वर्षे मराठी चित्रपटसृष्टीवर राज्य केले. याच शिस्तबद्धतेमुळे आणि ज्येष्ठांचा आदर करण्याच्या वृत्तीमुळे पुढे रमेश देव यांनी एकाच वेळी मराठी आणि हिंदी चित्रपटांमध्ये आणि नाटकांमध्ये कामे करण्याची विक्रमी कामगिरीही केली. हे करत असताना त्यांनी वैविध्यपूर्ण भूमिकाही केल्या.

माझ्या दीर्घकाळ स्मरणात राहिलेत त्यांचे ‘मानिनी’, ‘मोलकरीण’, ‘तू सुखी राहा’, ‘पडछाया’, ‘अपराध’ हे चित्रपट आणि त्यातील त्यांच्या भूमिका. हिंदीतील ‘लाखोंमे एक’, ‘तीन बहुरानियाँ’, आणि सर्वात ग्रेट- ‘आनंद’. ‘मोलकरीण’ या चित्रपटातली लग्नानंतर आई-वडील आणि पत्नी यांच्या कचाट्यात सापडलेल्या एका सुसंस्कृत आज्ञाधारक मुलाची कुचंबणा त्यांनी अतिशय समर्थपणे दाखवली. सुरुवातीचा श्रीमंत मुलीच्या प्रेमात पडलेला; आर्थिक न्यूनतेतून उभा राहू पाहणारा; आणि नंतर सुखवस्तू झालेला आणि स्वतःच्या सख्ख्या आईवडिलांपासून दुरावलेला व शेवटी आईच्या प्रेमापुढे निष्प्रभ होऊन विव्हळणारा नायक, कुठेही मेलोड्रामा न करता त्यांनी सदर केला. तीच गोष्ट ‘मानिनी’ चित्रपटातली. माझ्या

दृष्टीने हा चित्रपट मराठी चित्रपटांतील क्लासिक म्हणावा असा आहे. अनेक चमत्कार (पौराणिक चित्रपटात असतात तसे नव्हे) या सिनेमात पाहायला मिळतात. सुपरहिट तमाशापट दिग्दर्शित केलेल्या अनंत माने या दिग्गजाने हा चित्रपट दिग्दर्शित केला. शहरी मराठी, सुसंस्कृत, श्रीमंत उद्योगपतीच्या घरातली मुलगी एका शाळामास्तराच्या घरी लग्न होऊन जाते आणि सामाजिक विषमतेच्या चक्रात दोन्ही कुटुंबे सापडतात. जयश्री गडकर यांनी त्या मुलीची भूमिका 'सांगत्ये ऐका'ची इमेज पुसून टाकत साकारली. हाही चमत्कारच होता. त्यात रमेश देव यांनी खलनायकाच्या जवळपास जाणारी मोठ्या भावाची भूमिका केली, जी अनेक कंगोरे दाखवणारी होती. तर इंदिरा चिटणीस या खाष्ट सासूच्या भूमिकेत मुरलेल्या अभिनेत्रीने चक्क प्रेमळ आईची भूमिका करून आश्चर्यचकित केले. आणखी एक चमत्कार म्हणजे या चित्रपटातली गाणी तत्कालीन ख्यातनाम गीतकारांनी न लिहिता, चक्क बहिणाबाई चौधरी यांच्या कविता घेण्यात आल्या होत्या. वसंत पवार यांनी दिलेल्या चाली आज अनेक वाद्यवृंदांत ऐकायला मिळतात. 'अरे खोप्यामध्ये खोपा.. जसा पिलासाठी तिने झोका झाडाले टांगला...' अशी गाणी त्या चित्रपटात होती. तमाशा समर्थपणे मराठी चित्रपटात उभा करणारे अनंत माने या सिनेमात काळजाला हात घालणारी दृश्ये उभी करतात, हाही चमत्कारच होता.

तमाशापटांच्या लाटेच्या काळात रमेश देव, सीमा, सुलोचनादीदी, राजा परांजपे, श्रीकांत मोघे, अरुण सरनाईक यांनी शहरी आणि कौटुंबिक मराठी चित्रपटांची एक बाजू समृद्ध करून ठेवली आहे. पुढे राजदत्त यांचा काळ सुरू झाला. 'अपराध' हा चित्रपट त्यांनी रमेश देव, सीमा आणि इंद्राणी मुखर्जी यांच्या समर्थ अभिनयाने अजरामर केला. विवाहबाह्य संबंधांची मराठी मालिकांमध्ये पुढे लाट आली, पण 'अपराध' या चित्रपटात नायकाची झालेली दोन बायकांना सांभाळायची घालमेल पुढे इतक्या गांभीर्याने क्वचितच पाहायला मिळाली. हा एक प्रकारचा थ्रिलरच होता, त्यात विवाहबाह्य संबंधांचा थिल्लरपणा नव्हता. रमेश देव तोपर्यंत अनेक हिंदी सिनेमांची मुशाफिरी करून आले होते, त्यामुळे त्यांच्या रुबाबदार व्यक्तिमत्त्वात एक स्टायलिश अभिनेता मिसळलेला होता. तो या भूमिकेसाठी अगदी चपखल बसला होता. यात दत्ता डावजेकर यांच्या अप्रतिम संगीतावर प्रत्यक्ष नृत्य नसूनसुद्धा मोहून टाकणाऱ्या हालचाली रमेश देव आणि सीमा यांच्या आविष्कारातून दिसल्या. पुढे हृषीदांच्या 'आनंद' चित्रपटात या मराठी जोडप्याची निवड होणे हा आपल्या सर्वांचा भाग्योदय आहे. सुपरस्टार राजेश खन्ना आणि तत्कालीन स्ट्रगलर अभिनेता अमिताभ बच्चन यांच्या तोडीस तोड अभिनय सीमा आणि रमेश देव यांनी केला. तो काळ निगेटिव्हवर सिनेमा शूट करण्याचा होता.. निगेटिव्हचा एकेक डबा अत्यंत महागडा असे. रिटेक म्हणजे चैन होती. कमीत कमी रिटेकमध्ये मोठे मोठे शॉट देणे हा रमेशजींचा हातखंडा होता. त्याच बळावर नट किंवा नटी निर्मात्यांमध्ये लोकप्रिय होत. अशा पट्टीच्या कलावंतांमध्ये रमेशजींची गणना होत होती, त्यामुळे त्यांना हिंदीत खूप मागणी होती. प्राण, प्रेम चोप्रा, प्रेमनाथ यांच्यासारखे प्रचंड हिट खलनायक हिंदीत असूनसुद्धा रमेश देव यांनी खलनायक म्हणून अनेक मोठे चित्रपट केले आणि गाजवले.

अजिंक्य या आपल्या सुपुत्राला लॉन्च करण्यासाठी निर्मितीक्षेत्रात उतरले. राजदत्त यांच्या दिग्दर्शनात अजिंक्य देव हा देखणा नायक त्यांनी 'सर्जा'द्वारे दिला. अजिंक्य थिएटर्स ही स्वतःची नाट्यसंस्था काढून त्यामार्फत अनेक नाटके सादर केली. रमेश देव प्रोडक्शन ही माहितीपट आणि जाहिरात संस्था सुरू केली. त्याद्वारे दुसरा सुपुत्र अभिनय हा जाहिरातक्षेत्रात नावाजला जाऊ लागला.

ज्या रमेश देव सीमा यांना लहानपणापासून पाहिले, सिनेमांत अनुभवले त्यांच्याशी पुढे प्रत्यक्ष संबंध आला तो वेगळ्याच स्वरूपात.. अजिंक्य थिएटर्सची बस होती, ती आम्ही 'टूरटूर' नाटकासाठी मुंबई-पुणे-नाशिक दौऱ्यासाठी वापरत असू. अगदी मराठवाडा-विदर्भ दौराही केला त्या बसने. सीमाताई त्या बसचे व्यवहार पाहत. त्यानिमित्ताने सीमाताईंशी बोलणे व्हायचे. त्यांच्याशी बोलताना 'आनंद'मधल्या सुमनशीच बोलतोय असे वाटायचे.

रमेशजींनी वयाची नव्वदी पार केली तरी ते स्वावलंबी होते. दोन वर्षांपूर्वी आमदार आशिष शेलार यांच्या एका कार्यक्रमात आम्ही दोघेही पाहुणे होतो. त्यांना रिसिव्ह करायला मी स्टेजवरून खाली गेलो, वर चढण्यासाठी त्यांचा हात पकडला तर त्यांनी तो धरू दिला नाही. नंतर भाषणासाठी उभे राहत होते तेव्हा मी पुढे झालो तर म्हणाले.. पुरुषोत्तम.. मला हे असलं आवडत नाही... तिथेच थांब...

मी २००८ साली 'निशाणी डावा अंगठा' हा सिनेमा करत होतो. त्यात एक छोटी भूमिका होती, एका वृद्ध कीर्तनकाराची. ती त्यांनी करावी अशी इच्छा होती, पण ते करतील का याचे टेन्शन होते. तरीही धीर करून मी फोन केला, तो मेसेजवर गेला. मी रेकॉर्डेड निरोप ठेवला, पण त्यांनी तो ऐकला नसावा. चार दिवस वाट बघून आम्ही दुसऱ्याची निवड केली आणि साताऱ्याला निघालो.. वाटेत त्यांचा फोन... 'अरे, मी आज मेसेज ऐकला... मित्रा, मला काम करायचंय.. केव्हा कुठे यायचं सांगा...' माझी पंचाईत झाली. मी क्षमा मागून माझा झालेला नाइलाज सांगितला. त्यावर त्यांनी चक्क हळहळ व्यक्त केली आणि पुढच्या वेळी मी अशी चूक करणार नाही असे म्हणून स्वतःवरच सगळा दोष घेतला. त्यादिवशी स्टेजवरसुद्धा माझ्या कानात म्हणाले.. 'नवीन काही करणार असशील तर मला सांग हां...'

रमेश देव आणि निवृत्ती या दोन गोष्टी ३६ च्या आकड्यासारख्या एकमेकांच्या विरोधात शेवटपर्यंत उभ्या राहिल्या. ते त्यांचे वय सांगताना म्हणायचे, 'अरे, मी देव आनंदपेक्षा एक वर्षाने मोठा आणि दिलीपकुमारपेक्षा तीन वर्षांनी लहान...'

चिरतरुण रमेश देव यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी 'आनंद' चित्रपटामधले ते डॉक्टर भास्करच्या तोंडचेच वाक्य शेवटी वापरावेसे वाटते..

'आनंद मरा नहीं... आनंद मरते नहीं...'

**– पुरुषोत्तम बेर्डे**
puruberde@yahoo.com



# नेहरूनगर कुटुंबाच्या वहिनी

**अनुराधा गांगल**

**आमची** कुर्ला येथील नेहरूनगर वसाहत साधारणपणे १९६६ ते ६७ साली तयार झाली. त्या वेळेस छोटी-छोटी कुटुंबे तेथे राहण्यासाठी येऊ लागली. छानसे, टुमदार, मस्त रचनाबद्ध होते आमचे नेहरूनगर. प्रत्येकाच्या या नेहरूनगरच्या आठवणी खूप वेगवेगळ्या असतील. आमचेही एक पंधरा-वीस जणांचे वारंवार एकत्रित येऊन, सणवार, उपास-तापास एकत्रित करून करून, एकोपा तयार होऊन एक मोठे कुटुंबच तयार झाले होते. कोण नव्हते त्यात! सोपारकर, नांदगावकर, मोकाशी, कोल्हटकर, घाटे, साधू, गांगल, जैन, फडणीस, माळवदे, पारगावकर, गुप्ते, हिंगलासपूरकर, डॉ. तामणे... केवढा तरी मोठा ग्रूप तयार झाला होता. आम्हा सगळ्यांचा एक स्वतंत्र 'नातलग' मंडळींचा ग्रूप, एक स्वतंत्र मित्र-परिवार ग्रूप अन् मग हा नेहरूनगरचा स्पेशल ग्रूप. असे वेगवेगळे ग्रूप होते. आम्ही त्यावेळची सर्व तरुण मंडळी गुण्यागोविंदाने तेथे राहत होतो. एक मोठे कुटुंबच तयार झाले होते. त्या कुटुंबातील आम्ही सर्व जणी साधारणपणे सारख्याच वयाच्या होतो. आमच्या मालिनी हिंगलासपूरकरवहिनी मात्र मोठ्या होत्या. पूर्वी जशी घरात एक कर्ती-सवरती बाई असे तशाच या आमच्या वहिनी होत्या. वहिनी वयाने मोठ्या होत्या म्हणून त्यांना आम्ही केवळ वहिनी म्हणत होतो. तरी वहिनींनी शांत, सोज्वळ, प्रेमळपणा आपल्या पदराला बांधलेलाच असल्याने त्यांच्याजवळ लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांचा 'वावर' असे. मोठ्या माणसांचा नेहमी धाक, दरारा, भीती वाटून तसे त्यांच्याबरोबर वागणे-बोलणे होत असे, परंतु वहिनींना हे शब्द लागूच पडणार नाहीत असा त्यांचा स्वभाव आणि वागणे होते. त्यांचा बांधा, चेहरा, हास्य, बोलणे... त्यांची एकंदरीत सगळीच वृत्ती महान, कर्तृत्ववान आणि शांत, संयमी, सोज्वळ होती. लहान मुली म्हणत, वहिनी, तुम्ही अमुकतमुक गोष्ट केलीत की मला द्या हं. मला तुमची ती गोष्ट फारच आवडते. आम्ही मोठ्या त्यांना वहिनी, चला आता नवरात्र येणार आहे ना, मग एकत्रित 'भोंडला' करू या ना, असे विचारत असू. वहिनी सगळ्याला तयार असत. त्यांना कधीच दुर्मुखलेले, कंटाळलेले पाहिलेच नाही. सतत हसतमुख, सतत सगळ्यात भाग, सतत एकत्रित सर्व गोष्टी करायला, फिरायला, देवाला जायला तयार. कोणालाही स्वत:ची लाज वाटेल त्यांच्या उत्साहाला आलेले उधाण पाहून. आम्ही तरुण मुली एकमेकींच्या चेष्टा, मस्करी, टिंगल-टवाळ्या करत असू. वहिनी त्यांतही सामील होत असत. कधीही त्या 'एकट्याच' पडल्यात असे स्वप्नातही जाणवणार नाही असा त्यांचा स्वभाव, त्यांची वृत्ती. त्यांचे व्यक्तिमत्त्वच तसे वेगळे होते. प्रत्येक व्यक्ती जन्माला येताना कोणत्यातरी वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी घेऊनच जन्माला येत असते. वहिनी भरपूर एनर्जी, खूप धैर्य, खूप टॉनिक, खूप प्रतिकारशक्ती, निरागसपणे; ताकदीने; हसतमुखाने करण्याचे कष्टकरी जीवन, अशा गोष्टी घेऊनच जन्माला आल्या असाव्यात.



**अरुणा साधू, अनुराधा गांगल आणि मालिनी हिंगलासपूरकर**

वहिनी सकाळी साडेपाचला दूधकेंद्रावर जात असत. दुपारी दोन वाजताही जात. साडीला फॉल/बिडिंग करत, शिवणकाम करत. याबरोबरच त्यांच्या चारही मुलांचे आणि आम्हा सर्वांचेही अगदी मनापासून, प्रेमाने सर्व काही करत असत. श्रावणात तर दर

सोमवारी सर्वांना बरोबर घेऊन शंकराच्या वेगवेगळ्या देवळात जायला तयार! कुठून आणला होता त्यांनी हा उत्साह, आनंद, कष्टासाठी लागणारी ताकद असा प्रश्न पडावा, इतक्या त्या साध्या, प्रेमळ, शांत चेहऱ्याच्या, वृत्तीच्या होत्या. नवऱ्याचे त्याच्या मर्जीनुसार सर्व करणे, मुलांचे प्रेमळपणाने करणे, कष्ट आनंदाने करत संसाराचा हा रथ चालवणे काही सोपे काम नाही. संसाररथ चालवताना होणारी दगदग, धावपळ कधीही त्यांच्या चेहऱ्यावर दिसली नाही. त्यांच्या कपाळावर कधी आठी पडलेली कोणीही कधीच पाहिली नाही. कुठची ताकद, कुठचा अंतरंगीचा ठेवा त्यांना लाभला असावा, की त्या नेहमीच हसतमुख असत! त्यांचे ताकदीचे हे जीन्सच त्यांच्या चारही मुलांत उतरले असावेत. दीपक, सुदेश, मिनू आणि ज्योती ही त्यांची चारही मुले प्रेमळ, कष्टाळू, खूप मित्रपरिवार जोडत आईच्या पावलांवर पाऊल टाकत होती.

'ग्रंथाली'चा जन्म आमच्याच घरात झाला. पहिली ग्रंथयात्रा काढून, जिल्ह्याजिल्ह्यातून पुस्तके न्यायचे ठरले. आमच्या नेहरूनगरच्या कुटुंबात आणखी सदस्यांची भर पडली. कुमार केतकर, शेखर साठे, श्रीकांत लागू, सुजाता-संजू खांडेकर, रामचंद्र वझे, अशोक दातार अशी ही हुशार विद्वान मंडळी आमच्याच कुटुंबाची एक झाली. यात्रेसाठी काम करण्यासाठी एक रूम मिळाली होती. ही सर्व मंडळी आपापल्या कामावरून येऊन सहाला रूमवर जमत आणि रात्री बारा वाजेपर्यंत कामे करत. त्यांना वारंवार चहा अन् खायला पाठवावे लागे. हे काम वहिनींनी पाहिले मात्र, मला म्हणाल्या, अग अनुराधा, मी त्यांना एक वेळ चहा अन् खायला पाठवत जाईन. असे म्हणून त्या थांबल्या नाहीत, त्याही चहा, खाणे पाठवू लागल्या. अशा या आमच्या वहिनी.

संसारात मुले वाढत असताना त्या वेळेच्या पगारात कितीतरी लहानमोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागे. वहिनींच्या घरातही कितीदा असे प्रसंग येत असणारच, पण त्यांच्या चेहऱ्यावर, त्यांच्या वागण्यावर, त्यांच्या करण्यात कधी तसे जाणवले नाही. त्यामुळेच त्यांची ओढाताण आम्हा कोणाच्याही नजरेत आली नाही. कुठल्याही गोष्टीचा, कधीच ताकास तूर लागला नाही. याचे कारण फक्त वहिनी. माणसे नेहमी काय करतात? माणूस गेल्यावर त्याचे गुण गातात. वहिनी याला अपवाद होत्या. त्या जिवंत असताना त्यांचे लोकांशी वागणे त्यांनी नेहमीच उच्च दर्जाचे ठेवले. हसतमुखाने सर्वांचे करणे ठेवले. त्यांच्या अशा गुणांची दखल आपणही जिवंत असतानाच घ्यायला हवी. अशी ही करारी, निश्चयी, हसरी, मेहनती बाई. आपल्या संसाराला हातभार लावता लावता समोरच्याला खुशी देणारी अशी बाई शोधूनही सापडणार नाही. कुठच्याही व्यक्तीने त्यांच्याकडे पाहिले तरी त्याला फक्त जवळीक, माया, प्रेमच ओतप्रोत भरलेले दिसे.

आमच्या कमलच्या ऋचाने सांगितले, ''मी सुदेशच्या वडिलांना आजोबा म्हणत असे आणि वहिनींना 'ए, मावशी' असे म्हणे. एकदा मला दीपकदादा म्हणाला, 'तू असे कसे करतेस? ह्यांना आजोबा म्हणतेस अन् आईला ए, मावशी म्हणतेस?' अग, मी त्यावेळेस लहान होते. मला दीपकदादाला उत्तर देता आले नाही, पण आता कळते आहे, की त्या 'ए, मावशीत' त्यांचा दिसण्यातला, करण्यातला, वावरण्यातला, बोलण्यातला, सर्वकाही गोडवा, प्रेमळपणा, चांगुलपणा, मायाळूपणा, लाघवीपणा दडलेला होता.'' तरुणपणी वहिनींनी खूप कष्ट केले. कष्टांचाच त्यांचा देह होता, पण त्या कष्टांत त्यांचा आपोआप 'विसावा' भरलेला होता. आता तर त्यांचे वय झाले होते, पण आयुष्यभर कामे करत असलेला त्यांचा देह त्यांना म्हातारपणीसुद्धा निवांत बसू देत नव्हता. म्हणजे त्यांच्या तो रक्तातच नव्हता. त्या आता या वयातसुद्धा साधी भाजणी, उपवासाची भाजणी, चकली भाजणी, सर्व प्रकारचे अळीव, डिंक, मूग, मेथी यांचे लाडू करत असत. लोणच्यांची व इतर कामे सुलू (त्यांची सून) घेई, पण कैऱ्या आणा, धुवा, पुसा, चिरून द्या असे सर्व काम त्याच करत असत. वर मला म्हणत, 'अग, नुसते बसून बसून करायचे काय! तेवढीच तिला मदत होते.' माझे शेजारी-पाजारीही त्यांना भाजणी, लाडूची ऑर्डर देत. ते पदार्थ आणायला गेले, की एका पिशवीत माझ्यासाठी भाजणी अन् लाडवांचा नमुना नक्की असे. त्यांना म्हणत, ही पिशवी आमच्या अनुराधाला द्या हं. वहिनींच्या हातची भाजणीची थालिपीठे इतकी सुंदर होत की प्रत्येक घासाघासाला वहिनींचे नाव तोंडातून निघेच!

संक्रांत आली की वहिनी दोन मोठे, मऊसूत, तिळाचे लाडू 'ह्यांना' देण्यासाठी येत असत. तिळात तेल असते. त्याच्यासारखे मऊ अन् गुळासारखे सतत वर्षभर 'गोड' वागत राहा असे जणू हा सण सांगत असतो. वहिनी स्वतः तशाच मऊ अन् गोड होत्या. आम्हालाही तिळगूळ देऊन त्या हेच म्हणत असाव्यात. अत्यंत साधेपणा, दुसऱ्यांबद्दल सहानुभूती, कार्यमग्न जीवन, कष्टाळूपणा, उमदेपणाची जगन्मित्रता, आनंदी जीवन हे सर्व काही गुण परमेश्वराने बहाल करूनच त्यांना जन्माला घातले होते जणू. त्यांचे लहानांशी, मोठ्यांशी वागणे खेळकर वृत्तीचे असे. दीपक, सुदेशचे मित्र येवोत; शोभा, सुलूच्या मैत्रिणी येवोत, सईचा मित्रपरिवार येवो, त्या त्यांच्या आगत-स्वागताची तयारी करून त्यांच्याबरोबर हसत-खेळत गप्पा मारायला तयार असत. त्या सर्वांबरोबर मुक्तपणे सामील होत असत. प्रत्येकांचा वेगवेगळा ग्रूप, पण प्रत्येकाच्या मित्रपरिवाराला वहिनींचा हा हसरा खेळकर स्वभाव आदर्श वाटत असे. सुदेशचे वडील गेल्यानंतर त्या मनातून खचल्या असतीलच, पण कधी त्या 'एकट्या' पडल्या नाहीत. आम्हा सर्वांच्या कुटुंबांचे आईपण त्यांनी आनंदाने स्वीकारले.

अशी ही गुणग्राहक बाई यमराजा भावाकडे जाताना स्वतः जिना उतरून, रिक्षात बसून, 'मला काहीही झाले नाही आहे, घाबरू नका हं' असे म्हणत भावाकडे पोचलीसुद्धा. यमराजाही म्हणाला असेल, बघू बरे, तुझी पोतडी सोड बरे! काय काय आणले आहेस? लाडू, भाजणी अन् तुझी खमंग खुसखुशीत 'करंजी' आणली आहेस ना!'

**– अनुराधा गांगल**

भ्रमणध्वनी : ७७३८२९८५१७



# नामदेव व्हटकरांचे समाजप्रबोधनातील योगदान

**भगवान इंगळे**

**ते** वर्ष १९८०चे असावे. मी मुंबईतील धारावीच्या अबुबकर चाळीत भाड्यानं राहत होतो. एके दिवशी माझ्या चार भाच्यांबरोबर धारावीतील नव्या चाळीतल्या आमच्या समाजाच्या श्री गणेश विद्यामंदिर हायस्कूलमध्ये कार्यक्रमाला गेलो होतो. हॉल प्रेक्षकांनी तुडुंब भरला होता. व्यासपीठावर मंत्रिमहोदय ना. सुशीलकुमार शिंदे, साहित्यिक गो.नी. दांडेकर आणि प्रख्यात लेखक, कलावंत नामदेवराव व्हटकर विराजमान होते. त्या जाहीर कार्यक्रमात नामदेवराव व्हटकर उद्विग्न होऊन म्हणाले, ''मी तीन तपे कादंबरी, कथा, नाटक, कला आणि साहित्याची समीक्षा या साऱ्या वाङ्मयप्रकारावर सुमारे पंचवीस पुस्तके लिहिली. त्यातली काही बी.ए., एम.ए.च्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याच्या दर्जाची आहेत. मात्र महाराष्ट्रातील मराठी साहित्य संघ, साहित्य संस्कृती मंडळ आणि समीक्षक यापैकी कोणीच कधी त्याची दखल घेतली नाही. माझ्या कार्याकडे समाजाने दुर्लक्ष केले आहे.''

त्यांच्या बोलण्याचा मथितार्थ असा होता, की एकूण समाजाने त्यांच्या कार्याची उपेक्षा केली आहे. त्यांनी आपल्या मनातली खंत का बरे अशी जाहीर सभेत व्यक्त केली असेल?

नामदेवराव व्हटकरांच्या विविधांगी कार्याचा, त्यांच्या साहित्याचा बारकाईने अभ्यास केल्यास असे जाणवते, की त्यांचे सबंध जीवन खडतर आणि धगधगते आहे. ते काट्याकुट्यांनी, खाचखळग्यांनी ओतप्रोत भरलेले आहे. त्यांनी आयुष्यभर प्रतिकूल परिस्थितीशी निकराने झुंज देऊन समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे.

कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांनी समाजोन्नतीसाठी क्रांतिकारक, सुधारणावादी, दमदार पावले उचलली होती. कोल्हापूर-सातारा या भागातील संस्थानिक ब्रिटिशांचे मांडलिक म्हणून कारभार चालवत असले तरी त्यांच्यापुढे व्यापक समाजहित होते. जगाच्या पाठीवर हिंदुस्थान हा असा एक वैशिष्ट्यपूर्ण भूभाग होता, जेथे माणसाचे अंगभूत गुण आणि कर्तृत्वापेक्षा त्याच्या जातीला अवास्तव महत्त्व दिले जात होते. कोणत्या जातीत जन्म घ्यावा हे



**नामदेवराव व्हटकर**

कुणाच्याही हाती नसते, पण येथे जातीवरून त्याचा दर्जा सामाजिक प्रतिष्ठा ठरवली जाते. ढोर, चांभार, महार, मांग, भंगी, आदिवासी या शूद्राति शूद्रांची अवस्था भयानक होती. त्यांचा स्पर्श निषिद्ध मानला जात होता. कुत्र्या-मांजरांचा, जनावरांचा स्पर्श चालायचा; परंतु जित्याजागत्या माणसासारख्या माणसांना अस्पृश्य ठरवून त्यांचा बाट धरला जायचा. गुराढोरापेक्षाही हीनतेची वागणूक अस्पृश्यांच्या, हरिजनांच्या वाट्याला आली होती.

ढोर (कक्कया) या अस्पृश्य जातीला आपला पारंपरिक धंदा करताना जनावरांचे चामडे कमावण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवश्यकता असल्यामुळे तो समाज नदीच्या डोहाजवळ वस्ती करून राहतो. दुर्गंधीयुक्त नांदीकुंडात राबून शेतीला उपयुक्त मोटा-सोंडा, आसूड, चाबूक, बैलांच्या गळ्यातील घुंगुरमाळा,

लोकांच्या पायातील बूट-चपला यासाठी लागणारे चामडे कमावतो. तो बारा बलुतेदारांपैकी एक कलावंत म्हणून जीवन जगत समाजाच्या गरजा भागवतो.

या आमच्या पिढीजात व्यवसायात मरणप्राय कष्ट, अपघात, सतत नुकसानीचा बाजार असतो. हा व्यवसाय मनाचा आणि शरीराचा कस काढणारा आहे. कोल्हापूर-सातारा संस्थानिकातील माले-मसूद गावातील अशाच अस्पृश्य जातीत शंभर वर्षांपूर्वी श्री. लक्ष्मण आणि सौ. पारू यांच्या पोटी नामदेव व्हटकरांनी जन्म घेतला. त्यांचे आजोबा भिकूजी हे कष्टाळू, हुशार, मोडी जाणणारे, कर्तबगार, बोलके, सद्गृहस्थ होते. त्यांचे चिरंजीव लक्ष्मण यांचे सुपुत्र नामदेव. लहानपणी ते गोरेपान बाळसेदार असल्याने त्यांना आई लाल्या म्हणायची. त्यांचे आजोबा आणि वडील दोघांचेही व्यक्तिमत्त्व लोभस असल्यामुळे वरच्या जातीतले गावचे पाटील, कुलकर्णी अशी प्रतिष्ठित मंडळी त्यांच्या घरी ओसरीवर उठतबसत. चर्चा, सल्लामसलत करत. त्यांच्या घराचे अंगण जणू गावची चावडी होती.

नामदेव अस्पृश्यांचा असल्याने शाळेत त्याला इतर मुलांपासून वेगळे, लांब बसवत. शिक्षक कठोर शिक्षा देत. रुळ फेकून मारत. मास्तरांनी दातओठ खात जोरात फेकून मारलेल्या लाकडी रुळाचा तडाखा कोवळ्या मुलाला कुठे लागेल, कसा लागेल त्याची पर्वा नसायची. मुलगा वेदनेने पापळायचा. मास्तरांना बाट होऊ नये म्हणून तो रुळ त्यांच्या हातावर वरून सोडावा लागायचा.

शाळेत पाढ्यांची झडती असायची. मास्तर वर्गातील सारी पोरे एका ओळीने उभी करून विचारायचे, सांगा सतरा सत्ते किती?.. बारा नवे? जो बरोबर सांगेल त्याने वरच्या सर्वांच्या थोबाडीत मारून पहिल्या नंबरवर जाऊन उभे राहायचे. परंतु हलक्या जातीच्या पोराने वरच्या जातीच्या पोरांच्या थोबाडीत न मारता नुसता गालाला हात लावल्यागत करावे लागे. प्रत्यक्ष थप्पड मारायची नाही. मात्र अस्पृश्यांचा मुलगा चुकल्यास वरच्या जातीचा मुलगा असा जोरात थोबाडीत लगावायचा की त्याच्या कानाला झिणझिण्या यायच्या.

नामदेव मुळात हुशार, डोकेबाज होता. त्याला आजोबा भिकू आणि वडील लक्ष्मण हे थोर गुरू लाभले होते. नामदेवचा दरवर्षी शाळेत पहिला नंबर यायचा. त्यांच्या घरी ओसरीवर बैठकीला येणाऱ्या गावातल्या प्रतिष्ठित पाटील-कुलकर्णींना ते खपत नसे. त्यांनी लक्ष्मणवर दबाव आणला. आमच्या वरच्या जातीतल्या पोरांचा पहिला नंबर न येता, तुझ्या हरिजन ढोराच्या पोराचा कसा येतो? आम्हाला ते कमीपणाचे आहे. तुझ्या पोराला गाव सोडून दुसरीकडे शिकायला पाठव.

नामदेवला दुखी अंतःकरणाने बहिणीच्या गावी इस्लामपूरला शिकायला जावे लागले. हलक्या जातीत जन्मल्यामुळे माणसाच्या वाट्याला कोणते भोग येतात त्याचे हे विदारक उदाहरण असावे.

मुळात चकाकणारा हिरा. तो उकिरड्यावर पडला म्हणून प्रकाशमान व्हायचा राहणार आहे थोडाच? छत्रपती राजाराम-महाराजांची भेट त्यांच्या इंदुमती बोर्डिंगला ठरली होती. त्या कार्यक्रमात शाळेतील सगळ्या मुलांच्या वतीने नामदेवने भाषण केले. ऐकून महाराज प्रभावित झाले. त्यांनी आस्थेने त्याची चौकशी करून पाठीवर शाबासकीची थाप मारली होती.

नामदेवच्या वडिलांनी सावकाराचे कर्ज काढून कच्च्या कातड्याचा खंडीकसा माल आणला. चुना लावून कुंडात ठेवला. दोनेक दिवसांनी हलवणी करताना सगळे नग नासून गेले. नासक्या खोबऱ्यागत त्याचे तुकडे झाले. बापाचे हातपाय गळाले. कर्ज बोकांडी बसले. त्यात थोरली मुलगी तारा हिचा नवरा व्यसनी, दारुडा निघाला. तिचा संसार उद्ध्वस्त झाला. या सगळ्या व्यापामुळे लक्ष्मणरावांना टी.बी.चा आजार जडला.

नामदेवचे शिक्षण, मुलींची लग्ने, सावकाराचा तगादा यामुळे आजार बळावला. त्यांनी जातीतल्या श्रीमंत घराण्यातील मानलेल्या बहिणीच्या मुलीशी लग्न करण्याचे वचन नामदेवकडून घेऊन प्राण सोडला. अत्यंत हलाखीचे दुःखभरे जगणे नामदेवच्या वाट्याला आले. वडील गेल्यावर शाळेची फी भरता न आल्याने बोर्डिंगचे जेवण बंद झाले. वर्गात पाठीमागे बसणाऱ्या व्ही.एल. पाटील या खेळाडू वर्गमित्राने फी भरली.

एकदा मराठ्याच्या मुलाने कोल्हापूरपासून सहा-सात मैलांवर असलेल्या खेडेगावात चिरेबंदी वाड्यावर जेवायला नेले होते. नामदेव आठवण सांगतो,

''आम्ही आठ-दहा मुलं घोंगडीच्या घडीवर ओळीनं जेवायला बसलो. पितळी ताटं समोर आली. एकानं माझ्याकडे रोखून कुजबूज केली. 'आरं ते प्वार माल्याच्या ढोराचं नव्हं का...'

एक जण मला म्हणाला, 'आरं ए बाळ, जरा पोरा तू इकडं ये.'

मी उठलो त्यांच्या पाठोपाठ गेलो.

'ये आना ती पत्रावळ' माझ्याकडे पाहात एका म्हशीकडे बोट दाखवत ते म्हणाले, 'इथं, इथं बसून जेव बाबा तू.'

भरपंक्तीतून मला उठवलं. जनावरांच्या गोठ्यात बसायला सांगितलं. माझं डोकं चक्रावलं. 'नाही, नाही मला भूक नाही.' मी वाड्याच्या बाहेर पडलो. अंधारात चालू लागलो. मागून माझा जिवलग मित्र कानड्याचा व्ही.एल. पाटील सायकलवरून आला. म्हणाला, 'नामदेव, चल आपण डबलशिट जाऊन आपल्या खोलीवर जेवू. जिथं तुला पंक्तीतून उठवलं तिथं मीही जेवलो नाही. चल बस.'

त्याचे वडील अनेकदा कोल्हापूरला जेवणाचा डबा आणायचे. आपल्या ताटातल्या पुलावातून मटणाच्या गोळ्या वेचून माझ्या ताटात टाकायचे.''

नामदेव म्हणतात, ''हलक्या जातीचा म्हणून सगळ्यांनीच माझा तिरस्कार केला नाही. विस्तीर्ण वाळवंटात गर्द सावलीचे एखादे झाड असावे तशी मजवर अकारण माया करणारी माणसे आयुष्यात भेटली. हिंदू धर्मातल्या अस्पृश्यतेचा, जातीभेदाचा कितीही राग आला तरी तो कोणा एखाद-दुसऱ्यावर काढावा असे मला कधी वाटले नाही. मात्र ही माणसे ज्या गलिच्छ रूढीपरंपरेचे गुलाम झाली, ती रूढीपरंपरा तुडवून तुडवून तिचा चुराडा करावा असे चळफळून वाटायचे.''

नामदेवराव एका प्रसंगात सांगतात, ''जाऊ की नको दुकानात,

करू की नको दाढी, अशा विचारात रस्त्याकडेच्या न्हाव्याच्या दुकानात शिरलो. उंच खुर्चीवर बसलो. न्हावी माझ्या दाढीला साबण लावून ब्रशने फेस फुलवू लागला. माझ्या डाव्या कानाजवळ त्याचा धारदार वस्तरा खाली आला. तेवढ्यात माझ्या गावच्या, माल्याच्या सोळसे नावाच्या गाडीवानाची गाडी दुकानाच्या दाराशेजारी अकस्मात येऊन थांबली होती. ती मला समोरच्या आरशात दिसली. तो आत येऊन माझी ढोर जात सांगेल. हॉटेलात भजे खाल्ल्यामुळे बाट झाल्याने मालकाकडून लाकडी खुर्चीच्या मोडक्या दांड्याचा बेदम मार खाऊन, बोर्डिंग सोडून गेलेला अथनी नांदनीकडचा चांभाराचा जाधव आठवला. त्याची काळीनिळी पाठ आठवल्याने मी भीतीने चक्कन हललो तसे वस्तऱ्याचे टोक गालावर घुसले. पांढऱ्या फेसातून रक्ताचा ओघळ सरकत निघाला. केस कापणारा म्हणाला, 'अर्रर.. असं रं का पोरा...' आणि थांबला.

मला देशातल्या अस्पृश्यतेची, उच्चनीच परंपरेची, आम्हाला मिळणाऱ्या हिणकस वागणुकीची इतकी इतकी चीड आली, की मी दम भरल्यासारखे उसासे टाकत रक्ताच्या ओघळाकडे पाहात मनात म्हणालो, 'हे रक्त जोपर्यंत या शरीरात आहे तोपर्यंत देशातील ही भयानक अस्पृश्यतेची रूढी नष्ट करण्याचा, जाळण्याचा मी प्रयत्न करीत राहीन'.''

त्यानंतर नामदेवरावांनी आयुष्यभर अस्पृश्यतानिर्मूलनासाठी आपला देह झिजवला. स्वातंत्र्याच्या चळवळीत लढाऊ भाषणे देण्यात शिगावचे रंगराव पाटील, पोवाडे गाण्यात कुंडलचे शाहीर शंकरराव निकम आणि नामदेवराव व्हटकर आघाडीवर होते. नामदेवरावांच्या भाषणाचा स्वातंत्र्य मिळवण्याबरोबर राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक समता, अस्पृश्यतानिवारण या गोष्टींवर अधिक भर असायचा. सानेगुरुजींनी पंढरपूरच्या विठ्ठलमंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह सुरू केला होता. त्याला पाठिंबा देण्यासाठी इस्लाम पूर भागात मोठी सभा झाली. त्या सभेत नामदेवरावांचे ते आवेशपूर्ण कडाडून चाललेले भाषण ऐकून सांगलीचे स्वातंत्र्यसैनिक वसंतदादा पाटील यांनी नामदेवांना कडाडून मिठी मारली आणि कायमचेच आपले धाकटे भाऊ मानले. त्यावेळी लहान वयात गेलेल्या शामू या भावाची नामदेवांना प्रकर्षाने आठवण झाली.

'अस्पृश्यता गेली पाहिजे' हा अत्यंत कष्टपूर्वक लिहिलेला लेख वर्तमानपत्रात छापून यावा म्हणून पुण्यातील मान्यवर दैनिकाच्या कचेरीत गेले. 'नामदेव व्हटकर? नाव ग्यानबा-तुकारामसारखे वाटते,' म्हणत त्या संपादकाने हेटाळणी करून लेखाला केराची टोपली दाखवली.

वडील वारल्यावर चार बहिणी, आई आणि स्वतः असे सहा जणांचे कुटुंब सांभाळत, डोक्यावरील कर्जाचा भार वाहत ते शिक्षण घेत होते. त्यासाठी मुंबईला आले. सकाळी गिरगावातील खेतवाडीच्या सह्याद्री हायस्कूलमध्ये शिक्षक, दुपारी नाटक कंपनीत नट आणि सायंकाळी आकाशवाणीत लेखक-कलाकार अशी कामे करत. त्यातून वेळ काढून बी.ए.चा अभ्यास करत होते. अशा जिद्दीने सन १९४८ मध्ये सांगलीच्या वेलिंग्डन कॉलेजमधून मराठी विषयात बी.ए. ऑनर्स झाले.

पदवीधर असल्याने त्यांची नागपूरच्या नभोवाणी केंद्रावर साहाय्यक कार्यक्रम अधिकारी या पदावर नेमणूक झाली. त्यांच्याकडे ग्रामीण कार्यक्रमाचे खाते देण्यात आले. त्यांनी ते आमूलाग्र बदलले. त्या विभागाला न्याय देताना तळागाळातल्या उपेक्षित कलावंतांना शोधून काढून त्यांच्या उपजत कलागुणांना वाव देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. राधाबाई माहुरे या गोड गळ्याने तालासुरात गाणी गात रस्त्यावर भिक्षा मागणाऱ्या अंध महिलेचा कार्यक्रम आकाशवाणीवर ठेवला. तिला मिळालेल्या बिदागीतून चांगली साडीचोळी घ्यायला लावली. गोंड लोकांच्या गीतांचे कष्टपूर्वक रेकॉर्डिंग केले.

सदैव नवे शिकावे, ते स्वतःमध्ये मुरवत न्यावे, अशी सतत स्वतःला अद्ययावत ठेवण्याची सवय असलेल्या या अधिकाऱ्याने नागपूरला हिंदी भाषेचा, संगीताचा सखोल अभ्यास केला. आकाशवाणी केंद्र संचालक डॉक्टर वीरभद्र रावांनी नभोवाणीचा नाट्यविभाग त्यांच्याकडे सोपवला. परंतु आईच्या आजारपणामुळे आणि कौटुंबिक जबाबदारीमुळे त्यांना नागपूरहून बदली घेऊन मुंबई आकाशवाणीत यावे लागले.

एखाद्या गुणी मागासवर्गीय अधिकाऱ्याला कचेरीत ऑफिशियल कॉर्नरिंग कसे केले जाते, त्याला एकटा गाठून कसे ठेचले जाते याचा विदारक अनुभव आल्याने नाइलाजास्तव सरकारी नोकरीचा राजीनामा द्यावा लागला. नोकरी सोडल्याचे ऐकून नामदेवरावांच्या आईला, सासू-सासऱ्यांना हादरा बसला. ''रेशनिंगच्या नोकरीपासून ते नोकऱ्या धरतंय काय आन् सोडतंय काय.'' त्याच्या डोक्यात काहीतरी दोष असावा असा सर्वांचा समज झाला. नोकरी करताना बसलेले जातीयतेचे भयानक चटके संवेदनशील माणसालाच कळतात. इतरांना ते कसे समजणार? 'पाण्यामध्ये मासा अश्रू ढाळी कैसा, जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे.'

नोकरी सोडल्यानंतर त्यांना भयंकर आर्थिक ओढाताणीला सामोरे जावे लागले. परंतु ते पुन्हा पहिल्यापेक्षा जास्त ताकदीने कामाला लागले. कारण समाजहितासाठी शासकीय बंधनातून मुक्त झाले होते.

नामदेवरावांच्या बालपणी मालेगावात तमाशाचे फड रंगायचे. नामदेवरावांचे चुलते रामा तमासगिरांचे मृदुंग, तबले, डग्गे, हलग्या चामड्याने मढवून द्यायचे. तमाशा कलावंत ढोलकी वाजवून ठीक लागते का ते पाहण्यासाठी त्यांच्या घरी वाजवून लावण्या म्हणायचे. वडील प्रोत्साहन द्यायचे. त्यामुळे त्यांच्यावर तमाशाचे नकळत संस्कार झाले होते. आपल्या कृषिप्रधान ग्रामीण भागातील रयतेचे मनोरंजनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन प्रभावीपणे होऊ शकते हे ओळखून त्यांनी 'मित्रमंडळ कला विभाग' नावाचे कलापथक स्थापन केले. त्यातून राष्ट्रीय एकात्मता, अस्पृश्यतानिवारणाचा प्रचार सुरू केला. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्रउभारणीच्या कार्याला गती मिळू लागली. त्यासाठी शासनाने आखलेले ध्येयधोरण तळागाळातील लोकांपर्यंत पोचवून लोकसहभाग मिळवण्यासाठी नामदेवराव तमाशा, कलापथकांचा

उपयोग करू लागले. त्याच माध्यमातून ते यशवंतराव चव्हाण, मुंबई राज्याचे मंत्री गणपतराव तपासे, मंत्री नाईक निंबाळकर यांचा निवडणूक प्रचारही करू लागले. त्यांनी चाळीत राहणाऱ्या माणसाचे जगणे विशद करणारे 'तिरसट नंबरची खोली' या नावाने नाटक लिहून ते बसवले. त्याचे शंभरेक प्रयोग गाजले. विनोबा भावेंच्या भूदान चळवळीवर आधारित 'आईशिवाय जन्मला' हे नाटक लिहून माती, जमीन हीच खरी आपली थोरली आई आहे, हा विचार खेड्यापाड्यात पोचवला.

'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मृत्यू दिल्लीत झाला आहे. त्यांचा पार्थिव देह विमानाने रात्री मुंबईला येईल' ही अतिशय दुःखद, क्लेशदायक बातमी ६ डिसेंबर १९५६ रोजी दुपारी वाऱ्यासारखी पसरली. नामदेवराव दादरला 'मुलगा' चित्रपटाच्या गडबडीत होते. त्यांनी तत्काळ ते काम थांबवले आणि डॉक्टर बाबासाहेबांचे अंत्यदर्शन फिल्मवर चित्रित करायचे ठरवले. आर्थिक परिस्थिती नाजूक असल्यामुळे आपला छापखाना गहाण ठेवून चित्रीकरण करण्याची तयारी केली. बाबासाहेबांचे पार्थिव दुसऱ्या दिवशी पहाटे आले. त्यांचा पार्थिव देह ट्रकवर ठेवला होता. महाप्रचंड गर्दी अंत्यदर्शनाला लोटली होती. नामदेवराव व्हटकर कॅमेरा घेऊन ट्रकवर उभे राहिले. दिवसभर निरनिराळ्या भागांतील अंत्यदर्शनाचे चित्रीकरण केले. सूर्य मावळण्याच्या सुमारास दादर चौपाटीवर अंत्ययात्रा पोचली. शाही मानवंदना झाली. शेवटी चैत्यभूमीवर रचलेल्या चितेवर डॉ. बाबासाहेबांचा पार्थिव देह ठेवला गेला. चिता पेटल्यापर्यंतचे असे एकूण दोन हजार आठशे फुटांचे शूटिंग त्यांनी पूर्ण केले. फिल्म तयार झाली खरी, पण ती सतरा-अठरा मिनिटे चालणारी फिल्म दाखवायची कशी? त्यासाठी नामदेवरावांनी 'आहेर' या चित्रपटाची निर्मिती केली. न्यूज रिळसारखी महापरिनिर्वाणाची फिल्म दाखवणे सोयीचे झाले.

आहेरची कथा, दिग्दर्शन आणि त्यातील नायकाची भूमिका त्यांनी स्वतः केली. सुलोचनाबाईंनी नायिकेची भूमिका केली. अनेक अडथळे पार करून, जातीचे भयानक अपमान पचवत त्यांनी अखेर सिनेमा पूर्ण केला.

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाजसुधारणेचे विचार वैश्विक आहेत. त्यांनी खंडप्राय देशातल्या विविधतेत एकात्मता साधली. युगायुगाची अस्पृश्यता संपवणारे ते युगपुरुष आहेत. नामदेवराव व्हटकर यांनी डॉ. बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण फिल्मवर चित्रित करून भावी पिढ्यांसाठी एक 'ऐतिहासिक स्मृतिचित्र' (मेमोरियल) करून ठेवले आहे. ते करताना त्यांचा छापखाना, राहती जागा गेली. त्यांना मुंबईतून गाशा गुंडाळून गावी जावे लागले. परंतु त्याची पर्वा त्यांनी केली नाही.

मुंबई राज्याने अस्पृश्यतानिवारणावर चांगले नाटक लिहिणाऱ्यास एक हजार रुपयाचे बक्षीस ठेवले होते. नामदेवरावांनी 'वाट चुकली' हे नाटक लिहून स्पर्धेला पाठवले. महाराष्ट्रातून आलेल्या एकूण १४४ नाटकांत त्याला प्रथम पारितोषिक मिळाले. सात कोटी खेड्यांच्या भारतात अस्पृश्यतेचा कलंक समाजाला कसा लागला यावर आधारित 'सात करोड' हा लघुपट स्वतःच्या जुन्या घराच्या अस्सल पार्श्वभूमीवर चित्रित करून निर्माण केला.

नामदेवरावांनी त्यावेळच्या २६ जिल्ह्यांचा दोन वेळा दौरा केला. उभा महाराष्ट्र पिंजून काढला. ढोर, चांभार, मांग, महार या गावकुसाबाहेरच्या वेगळ्या जगाचे जगणे पाहिले. आपल्या साहित्यातून तसेच आमदार झाल्यानंतर विधानसभेच्या पटलावरून त्या उपेक्षितांची दयनीय अवस्था सुधारण्यासाठी आवाज उठवला. त्या दृष्टीने कृतिशील प्रयत्न केले.

अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि शिक्षण या नव्या पंचांगांतील पाचही ग्रह बळकट करून, तळागाळातील लोकांचे संपूर्ण जीवन बदलल्यास सशक्त समाजउभारणी होऊन देशाची प्रगती होईल असे त्यांचे मत होते.

नामदेवराव चौरंगी चिरा होते. त्यांना मुरमाड, खडकाळ, पाषाणावर टाका तिथे ते उगवतील, फुलतील, बहरतील.

सन १९६२ साली चीनने पुकारलेल्या युद्धात भारताला अपयश आले. संरक्षणमंत्री बदलले. पंतप्रधान पंडित नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांना दिल्लीला बोलावले. तिकडे जाण्यापूर्वी यशवंतरावांनी नामदेवरावांच्या कार्याची दखल घेऊन, हरिजनांचा लेखक, प्रभावी वक्ता, कलाकार म्हणून त्यांना कोल्हापूरजवळ शालिनी स्टुडिओला लागून १६-१७ एकर जमीन दिली. ती दगडा-धोंड्यांनी भरलेली, काराबोराटीच्या झुडपांनी व्यापलेली, ओघळी पडून माती वाहून गेलेली पडीक जमीन होती. नामदेवराव आणि सिंधुताईंनी अपार कष्ट उपसून तिचे नंदनवन बनवले. प्रयोगशील शेतकऱ्याचे उदाहरण समाजासमोर ठेवले.

हाडाचे कलावंत असलेल्या नामदेवरावांनी समाजाच्या उद्धारासाठी सतीचे वाण घेतले होते. त्यांच्या धर्मपत्नी आदरणीय सिंधुताईंनी अडचणींचे असंख्य डोंगर पार करत आपल्या पतीला सदैव खंबीरपणे साथ दिली. त्यांचे सासरे लक्ष्मणराव यांनी जीव सोडताना मानलेली बहीण यमुनाची पोरगी तानीबाई ऊर्फ सिंधू हिच्याबरोबर लग्न करण्याचे नामदेवकडून घेतलेले वचन सार्थ केले. सिंधुताईंनी कधी मुलाबाळांची हेळसांड होऊ दिली नाही. मुलांवर चांगले संस्कार केले. त्यांची सर्व अपत्ये - अशोक, जयवंत, शरद, नंदू, यशवंत, शालिनी आणि भारती उच्च विद्याविभूषित असून उच्चपदांवर काम करून त्यांनी समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. या कुटुंबाचे साहित्याच्या क्षेत्रात मोठे योगदान आहे.

नामदेवरावांचे कार्य विविधांगी, चौफेर आहे. ते राष्ट्रीय पातळीवरील मौलिक असे आहे. त्यांचे समग्र वाङ्मय पुन्हा प्रकाशित करून समाजाने ते वाचण्याचे कष्ट घ्यावे. समजून घ्यावे. त्यातून बोध घेऊन आपले कुटुंब, समाज सुसंस्कृत बनवावा. नामदेवराव व्हटकरसाहेबांना जन्मशताब्दीनिमित्त तीच खरी आदरांजली होईल, असे मला प्रामाणिकपणे वाटते.

**- प्रा. भगवान इंगळे**

भ्रमणध्वनी : ९९२०४५९७४७



शरद पांडुरंग काळे

# आपले निसर्गऋण

❛वैज्ञानिक दृष्टिकोन असणाऱ्यांची संख्या, एकूण लोकसंख्येच्या तुलनेत आपल्या समाजात नगण्य आहे, हेच म्हणावे लागेल. आपले विज्ञान पुस्तकांमध्ये बंदिस्त राहिले आहे व राहत आहे, म्हणूनच आपली व वास्तवतेची फारकत होण्याची परिस्थिती उद्‌भवत आहे. विज्ञान समजायला सोपे असते, ते समजून घेण्याचा प्रयत्न मात्र करायला हवा. आपले या वसुंधरेशी किती जवळचे नाते आहे हे प्रत्येकाने समजावून घेणे आता आपल्या व सर्वच सजीवांच्या अस्तित्वासाठी आवश्यक झाले आहे.❜

■ ■ ■

**निसर्ग** हा एक सृजनशील आणि संवेदनाक्षम स्रोत आहे. तो जसा नवनिर्मितीक्षम आहे, तसाच तो विदारकही आहे. ज्या निसर्गामध्ये लक्षावधी फुले फुलत असतात, जेथे सौंदर्याची मुक्त हस्ताने उधळण करत सृष्टिदेवता असे एकेक शालू परिधान करत असते, की निखळ सौंदर्यदेवतेलाही त्याचा हेवा वाटावा, त्याच निसर्गात पाहता पाहता भूकंपात शहरेच्या शहरे नजरेआड होतात, पुरात गावेच्या गावे वाहून जातात, आणि चक्रीवादळांमध्ये माणसे पालापाचोळ्यासारखी उडून जातात! निसर्गाची सृजनशीलता आणि संवेदनक्षमता आपल्यासाठी लाखमोलाची आहे हे जाणून घेऊन त्याचे रक्षण करण्यासाठी आपण पुढे यायला हवे. माणसाच्या हव्यासापोटी निसर्गाचे प्रचंड नुकसान होत आहे आणि त्याचे परिणाम आपल्या भावी पिढ्यांना भोगावे लागणार आहेत. ते कमी करायचे असतील, तर आपण सर्वांनी विज्ञानाच्या साथीने काम करायला सुरुवात केली पाहिजे. आपल्या गरजा भागवण्यासाठी आपण निसर्गाची जबरदस्त लूटमार करत आहोत आणि वर ते किती आवश्यक आहे हे सांगून स्वत:चीच फसगत करत आहोत. निसर्गालाही काही मर्यादा आहेत, याचा आपल्याला विसर पडत चालला आहे. त्यातूनच घनकचरा ही समस्या आपल्यासमोर उभी राहिली आहे. ह्या समस्येचे निराकरण कसे करावे यावर प्रभावी मार्ग शोधणे ही काळाची गरज आहे.

आपल्याला पदार्थाचा किंवा ऊर्जेचा अविनाशित्वाचा नियम माहीत आहेच. या साध्या नियमानुसार या जगात कोणतीच गोष्ट नव्याने निर्माण होत नाही किंवा नाश पावत नाही, फक्त तिच्या स्वरूपात बदल होत असतो. पदार्थाच्या अविनाशित्वाचा हा नियम सर्व मूलतत्त्वांच्या चक्रीय परिवर्तनाशी जोडलेला आहे. ह्या नियमानुसार कचरा हा निसर्गासाठी कचरा नसतो असे सहजतेने जाणवते. आपल्या दैनंदिन धकाधकीच्या जीवनात ही साधी गोष्ट आपण विसरतो. म्हणूनच कचऱ्याला नैसर्गिक संपत्ती म्हटले तरच त्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलणार आहे. वास्तविक कचरा व संपत्ती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ज्याला आपण टाकाऊ समजतो ती गोष्ट काहींना टाकाऊ वाटेलच असे नाही.

स्वयंपाकघरात वावरणारी गृहिणी खरे तर वसुंधरेची पाठराखीण असते. मात्र आपल्या कृतीमधून आपण या सखीची पाठराखणच करतो, की तिच्यावर आघात करतो, याचा बारकाईने विचार करण्याची वेळ आता आली आहे. त्यामुळेच वसुंधरेची व आपली ओळख बालपणापासून असली तरी ही अंतरीची ओळख आहे, असे मात्र म्हणता येणार नाही. आपल्या भारतीय परंपरेने महाउपनिषदातून आपल्याला

अयं बन्धुरयंनेति गणना लघुचेतसाम्
उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम्।।

म्हणजेच 'हे विश्वचि माझे घर' अशी शिकवण दिलेली आहे. एखाद्या वास्तूला आपण घर म्हणतो, तेव्हा त्या वास्तूबद्दल आपल्या मनात एक भावनिक जवळीक निर्माण होत असते. तेथील प्रत्येक गोष्ट आपली असते. म्हणूनच आपण ती नीट वापरण्याची काळजी घेत असतो. ही आपलेपणाची भावना प्रत्येकाच्या मनात असतेच, ती वेगळी शिकवावी लागत नाही. मात्र वसुंधरेविषयी आपल्या भावना अशा आपलेपणाच्या आहेत, असे न वाटण्यासारखीच परिस्थिती आपण निर्माण केली आहे, हे आजूबाजूला उघड्या डोळ्यांनी नजर टाकली तर सहजपणे ध्यानात येते. आपण असे का वागतो? याचे कारण दैनंदिन जीवनात वैज्ञानिक दृष्टिकोन असणाऱ्यांची संख्या, एकूण लोकसंख्येच्या तुलनेत आपल्या समाजात नगण्य आहे, हेच म्हणावे लागेल. आपले विज्ञान पुस्तकांमध्ये बंदिस्त राहिले आहे व राहत आहे, म्हणूनच आपली व वास्तवतेची फारकत होण्याची परिस्थिती उद्भवत आहे. विज्ञान समजायला अतिशय सोपे असते, ते समजून घेण्याचा प्रयत्न मात्र करायला हवा. आपले या वसुंधरेशी किती जवळचे नाते आहे हे प्रत्येकाने समजून घेणे आता आपल्या व सर्वच सजीवांच्या अस्तित्वासाठी आवश्यक झाले आहे.

आमच्या प्रयोगशाळेत आम्ही एक छोटासा प्रयोग वीस वर्षे केला होता. एका मोठ्या काचेच्या भांड्यात म्हणजे डेसिकेटरमध्ये एकवीस वर्षांपूर्वी (जून १९९९) एक किलो काळी माती चाळून घेतली होती, व तीत आवश्यक तेवढे (६०० मिली) पाणी घालून मनी प्लँटचे एका रोपटे त्यात लावले होते. चार महिने त्या छोट्या रोपाची आम्ही व्यवस्थित काळजी घेऊन ते वाढवले. ते रोप वाढत असताना त्यात दोन तीन गांडुळे, एक-दोन गोगलगायी दिसू लागल्या होत्या. तसेच, त्या रोपाभोवती हिरव्या शैवालांचीही वाढ होऊ लागली होती. त्यात काही बारीक किडेही दिसू लागले. तीन-चार महिन्यांमध्ये अशी ही एक सुंदर परिसंस्था त्या काचेच्या डेसिकेटरमधे निर्माण झाली.




ऑक्टोबरमध्ये त्या डेसिकेटरला असलेले काचेचे झाकण आम्ही घट्ट लावून टाकले, ते आजतागायत उघडलेले नाही. हा डेसिकेटर आम्ही प्रयोगशाळेतील पश्चिम दिशेला असलेल्या खिडकीत ठेवून दिला आहे. या डेसिकेटरवर संध्यासमयी रविराजाची किरणे पडत असतात. बाहेरच्या जगाशी या परिसंस्थेचा एवढाच काय तो संपर्क आहे. त्या वनस्पतीला आम्ही वीस वर्षे थेंबरभरदेखील पाणी घातले नाही. तरी ते मनी प्लँट हिरवेगार दिसत होते. त्याला नवी पाने येत होती व जुनी गळून पडत होती. त्या मातीवर शैवालांची वाढ होत होती, त्यातील किडेही जिवंत होते. अशाच प्रकारचा प्रयोग व्हिएन्ना येथे नॅचरल हिस्टरी संग्रहालयात जवळजवळ ३६ वर्षे आमच्या डेसिकेटरपेक्षा बऱ्याच मोठ्या प्रमाणावर करण्यात आला होता व त्यात बऱ्याच प्राणी आणि वनस्पतींचा समावेश केला होता. मध्ये सोशल मीडियात ४५ वर्षे बाटलीबंद मनी प्लँटचा एक फोटो ही फिरत असताना पाहिला होता. बाहेरून पाणी न देता वनस्पती अशा वाढू शकतात?

त्यामुळे पाण्याशिवाय परिसंस्था चालू शकते, ही वर वर अशक्य वाटणारी बाब पदार्थाच्या व ऊर्जेच्या अविनाशित्वाच्या नियमाच्या आधारे सहज समजावून सांगता येते. डेसिकेटरचे झाकण घट्ट लावण्यापूर्वी जे पाणी त्या झाडाला पुरवले गेले होते, ते आजतागायत त्या डेसिकेटरमध्ये तेवढ्याच प्रमाणात आहे असाच व एवढाच त्याचा अर्थ. वनस्पती तिच्या वाढीसाठी पाणी वापरते, त्यातील काही पाणी लगेचच पर्णछिद्रांमधून उत्सर्जितही करते. मातीतील पाण्याचे बाष्पीभवन होऊन ते डेसिकेटरमधील मोकळ्या हवेत जमा होते, पण झाकण घट्ट बंद असल्यामुळे ते बाहेरच्या वातावरणात न जाता डेसिकेटरमध्येच राहते. पहाटेच्या वेळी वातावरणात थोडा फार गारवा असतो, तेव्हा ह्या डेसिकेटरमधील हवेतील बाष्पाचे रूपांतर पाण्याच्या थेंबांमधे होऊन ते पुन्हा मातीवर पावसासारखेच पडते. अशा रीतीने पाण्याचे हे चक्र सतत चालू राहाते. तसाच प्रकार इतर मूलतत्त्वांच्या बाबतीतही होतो, आणि डेसिकेटरमधील हे छोटेखानी जीवनचक्र गेली एकवीस वर्षे अव्याहतपणे चालू राहिले आहे व ती परिसंस्थाही विनातक्रार कार्य करत आहे, ह्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही, हे लक्षात येईल. या परिसंस्थेच्या वजनात एखाद्या मिलीग्रॅमनेदेखील वाढ किंवा घट झालेली नाही हा मुद्दा आवर्जून नमूद करायचा आहे.

आपण डेसिकेटरमधील वसुंधरेच्या प्रतिकृतीकडे आता नीट लक्षपूर्वक पाहू. या प्रतिकृतीचे बारकाईने निरीक्षण केले तर आपल्याला असे दिसून येईल, की यात कोणत्याही प्रकारचा कचरा जमा होत नाही. मनी प्लँटची जी पाने गळून पडतात, त्यांचे मातीमधील जिवाणू हळूहळू विघटन घडवून आणतात व त्यातील मूलतत्त्वे मुक्त होत राहतात. ही मुक्त झालेली मूलतत्त्वे मातीमधील जिवाणूंच्याच माध्यमातून पुन्हा वनस्पतीपर्यंत पोहोचतात. अशा तऱ्हेने सूक्ष्मजीवांच्या व वनस्पतीच्या परस्परसामंजस्यातून व पूरकतेतून दोन्ही सृष्टींचे अस्तित्व अक्षय्य सुरू राहते. वनस्पतींपासून

गांडुळे, किडे व गोगलगायी यासारख्या प्राणिसृष्टीला अन्न मिळते व त्यांचेही जीवनचक्र त्यातून सुरू राहते. मेलेल्या किड्यांचे व प्राण्यांचे विघटन करण्यास सूक्ष्मजीवसृष्टी तयार असतेच. त्याशिवाय डेसिकेटरमधील शैवाल या परिसंस्थेतील ऑक्सिजनचे प्रमाण मनी प्लँटच्या सहकार्यातून व प्रकाशसंश्लेषणाच्या माध्यमातून राखून ठेवण्यास मदत करत असते.

'एकमेका साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या वचनाप्रमाणे डेसिकेटरमधील परिसंस्था अबाधित कार्य करत राहते. कोणत्याही प्रकारचा कचरा या परिसंस्थेत जमा होत नाही हा मुद्दा आवर्जून लक्षात घ्यायला हवा. म्हणजेच वसुंधरेच्या किंवा निसर्गाच्या शब्दकोशात कचरा हा शब्दच नाही. एक अतिशय शिस्तबद्ध आणि आखीव-रेखीव असा जीवनक्रम या परिसंस्थेत पाळला जातो.

डेसिकेटरमधे निर्माण झालेली ही परिसंस्था व आपली वसुंधरा यांची तुलना केली तर आपल्या असे लक्षात येईल, की दोन्हींमधे गुणात्मक दृष्ट्या काहीही फरक नाही. फक्त डेसिकेटरच्या तुलनेत वसुंधरा खूपच मोठी आहे. आपल्या वसुंधरेच्या दिनक्रमातही डेसिकेटरमधील परिसंस्थेत पाळली जाणारी वैश्विक शिस्त पाळली जात असते. त्यातूनच आपल्याला दिवस-रात्र, पौर्णिमा-अमावास्या आणि सहा ऋतू यांचे चक्र अनुभवायला मिळते. डेसिकेटरमधील परिसंस्थेच्या तुलनेत, आपल्या वसुंधरेची जैविक विविधता तिच्या आकाराप्रमाणेच मोठी आहे. म्हणजेच या डेसिकेटरमधील परिसंस्थेला आपण वसुंधरेची अतिसूक्ष्म प्रतिकृती म्हणायला हरकत नाही. या वसुंधरेवर डेसिकेटरप्रमाणेच बाहेरून फक्त सूर्यप्रकाशच पुरवला जातो. बाकी सर्व मूलतत्त्वे मात्र सातत्याने येथेच पुनर्चक्रांकित होत राहतात, त्यांच्या एकूण मात्रेत घट किंवा वाढ अजिबात होत नाही. सजीवांचे जीवनचक्र यापेक्षा काही वेगळे नसते. गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी आपल्याला सांगितले आहे, की

वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृण्हाति नरोस्पराणि।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यनानि संयाति नवानी देही।।

कपडे जुने झाले किंवा फाटले की ते आपण जसे बदलतो, तसेच शरीर जीर्ण झाले की त्याचा त्याग करून आत्मा नवीन शरीरात प्रवेश करतो, हा सृष्टीचा नियमच आहे. पंडित जयदेव यांच्या 'भज गोविन्दम्' या काव्यातील 'पुनरपि जननम्, पुनरपि मरणम्। या उक्तीप्रमाणे ही मूलतत्त्वे व सजीवही निसर्गचक्रात फिरत आहेत. या जगात अमर कोण आहे ह्या प्रश्नाचे वादातीत असे वैज्ञानिक उत्तर 'मूलतत्त्वांची सारणी' असे आहे. वसुंधरेची निर्मिती होताना जेवढी मूलतत्त्वे ह्या जगात होती, तेवढीच आजही आहेत. त्यांच्या स्वरूपात बदल होत जातात, पण मूलतत्त्वांचे मूळचे प्रमाण मात्र बदललेले नसते.

या सर्व परिस्थितीत एक बदल असा झाला आहे, की मानवाने निसर्गावर केलेल्या अतिक्रमणामुळे, मानवाच्या हव्यासापोटी व मानवाच्या प्रचंड वाढलेल्या लोकसंख्येमुळे या मूलतत्त्वांच्या चक्रांची गती मानवी गरजांशी पूरक राखणे, निसर्गाला आता अवघड जाऊ लागलेले आहे. त्यात उपलब्ध स्रोतांच्या बाबत समाजात असलेली बेफिकिरी, आणखी अडचणी निर्माण करत आहेत. या बेफिकिरीतून व विज्ञानासंबंधीच्या अज्ञानातूनच कचरा ही समस्या निर्माण झाली आहे. या समस्येचे निराकरण करणे सहज शक्य आहे, आपल्याच हाती आहे व विज्ञान त्यासाठी आपल्याला सर्व ती मदत करणयसाठी तत्पर आहे. मात्र त्यासाठी आपल्याला आपली मानसिकता बदलणे आवश्यक आहे. प्रथम आपण आपल्या शब्दकोशातून कचरा हा शब्द काढून टाकणे व त्याप्रमाणे वागणे, ही या कचरा समस्यानिराकरणातील पहिली पायरी आहे.

शेक्सपीयरने म्हटले आहे, 'नावात काय आहे?' कचरा या शब्दातून जो अनर्थ घडत आहे, हे पाहण्यासाठी जर आज शेक्सपीयर असता, तर त्यानेदेखील हे आपले शब्द बिनशर्त मागे घेतले असते. बायबल या ख्रिश्चन बांधवांच्या धर्मग्रंथात मोझेसने त्यांच्या शिष्यांना केलेल्या उपदेशात 'जगात कोणतीही गोष्ट विनाहेतू निर्माण होत नाही, प्रत्येक गोष्टीच्या असण्याला कोणता ना कोणतातरी अर्थ असतो व तो या सृष्टीच्या दिनक्रमात कुठे ना कुठेतरी निगडित असतो, त्याचा या वसुंधरेच्या व त्यायोगे विश्वाच्याही शाश्वततेशी अगदी निकटचा संबंध असतो,' हे आवर्जून सांगितलेले आहे.

कचरा हा कचरा नसून तो विविध मूलतत्त्वांचाच एक नैसर्गिक स्रोत आहे हे आपण विसरून गेलो आहोत! म्हणून आपण कचरा हा शब्द बदलून त्याला निसर्गस्रोत किंवा निसर्गसंपत्ती असेच संबोधले पाहिजे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सोन्यानाण्याबरोबरच केरसुणीची पूजा करण्याची परंपरा आपल्याकडे आहे, त्यात हाच खोल अर्थ दडलेला आहे. केरसुणी व लक्ष्मी ह्या सख्ख्या बहिणी असून त्या दोघींना सहअस्तित्व असते, असे माझी आई केरसुणीची पूजा का करायची, याचे उत्तर देताना सांगायची. या परंपरेला स्मरून प्रत्येक शहरातून व गावागावातून कचराकुंडी हा शब्द हटवून त्यावर निसर्गसंपत्ती पेटी असे लिहिले तर किमान उद्याच्या पिढीचा त्याकडे बघण्याचा दृष्टिकोन तरी वेगळा असेल, अशी आशा करण्यास जागा आहे. पानात अन्न टाकून देऊन त्याचा कचरा करण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिलेला नाही. पानात अन्न टाकून देऊन आपण घरातील गृहिणीचा, आपल्या शेतकरी बांधवांचा आणि वसुंधरेचा, असा तिहेरी अपमान करत असतो. चला तर सर्व जण शपथ घेऊ,

'आम्ही कचरा शब्द आमच्या शब्दकोशातून काढून टाकत आहोत. आम्ही आमच्या हातून आजपासून कणभरदेखील अन्न वाया जाऊ देणार नाही.'

**– शरद काळे**

sharadkale@gmail.com



डॉ. अनंत पां. लाभसेटवार

# कोरोना लसीमागचं शास्त्र व शास्त्रज्ञ

'जगातल्या अधिकांश लसी (ब्रिटनची अ‍ॅस्ट्राझनेका, रशियाची स्पुटनिकत, चीनची सायनोव्हॅक्स व भारताची कोव्हॅक्सिन) पारंपरिक पद्धतीनं विकसित करण्यात आल्या. त्यात प्रतिपिंडे (Antibodies) निर्माण करण्यासाठी मृत व्हायरस पिंड म्हणून वापरण्यात येतो. अशा लसींची परिणामकारकता कोरोनाच्या अलिकडच्या उप्तपरिवर्तित अवताराविरुद्ध (ओमिक्रॉन) बेताचीच आहे. चीनची लस सर्वस्वी अपरिणामकारक आहे असं आढळून आलं. परंतु अमेरिकेच्या फायझर व मॉडर्ना कंपन्यांनी व्हायरसऐवजी mRNA पिंड म्हणून विकसित केलेल्या लसी आतापर्यंतच्या कोरोनाच्या सर्व रूपांना पुरून उरतात असं आढळून आलं. यापुढे लसी हे जैवतंत्रज्ञान वापरून विकसित करण्यात येतील. म्हणून त्याचं शास्त्र व शोध लावणारे शास्त्रज्ञ जाणून घेणं उद्‌बोधक ठरेल.'

■ ■ ■

शरीरातल्या प्रत्येक पेशीत DNA, RNA व mRNA ही मूलद्रव्ये सापडतात. mRNA म्हणजे पाककृतीचं एक पुस्तकच. ते वाचून पेशींमध्ये प्रथिनबांधणी होते व त्यांच्या जाळ्याला (Tissue) विशेष रूप येते. काही पेशींमुळे मज्जातंतू निर्माण होतात तर काही नखाचं रूप धारण करतात. हे फरक mRNA धिष्ठित निर्माण केलेल्या प्रथिनांचे आविष्कार आहेत. मग व्हायरसनं mRNA पिंड म्हणून वापरला तर त्याविरुद्ध प्रतिपिंड (तेसुद्धा विशिष्ट प्रथिनच) का निर्माण करता येऊ नये? अनेक शास्त्रज्ञांनी असे प्रयोग केले आणि ते सर्व फसले. याचं कारण असं की mRNA टोचलं तर त्याचे दुष्परिणाम तर होतातच, पण शरीरातली सुरक्षायंत्रणा त्याचा नाश करते. ते अंगातल्या पेशीत घुसत नाही. त्यामुळे प्रतिपिंड निर्माण करण्यास असमर्थ ठरते. ही अडचण दूर करण्यासाठी अनेक शास्त्रज्ञांनी प्रयत्न केले असले तरी त्यात दोन शास्त्रज्ञांचं योगदान महत्त्वाचं समजण्यात येतं. एक म्हणजे साम्यवादी हंगेरीत जन्मलेली व नंतर अमेरिकेत स्थलांतरित झालेली कॅटलिन करिको (Kariko) नावाची महिला व दुसरा म्हणजे युनिव्हर्सिटी ऑफ पेनसिल्वेनियाचा व्यवसायानं डॉक्टर असलेला ड्र्यू वाईजमन (Drew Weissman). तो प्रतिपिंडतज्ज्ञ (Immunologist) होता. अनेकदा महत्त्वाचे शोध केवळ अपघातामुळे किंवा योगायोगामुळे लागतात. पेनिसिलन, नायलॉन ही त्याची काही उदाहरणं. डॉ. करिको व डॉ. वाईजमन एकत्र येणं हा सुद्धा एक अपघातच होता. ते एकेदिवशी कॉपी करण्यासाठी कॉपिइंग मशिनजवळ आले असताना त्यांचं हलकंफुलकं बोलणं सुरू झालं. मग परिचय होऊन सहकार्य झालं आणि mRNA वापरून लस निर्माण करण्याचं जैवतंत्रज्ञान जन्माला आलं.

करिकोनं हंगेरीमध्ये RNA चा अभ्यास करून आचार्याची पदवी मिळवली व एका सरकारी प्रयोग शाळेत संशोधन सुरू केलं. पण पैसे संपुष्टात आले आणि सरकारनं ती संस्था बंद केली. म्हणून तिनं १९८५ मध्ये सहकुटुंब अमेरिकेचा रस्ता पकडला. पण साम्यवादी देश सोडणं सोपं नव्हतं. पन्नास डॉलरपेक्षा जास्त रक्कम देशाबाहेर नेता येत नव्हती. मग वाहन विकून आलेल्या बाराशे डॉलरचं काय करायचं? तिनं ते दोन वर्षीय मुलीच्या खेळण्यात लपवून देशांतर केलं व युनिव्हर्सिटी ऑफ पेनसिल्वेनिया, फिलाडेल्फिया



ड्र्यू वाईजमन



कॅटलिन करिको

इथे बस्तान हलवलं. अमेरिकेत संशोधनासाठी N.I.H. (National Institutes of Health) यासारख्या संस्थांकडून देणग्या मिळाव्या लागतात. त्यासाठी तिनं आपल्या संशोधनाचं महत्त्व अधोरेखित करणारा अर्ज पाठवला. जर mRNA पेशीमध्ये घुसवता आलं तर त्यामुळे कर्करोग, हृदयविकार यासारखे असाध्य रोग बरे करता येतील असा प्रस्ताव तिनं आपल्या अर्जात मांडला. पण ज्या शास्त्रज्ञांच्या समितीनं तिचा अर्ज तपासला तिला ते अतिशयोक्त वाटलं व अर्ज धुडकावून देण्यात आला. म्हणून तिनं माघार घेतली नाही. एका पाठोपाठ चोवीस वेळा अर्ज पाठवले. त्याही सर्वांना केराची टोपली दाखवण्यात आली.

याप्रमाणे मनाच्या निराशाजनक परिस्थितीत असताना तिची डॉ. वाईजमनशी ओळख झाली आणि तिनं त्याच्या प्रयोगशाळेत काम करून mRNA चं रहस्य उलगडण्यावर संशोधन सुरू केलं. शरीरात कुठल्याही उपऱ्या रेणूंचा नाश करण्याची जी उपजत प्रतिकारशक्ती असते तिला चुकवण्यासाठी तिनं mRNAच्या अतिसूक्ष्म कणांना (Nano Particles) मेदरूपी आवरणात गुंडाळलं आणि तिचं उद्दिष्ट साध्य झालं. शरीरातली संरक्षणयंत्रणा या कणांना ओळखू शकली नाही. त्यामुळे प्रथमच mRNAचे कण पेशीमध्ये प्रविष्ट होऊ शकले. त्यांनी गुणसूत्रांवरील जनुकांचा ताबा घेऊन नवीन पुस्तकातल्या माहितीनुसार प्रथिनं निर्माण करून विशेष प्रतिपिंडं तयार केली. हा शोध जेवढा खळबळजनक तेवढाच जैवशास्त्रात महत्त्वाचा होता.

त्या दोघांनी संशोधननिबंध लिहून तो त्या क्षेत्रात अतिप्रतिष्ठित समजलं जाणाऱ्या मासिकात प्रसिद्ध केला. ते इतर शास्त्रज्ञांकडून कौतुकसुमनं उधळणाऱ्या पत्रांची वाट बघत राहिले. पण कुणाचंच कुतूहल जागृत झालं नाही व तो शोध अडगळीत पडला.

**कोरोनाची लस**

चीनमध्ये २०१९ च्या शेवटाला कोरोनाची साथ सुरू झाली. ती एक मामुली व स्थानिक बाब समजून जगानं जांभया दिल्या. जानेवारी–फेब्रुवारी २०२० मध्ये चिनी शास्त्रज्ञांनी कोरोना व्हायरसची जनुकीय रचना प्रसिद्ध केली. म्हणजे त्याच्या RNA मध्ये असलेल्या अंदाजे तीस हजार घटक द्रव्यांच्या (Nucleotides) अनुक्रमाचा शोध लावला. तो वाचून फायझर या बहुद्देशीय औषध कंपनीचा जो मुख्य होता (अल्बर्ट बुरला) त्याच्या डोक्यात एकदम बत्ती पेटली. त्यावेळी कोरोना जगभर धुमाकूळ माजवेल व मोठ्या प्रमाणावर जीवितहानी करेल याची कुणाला कल्पना नव्हती. कारण ती साथ चीनमधल्या वुहान शहरापुरतीच मर्यादित होती. कंपनीनं यापूर्वी व्हायरसवरच्या अनेक लसी बाजारात आणल्या होत्या. किंबहुना फायझर त्यावेळी फ्लूच्या व्हायरसवर mRNA वापरून लस निर्माण करण्यासाठी संशोधन करत होती, पण त्याला अजून फळ आलं नव्हतं.

**उत्परिवर्तन**

घटकांच्या रचनेत बदल होतो त्याला उत्परिवर्तन (Mutation) म्हणतात. असे बदल व्हायरसच्या उत्क्रांतीत वारंवार होत असतात. दक्षिण आफ्रिकेतून आलेल्या ओमिक्रॉन व्हायरसमध्ये पन्नासहून अधिक बदल आढळले. काही त्याच्या पृष्ठभागी असलेल्या गदेच्या आकाराच्या काट्यात तर काही त्या पृष्ठभागातच. त्यामुळे विषाणूंचे गुणधर्म बदलतात. ओमिक्रॉनच्या बाबतीत तो कमी विनाशक (Virulant) होऊन त्याची संक्रमणक्षमता (Transmissibility) अनेक पटींनी वाढली. या संसर्गजन्यतेमुळे अमेरिकेत रुग्णांची संख्या तिप्पट–चौपट झाली. १२ जानेवारी २०२२ रोजी ५५ लाखांवर गेली.

ही उत्परिवर्तनाची प्रक्रिया सारखी सुरू असल्यामुळे यापुढेही नवीन अवतार उद्भवण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे त्यांचा नाश करण्याऐवजी त्याच्याशी साहचर्य करण्याचं आपण शिकलो पाहिजे, असं अनेक तज्ज्ञांनी अलिकडे म्हटलं. शाळा, कॉलेजे, विमानं, मॉल बंद करून जीवन विस्कळीत करण्याऐवजी या विषाणूला धीटपणे सामोरं जाण्याची वेळ उभी ठाकली आहे. त्यामुळे जनतेत नैसर्गिक प्रतिकारशक्ती निर्माण होऊन हानी होणार नाही. याविषयी चीननं जो आततायीपणा दाखवला तो महाग पडला. त्या देशात एक बाधित सापडला म्हणून सर्व तेरा दशलक्ष लोकवस्तीच्या शहरात टाळेबंदी जाहीर करण्यात आली. अन्न आणण्यासाठीदेखील कुणाला बाहेर पडू दिलं नाही. त्यामुळे लोकांचे अधिक हाल झाले.

याचा दुसरा भाग असा, की व्हायरसला दूर ठेवल्यामुळे देशात प्रतिकारशक्ती अशी निर्माण झाली नाही. भारतात ती मुबलक प्रमाणात सापडते. सध्या चीननं परदेशी पर्यटकांवर बंदी घालून देशाला कुलूप लावलं आहे. पण पुढेमागे त्याला देश खुला करावाच लागेल. त्यावेळी देशात व्हायरस शिरण्याची दाट शक्यता आहे. तसं झालं तर नैसर्गिक प्रतिकारशक्ती विकसित न होऊ दिल्यामुळे त्या देशात रोगाची साथ वणव्याच्या वेगानं पसरेल. या गोष्टीचा चीनच्या हुकूमशहानं विचार केलेला दिसत नाही.

**फायझर औषध कंपनी**

फायझर शंभर वर्षांपेक्षा जुनी औषध कंपनी. नवीन लस बाजारात आणण्यासाठी जे भांडवल, संशोधन, चाचणी, कारखाने, नियामक मंडळांची परवानगी (FDI) व शेवटी विपणन करण्यासाठी कौशल्य लागतं ते सर्व तिच्याजवळ होतं. म्हणजे शब्द

होते त्यापासून काव्य करायचं बाकी राहिलं होतं. इथे अल्बर्टला एकदम करिकोची आठवण झाली. तिचं संशोधन त्याच्या चांगल्या परिचयाचं होतं. एव्हाना अमेरिका सोडून जर्मनीत नव्यानंच स्थापन झालेल्या BioNTec नावाच्या उद्यमारंभी कंपनीत RNA वर संशोधन करणाऱ्या विभागाची प्रमुख म्हणून ती काम करत होती. mRNA चे कण पेशीमध्ये घुसवून खास प्रतिपिंड निर्माण करण्याच्या जैवतंत्रज्ञानामुळे कुठलीही पेशी (Cell) म्हणजे औषध उत्पादनाचा एक कारखाना आहे असं तिचं ठाम मत झालं होतं. हे स्वप्न साकारत करून कर्करोगासारखे असाध्य रोग बरे करण्यासाठी करिको आता कष्ट उपसत होती. त्यामुळे अल्बर्टचा फोन आला तेव्हा ती सहकार्य करण्यास एका पायावर तयार झाली.

चिनी शास्त्रज्ञांनी प्रकाशित केलेली जनुकीय रचना वापरून करिकोनं त्याचं mRNA तयार केलं. हे नवीन पाककृतीचं पुस्तक तिनं आपण विकसित केलेलं तंत्रज्ञान वापरून प्राण्यांच्या पेशीत प्रविष्ट करून कोरोनाविशेष प्रतिपिंडं तयार केली. प्रायोगिक प्राण्यांमध्ये जो प्रतिसाद मिळाला तो कल्पनातीत होता. त्यामुळे आशा पल्लवित झाल्या. लगेच मानवात प्राथमिक चाचण्या करण्यात आल्या (Phase I & II ट्रायल). तिथे मिळालेलं यश अधिकच आश्वासक होतं. लस परिणामकारक तर होतीच, महत्त्वाचं म्हणजे तिचे कुठलेच घातक दुष्परिणाम या चाचण्यात गोचर झाले नाहीत. जे सापडले ते क्षुल्लक होते. आता कोरोना जगभर पसरला होता. अमेरिकेत लाखो लोक दगावले होते. दवाखान्यात खाटा मिळेनाशा झाल्या. तिथे प्रेतांच्या राशी मावत नव्हत्या. हे मृत्युकांड थांबवण्यासाठी लसीची अत्यंत गरज होती. फायझरनं ४०-५० हजार रुग्णांवर चाचण्या केल्या व लस ९०% परिणामकारक आहे असं जाहीर करून रुग्णांना दिलासा दिला.

लस विकसित करून बाजारात आणण्यास एक अब्ज डॉलरचा खर्च आला. ट्रम्प यांनी शंभर दशलक्ष मात्रा विकत घेऊन तेवढं भांडवल कंपनीला देण्याचं कबूल केलं. पण फायझरनं त्याला नकार दिला. सरकारी पैशांबरोबर बाबूशाही (बैठका, अहवाल, शेकडो आकृतिबंध व सरकारची करडी नजर) येते. ते अल्बर्टला नको होतं. नंतर कंपनीनं सरकारला लस विकून अब्जावधी डॉलर कमावले. या लसीला FDAची परवानगी मिळण्यास एक वर्ष लागलं. लस विकसित करण्यास सामान्यत: कमीत कमी चार वर्षं लागतात, पण कोरोनामुळे उद्भवलेली आपत्ती बघून ट्रम्प यांनी सरकारच्या लाल फितीला कात्री लावली व लसीला अवघ्या एक वर्षात बाजारात येण्यास रस्ता मोकळा केला.

**मॉडर्नाची लस**

जी जनुकीय रचना बघून अल्बर्टच्या डोक्यात बत्ती पेटली अगदी तशीच कल्पना दहा वर्षीय बोस्टनस्थित मॉडर्ना कंपनीचा मुख्य स्टीफन बंसलला (Stephan Bansal) सुचली. ती एक उद्यमारंभी कंपनी, पण अद्याप तिनं एकही औषध बाजारात आणलं नव्हतं. कोरोनानं ती संधी दारात आणली म्हणून स्टीफन बंसलनं लगेच फायझरप्रमाणे लस विकसित करण्याचा निर्णय घेता. करिकोचं जैवतंत्रज्ञान वापरून तिलाही यश आलं. प्राथमिक चाचण्या संपवून निदान ३०-४० हजार रुग्णांमध्ये त्या करण्यास लागणारा पैसा कंपनीजवळ नव्हता. अशा Phase III ट्रायलमध्ये अनेक औषधं त्याज्य ठरतात, पण ट्रम्पनी द्रष्टेपणा दाखवून मॉडर्नाकडून दहा कोटी मात्रा विकत घेण्याचा करार केला व एक अब्ज भांडवल कंपनीत ओतलं. एका आठवड्याच्या अंतरानं दोन्ही कंपन्यांना नोव्हेंबर २०२०च्या अध्यक्षीय निवडणुकीनंतर आपत्कालीन दाखले मिळाले आणि २०२१ च्या सुरुवातीला लस उपलब्ध झाली.

यापुढे mRNA चं नवीन करिकोप्रणीत तंत्रज्ञान वापरून अनेक रोगांवरील लसी विकसित करण्यात येतील. मॉडर्ना सध्या अशा निदान अकरा असाध्य रोगांवर काम करत आहे. फायझर फार मागे नाही. आता फायझरनं कोरोनाच्या गोळ्या बाजारात आणून क्रांती केली. कोरोनाबाधितांनी त्या पहिल्या पाच दिवसांत घेतल्या तर ९०% परिणामकारक ठरतात असं आढळून आलं. कंपनी त्या बनवण्याचं तंत्रज्ञान इतर देशांना देणार आहे. याचा भारत उपयोग करू शकेल, कारण त्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा, कौशल्य व विद्वत्ता देशात आहे. त्यात नोकरशाही आडवी येऊ नये म्हणजे झालं.

**अमेरिकेतील संशोधनस्नेही वातावरण**

इथे दोन गोष्टी नमूद करण्यासारख्या आहेत. एक म्हणजे खाजगी क्षेत्राचं काम सरकारी क्षेत्रांपेक्षा केव्हाही जास्त कार्यक्षम, उत्पादक व सृजनशील असतं हे इतिहासात वारंवार सिद्ध झालं. पण तिकडे आपण नेहमी दुर्लक्ष करतो. साम्यवादी चीननं अद्याप mRNA ची एकही लस बाजारात आणली नाही हे बोलकं उदाहरण नाही का? भारताचा व युरोपचा समाजवादही त्याच माळेतला.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अमेरिकेतलं संशोधनस्नेही वातावरण. त्यामुळे जगभरातली गुणवत्ता या देशात आकर्षित होते. फायझरचा मुख्य अल्बर्ट ग्रीसमध्ये व मॉडर्नाचा फ्रान्समध्ये जन्मलेला. याशिवाय दोन्ही कंपन्यांत अनेक भारतीय शास्त्रज्ञ व व्यवस्थापक काम करतात. मायदेशात ते जे करू शकले नाहीत त्याची गुढी अमेरिकेत रोवणं शक्य झालं. या देशामध्ये जेवढं स्वातंत्र्य सापडतं तेवढं जगात दुसऱ्या कुठल्याच मोठ्या देशात सापडत नाही.

कोरोनानं ते सिद्ध करून दाखवलं.

**– अनंत लाभसेटवार**
लेखक फर्स्ट नॅशनल बँक, USAचे
१४ वर्ष Chairman of Board होते.
anantlabh@gmail.com

## ‘अविनाशपासष्टी’ या गझलसंग्रहाचे प्रकाशन
# ‘अविनाश सांगोलेकरांच्या सामाजिक-राजकीय गझला विचारप्रवर्तक’ - सुशीलकुमार शिंदे



**प्रकाशनसमयी धनश्री धारप, लेखक अविनाश सांगोलेकर, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, कवी-गीतकार अरुण म्हात्रे आणि गझलकार प्रदीप निफाडकर**

‘‘गझल म्हणजे प्रेम, विरह असं असताना अविनाश सांगोलेकरांच्या गझला मात्र विचारप्रवर्तक असा सामाजिक-राजकीय आशय व्यक्त करतात. त्यांचं हे वेगळेपण सुरेश भटांची गझलपरंपरा अधिक समृद्ध करेल’’, असे गौरवोद्गार माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे ह्यांनी काढले. आद्य मराठी गझलसंशोधक, ज्येष्ठ गझलकार प्राचार्य डॉ. अविनाश सांगोलेकर ह्यांच्या ‘अविनाशपासष्टी’ ह्या गझलसंग्रहाच्या प्रकाशनसमयी ते बोलत होते. ‘ग्रंथाली’ आणि पुणे येथील ‘माझी गझल’ ह्या दोन संस्थांच्या संयुक्त विद्यमाने, पुण्यात एस.एम. जोशी सभागृहात १५ जानेवारी २०२२ रोजी हा समारंभ झाला. ह्या प्रसंगी कवी-गीतकार अरुण म्हात्रे ह्यांनी सुरेश भट, भीमराव पांचाळे ह्यांच्या मराठी गझलेतील योगदानाचा संदर्भ देत सांगोलेकरांच्या योगदानावर प्रकाश टाकला. ते म्हणाले, ‘‘काळाच्या कसोटीवर उतरतील असे किमान पंधरा-वीस तरी शेर सांगोलेकरांच्या ‘अविनाशपासष्टी’ ह्या गझलसंग्रहात नक्कीच आहेत.’’

प्रारंभी ‘ग्रंथाली’च्या कार्यक्रम संयोजिका धनश्री धारप ह्यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले, तर शेवटी आभारप्रदर्शन ‘माझी गझल’चे प्रमुख, ज्येष्ठ गझलकार प्रदीप निफाडकर ह्यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. धनंजय भिसे ह्यांनी केले. प्रकाशन समारंभानिमित्त ‘अविनाशी गझल’ ह्या कार्यक्रमाद्वारे प्राचार्य डॉ. सांगोलेकरांच्या चार गझलांचे गायन आणि नृत्य असे सादरीकरण करण्यात आले. त्यात साताऱ्याचे प्रा. संभाजी पाटील आणि त्यांचे पुत्र दिगंत पाटील, नासिकच्या ऊर्मिला मनोहर-वंजारी, अमरावतीच्या शुभांगी पेठे, पुण्याच्या रेश्मा मुसळे परितेकर, मनाली तुंगे-झाडे, हृषीकेश तिखे आणि सुधीर टेकाळे यांचा सहभाग होता. कोरोनानिर्बंधांच्या पार्श्वभूमीवर निमंत्रितांच्या उपस्थितीत संपन्न या कार्यक्रमास मोहन जोशी, रामदास फुटाणे, संगीता जोशी, सुधीर कुबेर, दीपक करंदीकर, डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी, डॉ. अविनाश आवलगावकर, डॉ. रा.गो. चवरे, मनोहर सोनवणे, धनंजय तडवळकर असे विविध क्षेत्रांमधील मान्यवर उपस्थित होते. ●

ग्रंथाली


## अभिनंदन!






महाराष्ट्र शासन पुरस्कृत स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार जाहीर झाले असून सर्वोत्कृष्ट मराठी विनोदी पुस्तकासाठी १ लाख रुपयांचा श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुरस्कार ग्रंथाली प्रकाशित, सॅबी परेरा लिखित ‘टपालकी’ या पुस्तकाला मिळाला आहे, त्याबद्दल सॅबी परेरा यांचे ‘ग्रंथाली’ परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन!

# ‘बखर घारापुरीची’ या पुस्तकाचे प्रकाशन




**ग्रंथ प्रकाशनसमयी डॉ. मृण्मयी भजक, धनश्री धारप, संपादिका नीला उपाध्ये, डॉ. दिलीप राजगोर, डॉ. दिलीप बलसेकर, आदित्य लाड, महेश खरे आणि विनोद सौदागर**

इतिहासाचे अभ्यासक, संशोधक, कोकण इतिहास परिषदेचे अध्यक्ष, महाराष्ट्र इतिहास परिषदेचे कार्यकारिणी सदस्य, महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंडचे कार्यकारिणी सदस्य रवींद्र लाड लिखित ‘बखर घारापुरीची’ या ग्रंथाचे प्रकाशन रविवार, १६ जानेवारी २०२२ रोजी महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड व ग्रंथालीच्या संयुक्त विद्यमाने मुलुंड येथे संस्थेच्या सभागृहात झाले. त्यास रवींद्र लाड यांच्या प्रथम स्मृतिदिनाचे औचित्य साधण्यात आले होते. पुरातत्त्व विभागाचे माजी संचालक व गॅझेटियरचे संपादक डॉ. दिलीप बलसेकर हे समारंभाचे प्रमुख अतिथी; तर नाणेशास्त्र, इतिहास, भाषाशास्त्र, पुरातत्त्व इत्यादी विषयांवर चारशेहून अधिक पुस्तके, नियतकालिके, जर्नलमध्ये लिखाण करणारे, मुंबई विद्यापीठात भारतीय नाणेशास्त्रावरील पदव्युत्तर पदवीचा अभ्यासक्रम सुरू करणारे आणि कॉईन स्टार्स या यू ट्यूब चॅनेलचे निर्माते, संस्थापक असे बहुआयामी डॉ. दिलीप राजगोर व ज्येष्ठ पत्रकार नीला उपाध्ये विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

समारंभाच्या आरंभी नुकतेच निधन झालेले मेहता पब्लिकेशनचे सुनील मेहता, चित्रकार बाळ ठाकूर व पद्मगंधा प्रकाशनाचे अरुण जाखडे यांना आदरांजली अर्पण केली गेली.

प्रमुख अतिथी डॉ. बलसेकर यांनी आपल्या भाषणात या पुस्तकातील वेगवेगळ्या माहितीचा परामर्श घेत, काही माहिती या पुस्तकामुळे आपल्याला नव्याने कळल्याचे सांगत, लेखकाच्या संशोधनाचे महत्त्व विशद केले. या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी लाडांचे तसेच त्यांच्या कुटुंबीयांचे परिश्रम कौतुकास पात्र असल्याचे ते म्हणाले. हे पुस्तक घारापुरीला पर्यटकांना उपलब्ध करून देण्याबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडे शिफारस व प्रयत्न करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

डॉ. राजगोर यांनी अशा पुस्तकाचे महत्त्व असल्याचे सांगत, संदर्भासाठी अशा पुस्तकांची आवश्यकता प्रतिपादन केली. हे पुस्तक इतर भाषांतही अनुवादित होऊन अनेकांपर्यंत पोचले पाहिजे असे ते म्हणाले. त्यासाठी आवश्यक सहकार्य मी करेन असे आश्वासन त्यांनी दिले.

या ग्रंथाच्या संपादिका नीला उपाध्ये यांनी या पुस्तकाचे सारे श्रेय लेखक रवींद्र लाड यांचेच आहे, मी केवळ त्यास योग्य ग्रंथरूप दिले असे नमूद करत, त्यांच्या निरलस संशोधनकार्याबद्दल आदर व्यक्त केला. त्यांची मदतशील वृत्ती अनेकांना मार्गदर्शक होती हे सांगताना, त्यांच्या चुनाभट्ट्यांचा इतिहास सांगणाऱ्या शोधनिबंधास लाड यांनी सहकार्य केल्याने तो प्रकल्प पूर्ण होऊ शकला, अशी कृतज्ञता व्यक्त केली.

सुरुवातीस ग्रंथालीच्या कार्यक्रम संयोजिका धनश्री धारप यांनी ग्रंथालीच्या विविध योजना व आगामी संकल्प याविषयी उपस्थितांना अवगत केले. महेश खरे यांनी प्रकाशित होत असलेल्या पुस्तकाबाबत मनोगत व्यक्त करताना सूचना केली, की पुस्तकात लेखकाने अनेक शतकांपूर्वीच्या शासनकर्त्यांच्या राजवटीतील परिस्थिती, झालेले सांस्कृतिक व सामाजिक बदल इत्यादी इतिहास उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केलेला असल्याने घारापुरीला येणाऱ्या पर्यटकांना महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सहयोगाने हे पुस्तक उपलब्ध करून दिल्यास घारापुरी बेटांचा इतिहास समजून घेणे सहजसुलभ होईल.

आयोजकांतर्फे महाराष्ट्र सेवा संघाचे अध्यक्ष विनोद सौदागर यांनी लाड यांच्यासोबतचा पन्नास वर्षांहून अधिक काळाचा परिचय व मैत्र यावर भर देत, लाडांच्या प्रकाशित होत असलेल्या पुस्तकाला व लाड परिवाराला शुभेच्छा दिल्या. नीला उपाध्ये यांच्या विशेष प्रयत्नांमुळे व परिश्रमांमुळे हे पुस्तक मूर्त स्वरूपात येत असल्याचे सांगत, त्यांना आणि ग्रंथालीस धन्यवाद दिले.

यावेळी कोकण इतिहास परिषदेच्या कार्यवाह डॉ. विद्या प्रभू यांनी लाडांच्या आठवणींना उजाळा दिला. लाड परिवारातर्फे लाडांचे भाचे शंतनू राणे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रकाशन समारंभाचे नेटके सूत्रसंचालन डॉ. मृण्मयी भजक यांनी केले. ●

## ‘लोकमान्य टिळक घरातले आणि जनमानसातले’ या पुस्तकाचे प्रकाशन



**स्वराज्यभूमी (गिरगाव चौपाटी) येथे प्रजासत्ताकदिनी डॉ. उज्ज्वला मेहेंदळे लिखित ‘लोकमान्य टिळक घरातले आणि जनमानसातले’ या पुस्तकाचे प्रकाशन ‘स्वराज्यभूमी’ उपक्रमाचे प्रवर्तक प्रकाश सिलम यांच्या हस्ते पार पडले. त्यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.**

## ‘सृजन’ या कवितासंग्रहाचे प्रकाशन



**शैला काळकर**



**जयश्री सांगवीकर**



**अलका मुतालिक**



**अल्पना जोशी**

अल्पना जोशी लिखित ‘सृजन’ ह्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ३० जानेवारी २०२२ रोजी डिजिटल माध्यमातून झाले. अल्पना जोशी ह्यांचे सद्गुरू परमपूज्य डॉ. श्रीकृष्ण देशमुख (मुरगुड, कोल्हापूर) उपाख्य डॉ. काका (उपनिषदे व संत-वाङ्मयाच्या प्रचारार्थ विपुल लेखन, ग्रंथ निर्मिती व देश विदेशात प्रवचने) ह्यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले. कार्यक्रमास डॉ. शैला काळकर, स्नेहा महाजन, अलका मुतालिक ह्या मान्यवर उपस्थित होत्या.

‘सृजन’च्या कवयित्री अल्पना जोशी ह्यांनी काव्यसंग्रहाच्या निमित्ताने आपले मनोगत व्यक्त केले. आपली काव्यसंस्कृती, तिचे महत्त्व व उपयोग याबद्दल त्यांनी भाष्य केले. डॉ. श्रीकृष्ण देशमुख यांच्या कन्या स्नेहा महाजन (उद्योजिका, लेखिका, अनुवादिका) यांनी काव्यातील विविधतेचा उल्लेख करतानाच स्वरूपनिर्देश करणाऱ्या ‘परमार्थाचे असावे भान’ या कवितेचा विशेष उल्लेख केला. शैला काळकर (प्राध्यापिका, मराठी विभाग प्रमुख, लेखिका, प्रवचनकार) ह्यांनी ‘अपूर्ववस्तूनिर्माणक्षमा प्रज्ञा’ ही प्रतिभेची व्याख्या सांगून, अल्पना जोशींच्या कवितांशी तिची सांगड घातली. ‘सुद्गुरुकृपा ही प्रतिभेचा झरा वाहता करते’ असं सांगून दगड, काठी, चष्मा यांसारख्या आगळ्यावेगळ्या विषयांवर प्रकाश टाकणाऱ्या; अंतर्मुख करणाऱ्या; संवेदनशील; बोलक्या; निसर्गाशी नातं जोडणाऱ्या; आनंददायी; बोधदायी अशा अनेक कवितांचा उल्लेख केला. अलका मुतालिक (प्राध्यापिका, प्रवचनकार, ग्रंथकार, भागवत व राम कथाकार) यांनी असे सांगितले, की विषय कोणताही असला तरी अल्पना जोशी यांच्या प्रत्येक कवितेला कळतनकळत परतत्त्वाचा स्पर्श आहे.

डॉ. काकांचे आशीर्वचन हा कार्यक्रमाचा कळसाध्याय होता. ‘कवयित्रीचा सत्त्वगुण ह्या काव्यसंग्रहात जागोजागी प्रकट झालेला आहे. कवितांच्या विषयांची विविधता चकित करणारी आहे.’ अशा प्रकारे सुरुवात करून, ‘‘कला, ज्ञान आणि पावित्र्य ह्या सरस्वतीच्या ठिकाणी असणाऱ्या गोष्टी वाङ्मयात आल्या की ते ‘सारस्वत’ होतं. ह्या काव्यसंग्रहात सारस्वत आहे’’.. असे गौरवोद्गार त्यांनी काढले. कार्यक्रमाची सांगता अल्पना जोशींच्या एका लहानशा कवितेने झाली. आरंभी ग्रंथालीच्या कार्यक्रम संयोजिका धनश्री धारप ह्यांनी ‘ग्रंथाली’च्या वतीने प्रास्ताविक केले. शमिका कुलकर्णी ह्यांनी ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



**डॉ. श्रीकृष्ण देशमुख**



**ज्योत्स्ना पाटणकर**



**स्नेहा महाजन**



**धनश्री धारप**



**शमिका कुलकर्णी**

## ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

**'सर्जन'शील**

**डॉ. अविनाश सुपे**




**नोबेल माणसाचे नोबेल आत्मचरित्र**

*''सामान्य रुग्ण या 'नारायणा'च्या रूपात डॉक्टरला पाहात असतो, आपल्या जिवाला जीवन देणारा म्हणून हे एकमार्गी नसतं. डॉक्टरच्या जिवाला जीवन देणाराही रुग्णच असतो. तो आला नाही, येऊनही बरा झाला नाही, तर डॉक्टरच्या जिवाला जीवन कसं म्हणता येईल? डॉक्टर आणि रुग्ण, अशा दोघांच्याही 'जिवीच्या जीवना'चा अनुभव घेण्यासाठी मी अजूनही वैद्यकीय पेशातच आहे.''*

' 'सर्जन'शील' हे डॉ. अविनाश सुपे यांचे आत्मचरित्र ग्रंथालीने नुकतेच प्रसिद्ध केले आहे. शीर्षकात आलेला 'सर्जन' हे व्यवसायाचा एक भाग म्हणून आलेले प्रतीक. डॉ. अविनाश सुपे हे निष्णात सर्जन आहेत. परिश्रम, जिद्द आणि ध्येय यांच्या बळावर ते आज या पदावर शिखरस्थानी स्थिरावले आहेत, आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांची नोंद घेतली गेलेली ओ. एचपीबी सर्जरी, जी स्वादुपिंडाचा कॅन्सर, स्वादुपिंडाचा दाह, खराब झालेले यकृत, पित्ताशयातील खडे यासाठी करावी लागते. या सर्जरी मोठ्या प्रमाणात आपल्याकडे होऊ लागल्या, जोडीने लिव्हर ट्रान्सप्लान्ट यशस्वीपणे पार पडू लागले. यात ज्यांच्या कौशल्याचा आणि ज्ञानाचा कस लागला, त्यात डॉ. अविनाश सुपे अग्रभागी आहेत. ही झाली 'सर्जन'ची एक बाजू. दुसरी बाजू आहे- शिक्षण, शिक्षक, नियोजन, व्यवस्थापन, नैतिक मूल्ये, छंद, आवड, रसिकता, कल्पकता, दूरदृष्टिकोन आणि एक प्रचंड ऊर्जा असलेले माणूसपण. या सगळ्यात असलेला 'सर्जन' म्हणजे डॉ. अविनाश सुपे! सर्जनशील हे इतके चपखल शीर्षक आहे, त्याची प्रचीती हे आत्मचरित्र वाचल्यानंतर येतेच, परंतु वाचत असतानाही पदोपदी ते फुलपाखरासारखे आपल्यासोबत रुंजी घालत राहते.

आत्मचरित्र हे केवळ त्या व्यक्तीपुरते मर्यादित असत नाही. ते एक संपूर्ण कालखंड कवेत घेऊन येते. त्या अर्थाने ते एका कालखंडाचे चरित्र असते. डॉ. सुपे केइएमशी जोडले गेले त्यामुळे त्या महाकाय चिरेबंदी वास्तूचे अंतरंग आपल्यासमोर खुले झाले, एकेक पदर उलगडून दाखवावे तसे. वॉर्ड नंबर पाच या डॉ. रवी बापटसरांच्या आत्मचरित्राने ती दालने यापूर्वी आपल्यासमोर उघडी केली होती, त्यांचीही आठवण हे आत्मचरित्र वाचताना येतेच. परंतु दोन्हींचा बाज वेगळा आहे, आणि दोन्ही स्वतंत्र आहेत. डॉ. रवी बापट हे जाणता शिक्षक म्हणून गुरुस्थानी आहेत. तसे डॉ. अरुण सम्सी, डॉ. शरदिनी डहाणूकर, डॉ. आर.ए. भालेराव आणि डॉ. मनु कोठारी यांच्याविषयी डॉ. सुपे यांनी स्वतंत्रपणे या पुस्तकात नव्हे, जीवनात स्थान देत आपली कृतज्ञता व्यक्त केलेली आहे.

डॉ. सुपे आपल्या वैद्यकीय व्यवसायाला 'नोबेल प्रोफेशन' म्हणतात यावरून त्यांनी स्वीकारलेल्या दृष्टिकोनाची कल्पना येते. हा दृष्टिकोन वरवरचा नाही. त्यात त्यांनी सर्वस्वाने स्वत:ला वाहून घेतलेले आहे. रुग्णाचा उपचार हा त्याच्यासाठी सेवेचा वसा आहे. हा वसा अधिकाधिक व्यापक व्हावा म्हणून केलेले प्रयत्न, घेतलेले शिक्षण, त्यातून अमलात आलेले 'फेमर', 'आयएफएमई', 'एमसीआय'सारखे आधुनिक प्रयोग. डॉ. सुपेंचा खरा आंतरिक धर्म दिसून येतो तो शहरात उद्भवलेल्या अनेक आपत्तींच्या वेळी. आपली ड्युटी संपलेली आहे असा चुकार विचार भिरकावून ते आणीबाणीच्या प्रसंगी धावत केइएममध्ये येतात, अहोरात्र रुग्णांची सेवा करतात, त्यांना मृत्यूच्या दाढेतून वाचवतात, हे सारे वाचताना आपल्याही अंगावर काय येतो, आपणही थक्क होतो. मुंबईत झालेले बॉम्बस्फोट, दंगली, पोलिसांचे बंड, बाबरी मशीद प्रकरण, यावेळी सगळ्यात मोठा ताण आला तो रुग्णालयांवर. अशा आपत्तीच्या प्रसंगी रुग्णालयांनी परिस्थिती कशी हाताळावी, यासाठी त्यांनी दाखवलेले व्यवस्थापनाचे, नियोजनाचे कौशल्य पाहून त्यांच्या थोरवीस सलाम करावासा वाटतो.

डॉ. सुपे यांच्या प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाला समृद्ध करणाऱ्या घटकांचाही यात मोठा सहभाग आहे. देशविदेशांची सफर, हिमालय-सह्याद्रीचे ट्रेकिंग, फोटोग्राफी, संगीताचे शिक्षण, लेखन यासाठी ते आवर्जून वेळ देतात, आपल्या छंदावर मनापासून प्रेम करतात. अंटार्क्टिकाचा थरार, हवाई चित्रण, जंगलसफर आपल्याला अनोखे दर्शन घडवतात. कॅमेरा हे माझे स्टेथस्कोपनंतरचे दुसरे प्रेम आहे, असे ते सांगतात. डॉक्टरऐवजी आणखी काय झालो असतो, असा स्वत:विषयीचा प्रश्न उपस्थित करत सांगतात तेव्हा इंजिनीयर तर नक्कीच झालो असतो. कारण वैद्यकीय शिक्षणाला प्रवेश मिळाला तेव्हा मुंबईच्या आयआयटीतही त्यांना प्रवेश मिळालेला होता. परंतु त्यांनी प्राधान्य दिले ते वैद्यकीय शिक्षणाला. त्यांचा हा प्रवास थेट डीनपदापर्यंत झाला. निवृत्तीनंतरही ते याच नोबेल प्रोफेशनमध्ये आहोत. या व्यवसायाकडे सगळ्यांनीच नोबेल प्रोफेशन म्हणून पाहावे, अशी इच्छा ते व्यक्त करता.

डॉ. अविनाश सुपे यांचे हे आत्मचरित्र म्हणजे एका सर्जनशील वृत्ती असलेल्या सृजनभावाने ओथंबलेल्या, आपल्या प्रोफेशनवर आत्यंतिक आत्मिक प्रेम असलेल्या नोबेल माणसाचे प्रेरक-समृद्ध चरित्र आहे. सहज ओघवत्या कसदार लयीत ते आपल्यासमोर उलगडलेले आहे, याचे कौतुक करायला हवे. फार अवघड जबाबदारी त्यांनी उत्तमपणे पार पाडलेली आहे. डॉ. व्ही.एन. श्रीखंडे यांनी दिलेली प्रस्तावना ही डॉ. सुपे यांच्यासाठी कौतुकाची शाबासकी आहे.


शिरीष घाटे यांचे मुखपृष्ठ अतिशय सुंदर आणि अर्थवाही आहे.

**मूल्य ३५० रुपये  सवलतीत २१० रुपये**




# ग्रंथपान

**सृजनाच्या नव्या वाटा**
**रेणू दांडेकर**




**नवी ऊर्जा नव्या वाटांवरील मैलांचे स्तंभ**

*''इथे अजूनही वर्ग बिनभिंतींच्या वर्गात झाडाखाली भरतात. कोंडलेपण अजिबात नाही. खिडक्या नाहीत. मग त्या बंद करणं नि उघडणं नाही. रवींद्रनाथांना वाटायचं, इमारतीवर खर्च होता कामा नये. बेंचेस, कपाट इत्यादी फर्निचरची गरजच काय. आकाश, पाणी, झाडं, पानं, फुलं मुलांच्या जवळ हवीत. पक्षी, पाखरं, लहान लहान जिवाणू मुलांना पाहता यायला हवेत.''*

चार भिंतींच्या आत चाकोरीबद्ध शिक्षणाला छेद देत स्वत:च्या कल्पनेप्रमाणे मुक्त शिक्षणाचा पाया नोबेल विजेते रवींद्रनाथ टागोर यांनी शांतिनिकेतनच्या रूपात रचला. एक अभिनव कल्पना म्हणून तिचे झालेले कौतुक आजही कायम आहे आणि तिचे अस्तित्वसुद्धा. मुलांचे कोवळे निर्मितिक्षम जग अजानवृक्षाखाली वावरावे, माणसांनी स्वत:ला जाणून घ्यावे, निसर्गात पूजा बांधावी, ज्ञान मिळवावे. हे ज्ञान माणसाला कलात्मक बनवते आणि कला जगण्यात आनंद निर्माण करते. रवींद्रनाथांचे हे विचार शतकापूर्वी होते, ते आजही टिकून आहेत, त्याला कारण त्या विचारात असलेला सशक्तपणा. त्यांचे पाठोभवन त्याच विचारांनी समृद्ध झालेले आहे त्याचा विस्तार झालेला आहे. इथे प्रवेश घेऊन रवींद्रनाथांच्या कल्पनेतून रुजलेल्या, समृद्ध वारसा असलेल्या शिक्षणप्रवाहात सामील होणारे विद्यार्थी–विद्यार्थिनी भाग्यवानच म्हणायला हवेत, परंतु अशा पाठोभवनला भेट देऊन त्याचे अंतरंग समजून घेणे हेसुद्धा भाग्यच. असे भाग्य लाभलेल्या लेखिका आहेत रेणू दांडेकर. लेखिकेने केवळ शांतिनिकेतनलाच भेट दिली असे नव्हे, तर भारतभर भ्रमण करून शांतिनिकेतनप्रमाणे शिक्षणाचे वेगवेगळे प्रयोग करणाऱ्या सुमारे सतरा शाळांची पाहणी केली आहे. तेथे शिक्षण कशा पद्धतीने दिले जाते, त्यांच्या अभ्यासक्रमाचे, परीक्षांचे स्वरूप कसे आहे, त्याची पाठ्यपुस्तके कशी आहेत, त्यांचे ग्रंथालय कसे आहे, त्या ग्रंथालयांचा लाभ कशाप्रकारे घेतला जातो, येथे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण किती आहे, हे विद्यार्थी कोणत्या स्तरातून आलेले आहेत, अशा शाळा सुरू करणारे कोण आहेत, त्यांच्यामागे असलेला हेतू–उद्देश–प्रेरणा कोणत्या आहेत. या संस्था आहेत तर त्यांचे आर्थिक नियोजन कसे आहे. अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न लेखिकेने या शाळांच्या पाहणीतून केलेला आहे. तो करताना त्यांना आलेले अनुभव, जाणवलेले वेगळेपण, हेतू–उद्देशापर्यंत या शाळा कशा पोहोचल्या या सगळ्यांची उत्तरे, तपशील, त्यांनी एकत्रित केला. त्यासाठी संस्थाचालक, विद्यार्थी–विद्यार्थिनी यांच्याशी साधलेला संवाद महत्त्वाचा ठरला आहे. हे सगळे संचित प्रथम लेख स्वरूपात, त्यानंतर ते पुस्तकरूपात मांडले आहे, त्याचे नाव आहे 'सृजनाच्या नव्या वाटा!'

'सच की पाठशाला' ही पंजाब–गुरुदास जिल्ह्यातील तुगलवाल या गावी असलेली एक वेगळी शाळा. ही मुलींची मुलींनी चालवलेली मुलींसाठी असणारी शाळा आहे. येथे शिक्षक अगदी कमी म्हणजे नाहीच्या बरोबर म्हणता येतील. येथे नर्सरीपासून पदवीपर्यंत शिक्षणाची सोय आहे. महाविद्यालयातील मुली शाळेतल्या मुलींना शिकवतात. येथले शिक्षक हे विद्यार्थीच आहेत. म्हणजे सकाळी विद्यार्थिनी असलेली मुलगी दुपारी शिक्षिका असते. कॉलेजमध्येही मुलीच शिकवतात. एखादा भाग नाही समजला तर जिला येते ती मुलगी जिला येत नाही तिला आपल्याजवळ घेऊन बसते. वर्ग ४० संख्येचा असेल तर १०–१०चे चार गट केले जातात. प्रत्येक गटाला एकप्रमाणे शिकवले जाते. रविवार सोडून कोणत्याही सणाला, ऋतूला, संकटकाळी सुटी नाही. शासनाचे कोणतेही अनुदान घेतले जात नाही. कामाची विभागणी केलेली असून त्यासाठी वेगवेगळ्या कमिट्या आहेत. या कमिट्यांमधील मुली संपूर्ण संस्थेवर नियंत्रण ठेवतात, कारभार चालवतात यात नवल वाटावे अशी गोष्ट म्हणजे कॉलेजच्या प्राचार्यांची निवड, ही निवडदेखील मुलीच करतात. संस्थेची पंधरा एकर शेती आहे. तिची सर्व कामे मुली करतात. अगदी दूध काढण्यापर्यंत. येथे शिपाई, क्लार्क नाही. या संस्थेत २५०० मुली आणि १००० मुले आहेत. मुलांची शाळा वेगळी आहे.


उत्तर प्रदेशातील 'दि गुड हार्वेस्ट स्कूल' ही शाळा म्हणजे मुलींसाठी असणारी भारतातील पहिली शेतीशाळा आहे. येथे कोणताही साचेबंद अभ्यासक्रम नाही, शाळेची रचनाही इतर शाळांसारखी नाही. सर्व मुली एकत्र बसतात. त्याच आठवडाभराचे नियोजन करतात. अनिश आणि अनिता स्वत:च्या खर्चाने ही शाळा चालवतात. हिरवाईचे शिक्षण देणारी ही शाळा आहे. मध्य प्रदेशातील 'आधारशिला' ही शाळा– 'रास्ते होते नही चलकर बनाये जाते हैं।' हे स्वानुभवाने सांगणारी शाळा आहे. कला ही या शाळेचा स्तंभ आहे. हातांनी काम करत करत शिकणे, त्यातून मनाला आनंद–समाधान देणाऱ्या गोष्टी निर्माण होणे यात आधारशिला मग्न आहे. योगी अरविंद आणि मदर यांचा अभ्यास, विचार, चिंतन यांच्याशी संबंधित स्वत: अभ्यासक्रम असलेली. दिल्ली येथील मीरांबिका प्रत्यक्ष अनुभवावर भर देते. जयपूर येथील बोध शिक्षा समिती ही शिक्षणाचा स्तर उंचावण्यासाठी अभ्यासक्रमनिर्मिती आणि शिक्षकांना प्रशिक्षित करण्याचे मूलभूत कार्य करते. अशा एकूण सतरा शिक्षणसंस्थांचा प्रत्यक्ष परिचय लेखिकेने या पुस्तकातून करून दिलेला आहे. अनुभव, प्रयोग, शिक्षणाविषयीची तळमळ, ध्येयाने झपाटलेले संस्थापक यांच्याविषयीचा परिपूर्ण तपशील उत्तमरीतीने मांडलेला आहे. विषयातले वेगळेपण टीपकागदाप्रमाणे टिपलेले आहे. सोबत फोटो दिलेले आहेत. शिक्षणातले हे वेगळेपण लेखिकेमुळे परिचयाचे होत आहे. त्यांच्या या उपक्रमाला मनापासून दाद द्यायला हवी. यातून निर्माण होणाऱ्या ऊर्जेतून कुणी प्रेरणा घेतली तर हे श्रम सार्थकी लागले, असे म्हणता येईल.

अन्वर हुसेन यांचे मुखपृष्ठ आशयसंपन्न आहे.

**मूल्य २०० रुपये  सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**आतल्या विस्तवाच्या कविता**
**संजय चौधरी**




**मूल्यांचा आग्रह जपू पाहणाऱ्या प्रत्येकाची कविता**

*''झोपसद्धा कमीच झालीय त्यांची*
*नुसत्या डोळ्यांनीच येरझाऱ्या घालत असतात*
*जुन्या निघून गेलेल्या दिवसात.''*

कवी संजय चौधरी यांचा ग्रंथालीने प्रकाशित केलेला नवीन काव्यसंग्रह. 'आतल्या विस्तवाच्या कविता'. कवीचा हा तिसरा काव्यसंग्रह आहे. 'माझं इवलं हस्ताक्षर', 'कविताच... माझी कबर' या दोन काव्यसंग्रहांनंतरचा. पहिला काव्यसंग्रह २००५ साली प्रकाशित झाला. दुसरा २०१८ साली या दोन्ही काव्यसंग्रहांचे स्वागत काव्यप्रेमी रसिक वाचकांनी अगदी मनापासून केले. ज्याला उदंड प्रेम प्रतिसाद म्हणता येईल. दोन्ही संग्रहांच्या तीन–तीन आवृत्त्या निघाल्या आहेत. शिवाय त्यांना सन्मानित करणाऱ्या पुरस्कारांची यादी पाहिली तर वरील विधानाचा प्रत्यय येईल. कविता कसदार असेल, वाचकाच्या मनातून काळजापर्यंत भिडण्याची ताकद तिच्यात असेल तर, रसिकवाचक तिला मनापासून दाद देतोच, याचा अनुभव हे दोन कवितासंग्रह देतात. आता तिसरा कवितासंग्रह वाचकांच्या हाती आला आहे, त्यालाही तितकाच उत्तम प्रतिसाद मिळेल याची खात्री आहे.

'आतल्या विस्तवाच्या कविता' हा काव्यसंग्रह त्याच्या शीर्षकाद्वारेच त्याच्या अंतरंगाचा परिचय देऊ पाहतो. तो अनुभवाला येतो वाचत असताना. कवीने त्याची विभागणी केली आहे आयामात. अकरा स्वतंत्र आयाम असून प्रत्येकाची स्वतःची ओळख आहे जी वाचकालाही तिच्याशी एकरूप करून घेत जाते. एका खोल डोहाच्या भावविश्वाचे तळ निरखून दाखवते. काय आहे या डोहाच्या तळाशी? नाते. ज्या नाळेने आपण सारेच जोडले जातो, ती नाळ मुळापासून तोडल्यासारखे, तिची ओळखच विसरल्यासारखे आपण आज वागतो आहोत. आई! जिच्याशिवाय जगात घर असू शकत नाही. दिवसागणीक ती म्हातारी होत जाते. अहोरात्र ती जागी असते सगळ्यांसाठी. तिला आपण किती समजून घेते, तिच्यासाठी काय करतो? बाप! तो असतो का कधी खिजगणतीत, विशेषतः त्याच्या शेवटच्या दिवसांत? त्याचे अस्तित्व असून नसल्यासारखेच. प्रत्येक जण वाट पाहत असतो त्याच्या जाण्याची, घाई असते प्रत्येकाला त्याच्या नावावर असेल ते स्वतःच्या नावावर वाटून घेण्याची. आई व वडील या दोन आयामात कवी जे वास्तव मांडतो ते प्रत्येकाने स्वतःला तपासून पाहावे इतके प्रखर आणि पारदर्शी आहे. यह नंबर मौजुद नही है। या ओळीशी कवी येऊन थांबतो तेव्हा प्रत्येकाच्या हातातला जिवलग वाटणारा मोबाइल आपोआप गळून गेलाय नव्हे, कायमचा स्वीच ऑफ झालाय असेच वाटेल, मन तितके बोथट झालेले नसेल तर!

बाजार हा सगळ्यांना ठाऊक असलेला, अनुभवलेला, खरेदी–विक्रीचा सौदा चाललेला एक व्यापारी ठेला. यांचे व्यवहार आणि त्यात माणूस म्हणून असलेली आपली किंमत, कवी बोलतो तेव्हा या ठिकाणाची दाहकता आयुष्याचा इतका पट उलटूनही आपल्या लक्षात कशी नाही, याचेच आश्चर्य वाटत राहते.

जगण्याचे पोस्टमार्टेम आणि माझी झालीय माझ्याशीच चुकामूक या आयामातून कवी केवळ नात्यांचे, आप्तांचे, कुटुंबाचे असलेले धागेदोरे उलगडून दाखवत नाही, स्वतःच्या जगण्याचेही पीळ पुन्हा पुन्हा उलगडून दाखवतो. फुलाचे झाड समूजन तो मिठी मारू पाहतो आणि काट्यांनी रक्तबंबाळ होतो. स्वतःचाच हरवलेला चेहरा तो आरशात पाहण्याचा प्रयत्न करतो. अफाट व्यवहारी जगाने हा चेहरा केव्हाच गहाण ठेवला आहे स्वतःकडे, हे भान आता कुणाकडेच राहिले नाही. राहिले ते एकच भान, दुसऱ्याचा आवाजही बंद करण्याचे. त्यामुळे जे ओठांवर आहे ते ओठाबाहेर येऊ शकत नाही. त्याचे सूचकपण कवी पुढील ओळीत मांडतो, *देता येत नाही कुठलीही शाश्वती, माझी माझ्याशीच झालीय चुकामूक!*

जग आता प्रचंड वेगाने धावत निघाले आहे. शेजारच्या फ्लॅटमध्ये काय घडते इकडे लक्ष द्यायला त्याला आता वेळ नाही. एकाच नात्यात बांधून घ्यायलाही आता कुणी तयार नाही जन्मोजन्मीचे. त्यातला जाचही नको आणि नात्याची दुर्गंधीही नको. चकचकीत मॉल, चकचकीत गाडी आणि हरवलेल्या वयाचे जोडीदार. घरातल्या माणसांपेक्षा बाहेरच्याशी अधिक खळखळून हसणे यात कुठले अंतर वाढत आहे आणि दऱ्या किती खोल होत आहेत, याच विरोधाभासी वास्तव कवी मांडतो, *'लख्ख प्रकाश सिनेमात पडदाभर पसरलेला, आपलेच पाय खुर्चीखालच्या अंधारात लटकलेले.'*

कवी संजय चौधरी आपल्याभोवती असलेल्या समाजाकडे, त्यातल्या अंतर्प्रवाहाकडे किती संवेदनक्षम नजरेने पाहतो, त्यातली विषमता, क्रूरता, जगण्याची धडपड, कोसळत चाललेली नैतिकता, ऱ्हास होत चाललेली जीवनमूल्ये, हरवत चाललेली नाती, तो तरल टीपकागदासारखी टिपतो, त्याची आशयपूर्ण अशी मांडणी करतो आणि त्याच्या ओघवत्या लयीत व्यक्त होतो. तेव्हा ती केवळ एक कविता नसते, तो असतो अखंड जगण्याचा एक रसरशीत तुकडा, जो जिवंत उल्केसारखा आपल्यासमोर धगधगताना दिसत राहतो. यातून कवीची आंतरिक अस्वस्थता तर पदोपदी आपल्याला जाणवत राहतेच, परंतु यातूनही पुढे काही चांगले घडेल, हा आशावादही यातून काही दिलासा देत जातो. या कविता मुक्तछंदातील आहेत, त्यांच्यात जो भाव व्यक्त होतो; त्यासाठी जी उत्कटता असते ती तिच्या अंगभूत ताकदीने आलेली असते, आणि तीच कवीची खरी ऊर्जा आहे. तिचे सच्चेपण आहे. त्यामुळे ही कविता थेट भिडते, वाचकाला आपल्या कवेत घेते. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे ही संजयची कविता आहे, कुठल्याही छाप, प्रभाव, ट्रेंडपासून मुक्त आहे. त्यामुळे तिचे अस्सलपण हे तिचे सामर्थ्य आहे.

ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर यांनी मोजक्या शब्दांत कवितेचे नेमकेपण टिपले आहे.

अन्वर हुसेन यांनी आतली रेखाचित्रे आणि मुखपृष्ठ कवितेला वेगळा आयाम देऊन जातात.

**मूल्य १५० रुपये सवलतीत १०० रुपये**

# ग्रंथपान

## नाही गिरवता येत कुठलीच लिपी

**डॉ. स्मिता पाटील**




**भावसौंदर्य, रूपसौंदर्य आणि मूल्यसौंदर्य यांचा एकात्म साक्षात्कार!**

*''नाही सांगता येत झणझणीत वाळवंटास*
*हिरवळीचा शिरस्ता!*
*किती वाटले तरी पंख नाही देता येत*
*त्यांच्या पाऊलवाटेला.''*

आपल्याभोवती असलेला समाज, त्यात होत चाललेला बदल, ऋतुमानात होत जाणारे बदल, यांचा होणारा परिणाम शेवटी सहन करावा लागतो तोच सगळ्यांचा घटक असलेल्या माणसाला. माणूस आयुष्याच्या पटलावर वावरत असताना अनेक पातळ्यांवर संघर्षाला सामोरा जातो. जगण्याशी तडजोड करत आपले अस्तित्व पुसले जाणार नाही यासाठी पुन्हा संघर्ष करत राहतो. या संघर्षात पुरुष आणि स्त्री असा भेद करता येत नाही. दोघेही मोडतात ते 'माणूस' याच घटकात. त्यांचा संघर्ष कधी ऋतुमान, समाज यांच्याशी असतो तसा स्वत:शीदेखील असतो. यातून बाहेर पडण्याचे त्याचे प्रयत्न, पराकाष्ठा, त्याच्या क्षमतेच्या, कुवतीच्या बाहेरचे असतात तेव्हा त्याच्यासमोर ठाकते ती अगतिकता, अस्वस्थता, हतबलता, तरीही मनाशी असतो निर्धार मोडून न पडण्याचा, दोन हात करत पुढे जाण्याचा, आपल्या पायांवर, मनगटावर विश्वास ठेवण्याचा. हे सारे आपल्या संवेदनशील मनाने ज्यांना टिपता येते, व्यक्त होण्याची शक्ती, प्रतिभा, ऊर्जा ज्या मोजक्याच कवींकडे आहे, त्यात एका नावाचा आग्रहाने समावेश करायला हवा, त्या कवयित्रीचे नाव आहे, डॉ. सौ. स्मिता पाटील!

'नाही गिरवता येत कुठलीच लिपी' हा डॉ. सौ. स्मिता पाटील यांचा ताजा कवितासंग्रह! 'अस्वस्थ मनाचे वर्तमान' असे दुसरे शीर्षक त्याला देता येईल. जे वास्तव कवयित्री पाहत आहेत, ते केवळ भासमान स्वरूपातले नाही. एक प्रकारचा राख पांघरलेला विस्तव त्यात धगधगत आहे, राखेसाठी त्या विस्तवाची घुसमट होत आहे, ती घुसमट कवयित्री स्वत: अनुभवत आहे, त्याची दाहकता अस्वस्थ करत आहे, तीच घुसमट, दाहकता, अस्वस्थता शब्दांचे बोट धरून कवितेच्या रूपात अवतरली आहे.

शेतकरी; ज्याला आदराने 'बळीराजा' म्हटले जाते, तो खरेच राजा आहे की, व्यवस्था, ऋतुमान यांचा बळी आहे, याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. तो होईल अथवा होणारही नाही, परंतु कवयित्री या राजाशी असलेले नाते नजरेआड होऊ देत नाही. 'बळी' या कवितेत त्याच्या परिस्थितीचे वर्णन करताना थेट निएंडरथल, सेपियन यांचा दाखल देतात आणि आग्रह धरतात, बळीराजा, तूच आता जागा होण्याची वेळ आली आहे. 'तुझा वनवास', 'गुन्हा', 'पेटतो वणवा', 'निर्ऋती'सारख्या आणखी कविता आहेत. ज्या शेती, शेतकरी याच्या अंत:करणाला स्वत:च्या रुधिराने न्हाऊ घातलं आहे.

'स्त्री' हा दुसरा घटक आहे, जो पितृसत्ताक परंपरेचा शोषित घटक ठरला आहे. अ-आईचा आणि ब-बाईचा या दोन वर्णाच्या परिघात संपूर्ण चित्र स्पष्ट होते. उमलत्या कळ्यांचे श्वास सहज चोरले जातात. गर्द हिरव्या रानाचा गळा घोटण्यासाठी बेलगाम, बेभानपणे अमरवेलांचे अजस्र तांडे सरसावलेले आजूबाजूला जिवंत देहदेव्हारे जाळले जात आहे, कोवळे अंकुर चिरडले जात आहेत, ती गुदमरते आहे, जळते आहे आतल्या आत, वावरते आहे बांगडीएवढ्या परिघात मन-भावना मारून, स्वत:ची ओळख विसरून का? ती 'ती' म्हणून जन्माला आली, नियतीने तिच्या माथ्यावर लालभडक टिळा लावला म्हणून? स्त्रीच्या जगण्याविषयीच्या अनेक कविता या संग्रहात आहेत. ती जळता दिवा उशाला ठेवून आहे, तरीही कधीतरी पहाट होईल, अंधार दूर होईल, सूर्यदाराशी येईल, फक्त तू किनारा सोडू नकोस हा आशावादही त्याचवेळी समोर येतो तेव्हा ही कविता केवळ स्त्रियांची, स्त्रीवादी न राहता, उद्याच्या पहाटेची ही कविता आहे असा विश्वास हीच कविता देते.

या संग्रहातील कवितांचा आवाका खूप मोठा आहे. त्या भाष्य करत नाहीत. थेट वास्तव आपल्यासमोर जिवंत स्वरूपात उभे करतात. यात आलेली रूपके, अनुप्रास हे केवळ पानाफुलांचे, रात्र-अंधार-उजेडापुरते सीमित नाहीत. ती रूपके नदी आणि बाई यांच्यातला समान धागा दाखवतात तसा गवत आणि तुळस यांच्यात असलेला फरकही दाखवतात. ती केवळ सोशिकता याच गुणाची उजळणी करत नाहीत तर तुलाच आता तुझा प्रकाश शोधून काढावा लागेल अशी बंडाची हाक ती देते. या संग्रहातील प्रत्येक कविता स्वतंत्र आहे, गतिमान आहे. तिला स्वत:ची लय आहेच शिवाय ती मुक्तछंदाशी नाते ठेवून आहे. 'दु:खच येतं वसतीला दया येऊन, तेच उरतं व्यापून, उभ्या आयुष्याला सावली बनून', 'तुझ्या आतला दयेचा अर्णव', 'तोडून चार चांदण्या माळते केसांत', 'कधीतरी कुठल्या एका क्षणाला वेलीत मन घट्ट करून दूर करावे लागतेच फुलाला' यासारख्या सुंदर ओळी वाचताना कवयित्रीला दाद द्यावीशी वाटते. 'पहारा', 'खात्री आहेच', 'बुचाचे झाड गुन्हा', 'विस्तव', 'गाऊ रे भूपाळी', 'ठाऊक आहे का?'सारख्या अनेक कविता या कवयित्रीच्या प्रतिभेचा सुंदर आविष्कार पेश करतात.

डॉ. स्मिता पाटील यांचे 'समिधा', 'गंमतगाणी' हे कवितासंग्रह आणि 'शोध सुखाचा' हा ललितलेखसंग्रह. अशी तीन पुस्तके प्रकाशित असून त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. सामाजिक कार्यातही त्याचा सहभाग असतो. 'नाही गिरवता येत कुठलीच लिपी' हा दर्जेदार कवितासंग्रह असून त्याचे काव्यरसिक वाचक नक्की स्वागत करतील असा विश्वास वाटतो. डॉ. द.ता. भोसले यांची प्रस्तावना आणि डॉ. महेंद्र कदम यांचा ब्लर्ब ही कवयित्रीच्या काव्यप्रवासासाठी मोठीच प्रशंसनीय शाबासकी म्हणता येईल. शिरीष घाटे यांनी सजवलेले मुखपृष्ठ आशयाला सुंदर अर्थ प्राप्त करून देणारे आहे.

**मूल्य १५० रुपये सवलतीत १०० रुपये**



Quik Shef
Instant Hunger, Instant Food
WAGH BAKRI Tea
सह-प्रस्तुत
मस्त मजेदार
किचन कल्लाकार
कलाकारांची शिट्टी वाजणार,
मनोरंजनाची चव वाढणार
Co-powered by
NIRMA SHUDH SALT
Gala SUPER SCRUB
Special Partner
NILON'S
Sweetness Partner
रुचियाना गूळ पावडर
बुध - गुरू
रात्री 9.30 वा.
झी मराठी HD वरही पहा
ZEE मराठी
Co-presenting Sponsors:
Quik Shef
WAGH BAKRI Tea
Co-powered by:
NIRMA SHUDH SALT
Gala SUPER SCRUB
Special Partner:
NILON'S
Sweetness Partner:
रुचियाना
Streaming Partner:
ZEE5

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळम